Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १७५ * * नागपूर *

मंगळवार, दिनांक १ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

## धारावीतील मशिदीचे बांधकाम हटविण्यास सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३०:
धारावी येथील मेहबूब-ए-सुबानिया मशिदीचे अनधिकृत बांधकाम हटविण्यास ट्रस्टने सुरुवात केली आहे. अनधिकृत मशिदीवर कारवाई करण्यासाठी पालिका गेली असता विरोध झाला होता. या घटनेने धारावीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.
या प्रकरणी ट्रस्टने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. नुकतेच ट्रस्टने मशिदीतील अनधिकृत बांधकाम हटविण्याचे आश्वासन दिले होते. त्याअंतर्गत आज ट्रस्टने मशिदीवरील अनधिकृत बांधकाम हटविण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे मुंबईतील धारावी येथे असलेली मेहबूब-ए-सुबानिया मशीद ६० वर्षांहून अधिक जुनी आहे.

अग्राग्रलेख **खरीखरी...**

## अतुलनीय सर्वोच्च निकाल

भारताचे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी एका विद्यार्थ्याच्या निराशेला आशेमध्ये परिवर्तित करून एक धडाकेबाज निर्णय दिला आहे. एक मजुराचा मुलगा ज्याचे नाव अतुल असे आहे. त्याला एका आयआयटीमध्ये प्रवेशासाठी 17500 रुपये भरायचे होते. एवढी रक्कम त्या विद्यार्थ्याच्या मजूर असलेल्या वडिलांकडे नव्हती. त्यातच रक्कम जमा करण्याचा अवधी संपून गेला. त्यानंतर मोठी हिम्मत करून हा विद्यार्थी आणि त्याचे वडील न्यायासाठी सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. त्या आधी हे प्रकरण झारखंड विधी सेवा प्राधिकरण आणि त्यानंतर चेन्नई विधी सेवा प्राधिकरणाकडे गेले होते. शेवटी सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण पोचल्यावर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्यासमोर ही केस आली. सर न्यायाधीशांनी निकाल देताना खूप मूलभूत आणि महत्त्वाचे मुद्दे मांडले. ते म्हणाले की, हा विद्यार्थी अत्यंत हुशार आहे. याचिकाकर्त्या सारखे हुशार विद्यार्थी जे वंचित गटातून येतात. त्यांनी प्रवेश मिळवण्यासाठी सर्व काही केले. अशा विद्यार्थ्यांना आम्ही सोडू शकत नाही. त्यांना शिक्षणाची संधी मिळालीच पाहिजे. ती संधी त्यांना मिळत नसेल तर देशातील न्यायालये तसा आदेश देऊ शकतात, असे नमूद करून सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी घटनेच्या कलम 142 अंतर्गत आपल्याकडील असाधारण अधिकाराचा वापर करून संबंधित विद्यार्थ्याला न्याय दिला. त्यासोबतच आयआयटीच्या संचालकांना चक्क तंबीच दिली की, या गुणवान विद्यार्थ्याला शिक्षण घेता आलेच पाहिजे. त्यासाठी संवैधानिक कलमाप्रमाणे म्हणजेच कलम 142 अंतर्गत आम्ही सर्व अधिकार हाती घेऊन हा निर्णय देत आहोत. ज्या कलमान्वये या विद्यार्थ्याला न्याय मिळाला. ते कलम सर्वोच्च न्यायालयाला सर्वोच्च अधिकार देते. घटनेचे 142 वे कलमाचा उल्लेख करून सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी संबंधित संस्थेला म्हणजेच आयआयटी धनबादला या विद्यार्थ्याला शिक्षण घेऊ द्यावे आणि त्याच्या बुद्धीचा उपयोग त्याला करू द्यावा, असे सक्त आदेश दिले. चिखलातच कमळ निपजते. गरिबीच्या चिखलातील गुणवान कमळे असतील त्यांना फुलवावे. असेही चंद्रचूड साहेबांनी सांगितले. या निर्णयामुळे एका हुशार विद्यार्थ्याच्या शिक्षणावर जी गदा येत होती, त्याला त्यांनी परांगदा केले आहे. चंद्रचूड साहेबांच्या कारकिर्दीतील हा अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड साहेबांची किर्ती देशभरात स्वयंपूर्ण आणि न्याय बुद्धीने वागणारे व्यक्तिमत्व अशी आहे. आताचे जस्टीस चंद्रचूड हे तिसऱ्या पिढीतील आहेत. चंद्रचूड यांचे आजोबा आणि त्यांचे वडील दोघेही सर्वोच्च न्यायालयात जस्टीस पदावर होते. आपल्या कुळाची परंपरा पुढे नेताना जस्टीस चंद्रचूड यांनी ज्या पद्धतीने हा निवाडा दिला आहे. ते एक धाडसाचे काम आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या आदेशाच्या पार्श्वभूमीवर इतरही गरीब आणि हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे खुली होतील. आपल्या देशात शिक्षणाचे व्यापारीकरण झाले आहे. मोठमोठ्या शाळा, कॉलेजांना वाटेल तशी फी घेण्याचा जणू परवानाच देण्यात आलेला आहे. जुन्या काळातील स्वस्त शिक्षण आता लोप पावले आहे. आता मुलांचे शिक्षण म्हणजे आई-वडिलांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे, असेच म्हणावे लागेल. भारताला भविष्यकाळात असे निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. आपल्या महाराष्ट्रात आजही अनेक गब्बर शिक्षण सम्राट आहेत. त्यापैकी बरीच मंडळी राजकारणी आहेत. वसंतदादा पाटील यांच्या कार्यकाळात अनेक नेत्यांना इंजिनिअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेजेस सुरू करण्याचे परवाने दिले होते. याशिवाय आपल्या देशात किंवा आपल्या राजधानीत पावसाळी छत्र्यांप्रमाणे उगवलेल्या शिक्षण संस्था गरीब विद्यार्थ्यांना फी शिवाय शिक्षणच देत नाहीत. ही खरी वस्तुस्थिती आहे. कालनिर्णय पंचांगाचे निमार्ते ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांचे सुपुत्र जयराज साळगावकर यांना मुंबईतील एका शाळेने त्यांचा निकाल देण्याचे नाकारले होते. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसमोर आपल्या मनाला किती वेदना झाल्या हे त्यांनी एकदा सांगितले. एक विद्यार्थी ज्याने सहा महिन्यांची फी न भरल्याने त्याचा निकाल राखून ठेवण्याचे काम तेव्हा सुरू होते. पण तो त्यावेळचा अपवाद होता. आता तर प्रत्येक शाळा, कॉलेजला प्रत्येक विद्यार्थ्याकडून सहा आकडी फीच घ्यायची असते. मात्र चंद्रचूड साहेबांच्या या निकालाने अशा प्रकारच्या गरीब व हुशार आणि कष्टाळू विद्यार्थ्यांना शिक्षणाचा मार्ग यापुढे मोकळा होईल. अतुल नावाच्या एका अत्यंत गरीब विद्यार्थ्याला या निर्णयामुळे खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे. त्यामुळे हा खरोखरच सर्वोच्च न्यायालयाचा एक अतुलनीय निकाल आहे असेच म्हणावे लागेल. हा आमच्यासाठी आनंदाचा क्षण आहे. चंद्रचूड साहेबांचा विजय असो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# शिंदे समितीचा अहवाल स्वीकृत

## होमगार्ड, कोतवालांचे मानधन वाढवले ■ कॅबिनेट बैठकीत ३२ निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८:
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सोमवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठा आरक्षणाशी संबंधित माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीची दुसरा व तिसरा अहवाल स्वीकारण्यात आला.

याशिवाय राज्यातील होमगार्ड व कोतवालांच्या मानधनात भरीव वाढ करण्यासह ग्राम रोजगार सेवकांना दरमहा ८ हजार मानधन देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.



या निर्णयाचा राज्यातील हजारो होमगार्ड कोतवाल व रोजगार सेवकांना लाभ होणार आहे.

- कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ. अनुकंपा धोरणाही लागू
- ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान
- ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देणार.
- एमएमआरडीएला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यता
- ठाणे वतुर्ळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देणार. १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता
- ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी १५ हजार कोटी कर्जरूपाने उभारणार
- भारतीय खेळ प्राधिकरणाला आकुर्डी, मालाड व वाढवणची जागा
- नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार
- रसायन तंत्रज्ञान संस्थेस ठाणे येथील मौजे खिडकाळीची जागा
- राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र स्थापणार.

### गाईला राज्यमातेचा दर्जा

राज्य सरकारने गाईला राज्यमातेचा दिला आहे. सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारने हा निर्णय घेतला. महायुती सरकारने याबाबत अधिसूचना जारी केली आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत देशी गायींसाठी प्रतिदिन ५० रुपये अनुदान योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. कमी उत्पन्नामुळे गोशाळांना हा खर्च परवडत नाही, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.



सरकारने म्हटले आहे की, भारतीय संस्कृतीत देशी गाईचे महत्त्व, देशी गाईच्या दुधाची उपयुक्तता, आयुर्वेद औषध, शेण व गोमूत्राचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेता. सेंद्रिय शेती पद्धतीला देशी गाईला 'राज्यमाता गोमाता' घोषित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाचा दिलासा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८:
वर्ष २०१९ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आल्याने अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सेवा विषयक आणि सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळण्यास मिळण्यास अडचणी येत होत्या.

नागपुरातील सुमारे ५ हजार आणि राज्यातील ३० हजार अधिसंख्य कर्मचारी यामुळे त्रस्त होते , त्यामुळे आ. प्रवीण दटके यांनी शासनाकडे हा प्रश्न सातत्याने लावून धरला. वर्ष २०२२ मध्ये अधिसंख्य कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक लाभ देण्याबाबत निघालेल्या शासन निर्णयामध्ये १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्याचा समावेश करण्यात आला होता , त्यामुळे कर्मचाऱ्यांना वेतन वाढ तसेच सेवानिवृत्तीचे लाभ मिळण्यास अडचणी येत होत्या.

कॅबिनेट बैठकीमध्ये शासनाने राज्यातील हजारो अधिसंख्य कर्मचाऱ्यांचा विचार करत त्यांच्या सेवेतील १ दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करणे बाबत निर्णय घेतला याबाबत आमदार प्रवीण दटके यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे मुंबई येथे प्रत्यक्ष भेटून आभार मानले. वर्ष २०२२ पासून अफ्रोह संघटनेच्या माध्यमातून अधिसंख्य कर्मचाऱ्यांनी उपोषण, धरणे आंदोलन तसेच विविध मागार्तून हा विषय पूर्ण होण्याकरिता पाठपुरावा केला. याबाबत आमदार प्रवीण दटके यांच्या मागणीनुसार वर्ष २०२३ च्या हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे बैठक घेऊन या विषयाला गती देण्यात आली.

अंतिमतः या निर्णयामुळे विशेषतः नागपूरसह विदर्भ व संपूर्ण राज्यातील अंदाजे ३० हजार कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार असून नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व सेवाविषयक लाभ आता अधिसंख्य कर्मचाऱ्यांना मिळणार आहेत.

## श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह प्रकरणी १६ ऑक्टोबरला होणार सुनावणी

■ वृत्तसंस्था, प्रयागराज, दि. ३०:
मथुरेच्या श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही इदगाह मशीद वादावर सोमवारी अलाहाबाद उच्च न्यायालयात सुनावणी झाली. हिंदू बाजूकडून उत्तर दाखल करण्यात आले. न्यायालयाने आता पुढील सुनावणीसाठी १६ ऑक्टोबरची तारीख निश्चित केली आहे.

## अमरावती जिल्ह्याला भूकंपाचे धक्के

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८:
जिल्ह्यातील अचलपूर अंजनगाव सुर्जी तालुका भूकंपाच्या धक्क्यानं हादरल्याची माहिती समोर आली. सोमवार ३० सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले.

**रिश्टर स्केलवर ४.२ इतकी तीव्रता**

या भूकंपाची तीव्रता ४.२ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाच्या धक्क्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. भूकंपाचे धक्के बसताच मेळघाटातील अनेक गावात खळबळ उडाली.

चिखलदरा मोथा, सलोना चौराकुंड, सेमाडोह, हरीसाल या भागात भूकंपाचे धक्के बसताच नागरिक घराबाहेर पडले. घराशेजारी काहीतरी जोरदार पडलं असावं, असा भास होताच गावातील महिला, पुरुष, लहान मुलं सर्वजण घराबाहेर धावत आले .

धामणगाव गढी या गावात देखील भूकंपाचे धक्के बसताच खळबळ उडाली. गावातील सर्व नागरिक धावत मोकळ्या जागेवर एकत्र आल्याची माहिती धामणगाव गढी येथील रहिवासी रमेश जोशी यांनी दिली. अंजनगाव सुर्जी शहरात देखील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं.

भूकंपाचा सर्वाधिक हादरा हा अचलपूर आणि परतवाडा या जुळ्या शहरांना बसला. भूकंपाचं केंद्र हे अचलपूर पासून ४०० मीटर अंतरावर असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीनं देण्यात आली. यामुळे अचलपूर, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, धारणी या तालुक्यात भीतीचं वातावरण निर्माण झाले आहे.



**बसवर कोसळली दरड**

परतवाडा येथून खोगडा मार्गे कोहा या भागात एसटी बस धारणीकडे जात असताना कोहा नजीक १ वाजून ४० मिनिटाच्या दरम्यान अचानक भूकंपाच्या धक्का लागल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या दरड खाली कोसळली. दरडीचा काही भाग एसटी बसच्या मागच्या बाजूला लागला, सुदैवाने कुठलेही नुकसान झाले नाही, ३० ते ४० प्रवासी बचावले.

## आदिवासी आमदारांचे मंत्रालयालयासमोर आंदोलन

**धनगर समाजाला आदिवासीतून आरक्षणास विरोध**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८:
सरकारमध्ये असूनही आमचे ऐकले जात नाही. त्यामुळेच आम्हाला रस्त्यावर उतरण्याची वेळ आली असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार नरहरी झिरवळ यांनी म्हटले आहे.

आदिवासी समाजात धनगर समाजाचा समावेश करण्याला विरोध करत झिरवळ यांनी मंत्रालयासमोर आंदोलन सुरू केले आहे. आम्हाला समाजाने सभागृह पाठवले आहे. त्यामुळे आम्ही समाजासाठी भांडणार असल्याचे त्यांनी म्हणाले आहे. मात्र राजीनामा देणे हा पर्याय नाही. आम्हाला समाजाने समाजासाठी भांडण्याला सभागृहात पाठवला आहे.

धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण दिले तर सर्वच पक्षांतील आदिवासी आमदार आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देतील, असा इशारा देण्यात आला आहे. आमदार नरहरी झिरवळ चांगलेच आक्रमक झाले आहेत. या प्रकरणी त्यांनी आजपासून मंत्रालयासमोर धरणे आंदोलन करण्यास सुरुवात केले आहे.

## जागावाटपाचा निर्णय दोन-चार दिवसांतच

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८:
खासदार सुप्रिया सुळे यांनी मोठा दावा केला आहे. येत्या तीन-चार दिवसांत परिस्थिती स्पष्ट होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याबाबत बैठकांची फेरी सुरू झाली असून घटक पक्षांचीही बैठक सुरु असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, जयंत पाटील यांनी कालच स्पष्ट केले आहे की, जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहे. आम्ही यासंदर्भात नियमित बैठकाही घेत आहोत, आजही बैठक होत आहे. येत्या ३-४ दिवसांत याबाबत परिस्थिती अधिक स्पष्ट होईल.'

दुसरीकडे, शरद पवार यांनी रविवारी सांगितले होते की, महाविकास आघाडी येत्या ८-१० दिवसांत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसंदर्भात जागावाटपाची चर्चा पूर्ण करेल. पक्ष सोडणाऱ्या नेत्यांवर निशाणा साधत शरद पवार म्हणाले होते की, त्यांच्यापैकी काहींना निवडणूक जिंकता येणार नाही. त्यांचे डिपॉझिट जप्त होवू शकते.

## अज्ञात वाहनाने तिघांना चिरडले

**सावनेर पांढुर्णा मार्गावरील घटना**

■ महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. २८:
पांढुर्णाकडून सावनेरकडे जाणाऱ्या अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत तिघे ठार झाले. यातील दोघांचा घटनास्थळीच तर तिसऱ्याचा रूग्णालयात नेताना मृत्यू झाला. ही घटना केळवद पोलीस स्टेशन अंतर्गत भागेमाहरी शिवारात सोमवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली.

शिवाजी परसराम सिरसाम (वय ३८), ललित शिवाजी सिरसाम (वय १०), दोन्ही रा. वंडलीवाघ, ता. काटोल आणि अनिल रमेश इवनाती (वय २७), रा. परसोडी, ता. नरखेड हे तिघे मोटर सायकलने नरखेड येथून जतामखोरा येथे जात असताना, अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. अपघातात शिवाजी सिरसाम व त्यांचा मुलगा ललित सिरसाम घटनास्थळीच ठार झाले. रूग्णालयात नेताना अनिल इवनाती याचा मृत्यू झाला.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच केळवदचे ठाणेदार अनील राऊत यांनी पथकासह घटनास्थळ गाठले. सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्या हितज्योती



आधार फाउंडेशन कार्यकर्त्यांचा मदतीने मृतदेह सावनेर येथील सरकारी रूग्णालयात पाठविण्यात आले. केळवद पोलीसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास जमादार सुधीर यादगिरे,मोरेश्वर चलपे, धारपुरे करीत आहेत.

मार्गावरील सिसीटीवीच्या माध्यमाने वाहनाचा शोध घेत वेगवेगळ्या दिशेने पोलीस पथक रवाना केल्याचे ठाणेदार अनिल राऊत यांनी सांगितले. दुचाकी चालकाने हेल्मेट घातले असते तर जीव वाचला असता, अशी प्रतिक्रिया हितेश बनसोड यांनी दिली.

## 'युवासेने'च्या विजयाला हायकोर्टात आव्हान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८:
मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वातील युवासेनेने एकहाती विजय मिळवला. पण आता त्यांच्या विजयाला महाराष्ट्र स्टुडंट असोसिएशनने आव्हान दिले आहे.

युवासेनेने सिनेट निवडणुकीच्या मतदार नोंदणीपासून अंतिम मतदार यादीपर्यंत संपूर्ण प्रक्रियाच घटनाबाह्य पद्धतीने राबवल्याचा आरोप या संघटनेने केला आहे. त्यामुळे युवासेनेच्या विजयावर सवाल उपस्थित केला जात आहे.

मुंबई विद्यापीठाच्या सिनेटची २ वर्षांनंतर नुकतीच निवडणूक झाली. त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवासेनेने १० पैकी १० जागा जिंकत विरोधकांचा धुव्वा उडवला.

आता सिनेटच्या निवडणूक प्रक्रियाला पयार्याने युवासेनेच्या या विजयाला थेट मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. युवासेनेने सिनेट निवडणुकीच्या मतदार नोंदणीपासून संपूर्ण प्रक्रिया घटनाबाह्य पद्धतीने राबवली. त्याचा त्यांना निवडणुकीत लाभ झाला, असा आरोप महाराष्ट्र स्टुंड असोसिएशनने याचिकेत केला आहे.

## २३९८ कोटी रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८:
कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिलेल्या शब्दांनुसार मागील वर्षी भाव पडल्याने नुकसान झालेल्या राज्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजार रुपये प्रमाणे अर्थसहाय्य करण्याच्या योजनेतुन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण प्रणालीची कळ दाबून प्रत्यक्ष शेतकऱ्यांना अर्थसहाय्य वितरणाची सुरुवात करण्यात आली.



याद्वारे एका क्लिकवर सुमारे ४९ लाख ५० हजार हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टरच्या मर्यादित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर २३९८ कोटी ९३ लाख रुपये रक्कम वर्ग करण्यात आली.

2023 च्या खरीप हंगामात एकूण 96 लाख 787 खातेदार शेतकरी हे सोयाबीन व कापूस उत्पादक होते. त्यानुसार त्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाने एकूण 4194 कोटी रुपये इतका निधी डीबीटी प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला आहे. त्यापैकी 1548 कोटी 34 लक्ष रुपये कापूस तर सोयाबीन साठी 2646 कोटी 34 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

अनुदान स्वतंत्ररीत्या वितरण करण्यासाठी लेखाशीर्षासह महाआयटी द्वारे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले होते. त्यावर शेतकऱ्यांची स्वतःचे संमती पत्र व बँक खाते आधार इत्यादी माहिती जमा करून ती माहिती जुळणे आवश्यक असल्याने यामध्ये काही कालावधी लागला.

आज जवळपास 49 लाख 50 हजार शेतकऱ्यांना आपण याद्वारे लाभ दिला आहे. आधार व अन्य माहितीची जसजशी जुळणी होत राहील तसं तसे उर्वरित शेतकऱ्यांना देखील या योजनेचा लाभ दिला जाईल अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

## जम्मू-काश्मीरच्या ४० जागांसाठी आज मतदान

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ३०:
जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या आणि तिसऱ्या टप्प्यात आज मंगळवारी ७ जिल्ह्यांतील ४० विधानसभा जागांवर मतदान होणार आहे. यामध्ये ३९.१८ लाख मतदारांचा समावेश असेल.

तिसऱ्या टप्प्यातील ४० जागांपैकी २४ जागा जम्मू विभागातील आणि १६ काश्मीर खोऱ्यातील आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, शेवटच्या टप्प्यात ४१५ उमेदवार रिंगणात आहेत. १६९ उमेदवार कोट्यधीश असून ६७ उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. नगरोटा, जम्मू येथील भाजपचे उमेदवार देवेंद्र सिंह राणा यांच्याकडे सर्वाधिक १२६ कोटी रुपयांची संपत्ती आहे.

# चांगल्या पत्रकारितेमुळे सामाजिक स्तर उंचावतो आहे...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.२८:
चांगल्या पत्रकारितेमुळे सामाजिक स्तर कायम आहे. हा स्तर अधिक उंचावला जावा यासाठी राज्यातील पत्रकारिता सदैव अग्रेसर आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या, उद्योजक राजश्री पाटील यांनी केले.

व्हाईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार व संघटनात्मक बांधणीसाठी एक दिवशीय कार्यशाळा शिर्डी येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी राजश्री पाटील बोलत होत्या. विचारपीठावर ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पोहरे, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, मंत्रालयातील विधी विभागाच्या

**व्हॉईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकारी, शिर्डी शिलेदारांचा गौरव**




आरोग्य विभागाचे प्रमुख रामेश्वर नाईक, संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांची उपस्थिती होती.

यावेळी मंगेश चिवटे, रामेश्वर नाईक, यांचीही भाषणे झाली. शिर्डी येथील शिखर अधिवेशन यशस्वी करणारे नगरचे जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने आणि त्यांच्या संपूर्ण टीमचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

उपस्थित अतिथींनीही मार्गदर्शन केले. व्हॉईस ऑफ मीडियाचे अनिल म्हस्के, योगेंद्र दोरकर, दिगंबर महाले, मंगेश खाटीक, विजय चोरडिया, अजित कुंकूलोळ, संजय पडोळे, सतीश रेंगे पाटील, किशोर कारंजेकर, सचिन मोहिते, मिलिंद टोके, अरुण ठोंबरे, अमर चोंदे, रोहित जाधव, वामन पाठक, अब्दुल कय्यूम अब्दुल रशीद यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राज्यातून सर्व जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुकीच्या तोंडावर पालकमंत्र्यांचा जनता दरबारचा देखावा ?

**बोईसर, दि. ३० : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघर भाजपचे पालक मंत्री रविंद्र चव्हाण दिड महिना भराच्या अंतराने पुन्हा ३० सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात दुपारी १२ ते ३ या वेळेत जनता दरबार घेण्याचा देखावा करणार असल्याचे समजत आहे.

गेल्या वेळी १६ ऑगस्ट रोजी असाच देखावा त्यांनी केला असल्याचा अनुभव जनता दरबारात आपली कामे आणि तक्रारी यांचे निवारण होईल ही आस लावून गेलेल्या जनतेला त्या जनता दरबाराचा अनुभव वाईट होता. या वेळी सुद्धा तोच अनुभव जनतेला नक्की येईल असा सुरु नागरिकां मधून ऐकावंयास मिळत आहे. रविंद्र चव्हाण यांना जिल्ह्यात त्यांच्या कार्यकर्ता आणि पदाधिकारी यांच्या व्यतिरिक्त काहीही दिसत नाही. हा सामन्या जनतेचा अनुभव आहे.उदाहरणार्थ गेल्या वर्षी भाजपा शहर अध्यक्ष यांच्या कार्यालयाचे उदघाटन करण्यासाठी येत असताना त्यांना लटकणारे दिवाबत्ती च्या खांबावरील फोकस दिसलें नाहीत. त्या वेळीही ते ढोल ताशा वाजवत आले होते. पण त्यांना करदात्या सामन्य जनतेच्या सुविधा या कडे आपले नगरसेवक देत नाहीत ते दिसलें नाही. या वेळीही गेल्या वेळ सारखीच देखावाचा



जनता दरबार भरवून आमचा पक्ष किती कामे करतो हे दाखवून देण्यासाठी भरवला आहे का...? हा प्रश्न सामन्य जनता विचारत आहे. मुंबई अहमदाबाद महामार्गवरील गुजरातच्या कंत्राटदारा मुळे सामन्य प्रवासी त्रस्त असताना, जनता दरबारात महामार्गा बाबत तक्रार आलेली असताना, पत्रकार परिषदेत पत्रकारां समोर तक्रार आली नाही असे खोटे बोलणाऱ्या पालक मंत्र्या वर कोण विश्वास ठेवेल...? विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर, पालक मंत्री म्हणून हा जनता दरबार भरवला जात आहे.अशी काही प्रशासकीय अधिकाऱ्यांन मध्ये सुद्धा दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे...? आता दोन महिन्यात निवडणुकीची आचार संहिता लागेल,त्या आधी सगळी विकास कामांची भूमिपूजन उरकून, त्याच्या जाहिराती करायच्या असल्याने भाजपचे मंत्री महोदय जनता दरबाराचा घाट घालत आहे....? त्यातच लोकसभा निवडणुकीच्या वेळी अकार्यश्रम खासदार निवडून आल्याचेही बोलले जात आहे. महामार्गांवर जनता ट्राफिक मुळे त्रस्त असताना,रुग्णवाहिकेत रुग्ण दगवत असताना, डॉक्टर असलेल्या भाजपाचे खासदार काय कामाचे...? पालकमंत्री विधानसभेसाठी जनता दरबार भरवत असून आता, जिल्ह्याला अकार्यश्रम आमदार मिळणार का...? पालक मंत्री रविंद्र चव्हाण हे नेहमी आपल्या शर्टला भाजपचे कमळाचे चिन्ह लावून असतात, म्हणून त्यांना जिल्ह्यात भाजप चे पालकमंत्री म्हणून संबोधन्यात येत आहे.

# मुंबई आहमदाबाद मार्गावर खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी

## वाहन चालकाची तारांबळ, पंधरा कि.मी.साठी लागतात तीन तास

**मनोर, दि. ३० : प्रतिनिधी**

गेल्या चार दिवसांपासून पालघर जिल्ह्यात बरसत असलेल्या परतीच्या पावसामुळे मुंबई अहमदाबाद महामार्गावर वाहतूक कोंडीचे विघ्न निर्माण झाले आहे.निर्माणाधीन उड्डाणपुलांच्या सर्व्हिस रोडवर खड्ड्यांची संख्या वाढल्याने महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे.पालघर तालुक्याच्या हद्दीत सातिवली, जव्हार फाटा आणि नांदगाव फाट्यावर उड्डाणपुलांची कामे सुरु आहेत.पावसामुळे तिन्ही ठिकाणच्या सर्व्हिस रोड वर मोठया संखेने खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमधून वाट काढतांना वाहन चालकांची तारांबळ उडत असून सर्व्हिस रोडच्या भागात



वाहनांचा वेग मंदावत आहे.एखादे वाहन नादुरुस्त झाल्यास वाहतूक कोंडीत मोठी भर पडत आहे. उड्डाणपुलांच्या दोन्ही बाजूंनी वाहनांच्या पाच ते सहा किलोमीटर लांबीच्या रांगा लागल्या आहेत.

दरम्यान वाहतूक कोंडीला कंटाळलेले वाहनचालक विरुद्ध दिशेने वाहने टाकत असल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. महामार्ग पोलीसांची वाहतूक कोंडी सोडवताना दमछाक होत आहे.गेल्या तीन दिवसांपासून वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असल्यामुळे वाहनचालक मेटाकुटीला आले आहेत.

सातिवली ते नांदगाव फाट्या पर्यतच्या पंधरा किलोमीटर अंतरावरील वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी कार आणि छोटी माल वाहतूक करणारे वाहन चालक माहामार्ग सोडून पर्यायी मार्गाचा वापर करीत असल्यामुळे पर्यायी मार्गावर वाहनांची संख्या वाढली आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे दहिसर बहाडोली दरम्यानच्या एकेरी पुलावरील सिग्नल वारंवार यंत्रणा कोलमडून पडत असल्यामुळे पुलावर वाहतूक कोंडी होत आहे. दोन्ही बाजूनी वाहनांच्या रांगा लागत आहेत.

महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी माहामार्ग पोलिसांच्या दुर्वेस मदत केंद्रातील सहा कर्मचारी आणि काही ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यात आले आहेत. नांदगाव फाटा, जव्हार फाटा आणि सातिवली भागात प्रत्येकी दोन पोलीस कर्मचारी आणि एक ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यात आल्याची माहिती दुर्वेस वाहतूक मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी पवन ठाकूर यांनी दिली.

# महेश बालदींचे समर्थक ठाकूर कुटुंबीय शेकापमध्ये!



उरण विधानसभेमध्ये यावेळी महाविकास आघाडीच्या माध्यमातून लाल बावटा फडकवण्यासाठी माझ्यासोबत शेकाप कार्यकर्ता संपूर्ण ताकतीने काम करत आहे. मी आजपर्यंत विविध क्षेत्रात पक्षाच्या आणि माझ्या वैयक्तिक जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून समाज उपयोगी काम केली आहे. महिला सुरक्षा आणि सक्षमीकरण यासाठी आम्ही केलेली काम आहेत ती लोकांपर्यंत आमचे कार्यकर्ते पोहचवत आहेत.

**- प्रितम जनार्दन म्हात्रे, खजिनदार, शेतकरी कामगार पक्ष,रायगड.**

**पनवेल, दि. ३० : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत रायगड मधील उरण विधानसभा सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या ठिकाणी होणारी लढत ही अत्यंत चुरशीची होणार आहे असे बोलले जाते. आपला असलेला गड राखण्याच आवाहन भाजप समर्थक आमदार श्री.महेश बालदी यांच्यासमोर राहणार आहे. तर आपण गेल्या पंधरा वर्षाच्या राजकीय कारकीर्दीत केलेल्या सामाजिक,अध्यात्मिक ,शैक्षणिक,रोजगार निर्माण अशा अनेक कार्याच्या जोरावर पुन्हा विधानसभा खेचून आणण्यासाठी शेकाप चे रायगड जिल्हा खजिनदार श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे संपूर्ण ताकदीने महाविकास आघाडीच्या माध्यमातून संपूर्ण उरण विधानसभा पिंजून काढत आहेत.

उरण विधानसभा क्षेत्रात नेहमीच तरुणांमध्ये लोकप्रिय असलेले प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून आज धुतुम येथील महेश बालदी यांचे अत्यंत जवळचे आणि भाजपचे अध्यक्ष रोशन ठाकूर यांनी त्यांचे वडील रामशेठ ठाकूर यांच्यासोबत संपूर्ण कुटुंबीय आणि मित्र-परिवारा सोबत मा.आमदार श्री. बाळाराम पाटील आणि शे.का.प. नेते पनवेलचे मा.नगराध्यक्ष.जे.एम.म्हात्रे यांच्या उपस्थितीत.प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला.

यावेळी बोलताना शेकाप नेते ज्ञानेश्वर मोरे यांनी सांगितले की प्रत्येक वेळी पक्ष प्रवेश करताना सगळेजण स्वतःसाठी काही मागणी ठेवतात आणि प्रवेश करतात यावेळी सुद्धा ठाकूर कुटुंबीयांनी महेश बालदी यांना आमदार या पदावरून पायउतार करण्याची मोठी मागणी केली आहे त्यासाठी आम्ही दिवस-रात्र एक करू आणि भरघोस मतांनी श्री.प्रितमदादा म्हात्रे यांना निवडून आणू ही मागणी त्यांनी केली याचा आम्हाला सांगायला अभिमान वाटतो. यावेळी प.पं.स. मा.सभापती काशिनाथ पाटील कृ.उ.बा.स. सभापती नारायणशेठ घरत,उरण विधानसभा चिटणीस पत्रकार माधव पाटील, पनवेल जिल्हा चिटणीस विभागीय चिटणीस विलास फडके, चिटणीस राजेश केणी, उपस्थित होते.

# दूरदृष्टी विचारात घेऊन माळरान डोंगर होणार हिरवागार



**डहाणू, दि. ३०: प्रतिनिधी**

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" या विचारधारेनुसार "पेंस सहयोग फाउंडेशन" च्या प्रारंभ नर्सरी उपक्रमांतर्गत डहाणू तालुक्यातील गंजाड गॅलनपाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व ग्रामस्थांनी शाळेजवळच्या ओसाड माळरानावर २०० झाडांची लागवड केली. या उपक्रमात वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, पेरू, जांभूळ, करंज अशा विविध उपयुक्त झाडांचा समावेश होता.

या झाडांची परिसरात कमी प्रमाणात लागवड होत असल्यामुळे, याचं महत्त्व अधिक आहे. संस्थेने दूरदृष्टी ठेवून ही झाडे लागवड केली आहेत. ही झाडे पर्यावरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. झाडे जमिनीची धूप रोखण्यासाठी, सावली देण्यासाठी तसेच पक्षी आणि प्राण्यांच्या निवाऱ्यासाठी महत्त्वाची ठरणार आहेत. झाडांच्या संरक्षणासाठी "पेंस फाउंडेशन" कडून ग्रीन नेट पुरवण्यात आल्या. शाळा व्यवस्थापन समितीने ग्रीन नेट बसवण्यासाठी उत्साहाने सहभाग घेतला.

या उपक्रमाचे आयोजन शाळेतील शिक्षक शंकर आमटे, नीलम पाटील, शंकर कुवरा यांनी केले. समितीचे अध्यक्ष हेमंत हाडळ, ग्रामपंचायत सदस्य विनोद गडग आणि गावातील इतर नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत डहाणूच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

**डहाणू, दि. ३० : प्रतिनिधी**

मुंबईच्या अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे खेळण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत डहाणूतील खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर विविध गटांमध्ये पदके जिंकत चमकदार कामगिरी केली आहे.

अक्षिता रमेश ठाकरे हिने दोन सुवर्ण पदके पटकावून तिच्या प्रबळ कौशल्याचे प्रदर्शन केले. श्रेयस रमेश ठाकरे याने रजत पदकाची कमाई केली. मेहर्ष भरत पाटील याने सुवर्ण पदक जिंकत स्पर्धेत आपले प्रभुत्व सिद्ध केले. दक्ष रवी पटनाईक याने दोन सुवर्ण पदके मिळवून प्रेक्षकांचे मन जिंकले. दिव्यता रवी पटनाईक हिने सुवर्ण आणि कास्य पदके जिंकून तिच्या उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवले. कुशल कनया ठाकूर याने कास्य पदक मिळवून आपल्या मेहनतीचा पुरावा दिला. ह्धिम नीलमकुमार कडू याने रजत पदक मिळवून स्पर्धेत आपली छाप पाडली.

या मुलांना डहाणूतील आगर नानी माता मंदिर आणि केवडा देवी मंदिर परिसरात नियमित प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षक सेन्साई कैलाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कठोर परिश्रम करत ही यशस्वी कामगिरी साधली. 'ट्रॅडिशनल अँड स्पोर्ट्स शोतोकान कराटे असोसिएशन ऑफ इंडिया' या संघटनेच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.




# उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात औषधांचा तुटवडा, रुग्णांचे प्रचंड हाल

**उल्हासनगर दि. ३० : प्रतिनिधी**

उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात औषध बिलांची लाखो रुपयांची थकबाकी आणि शासनाने वेळीच अनुदान न दिल्याने मध्यवर्ती रुग्णालय प्रशासन औषध पुरवठादारास थकीत बिल देण्यास असमर्थ ठरल्याने पुरवठादाराने गेल्या चार महिन्यांपासून औषधे देणे बंद केल्याने . रुग्णालयात औषधांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. राज्य सरकारने १५ ऑगस्ट २०२३ रोजी मोफत उपचार योजना सुरू केली. ही योजना उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयातही सुरू करण्यात आली आहे. मध्यवर्ती रुग्णालयात २०२ बेड उपलब्ध आहेत . दरमहा दोन हजार रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. या रुग्णालयात उल्हासनगर व्यतिरिक्त जवळच्या अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड , शहापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गरीब व आदिवासी रुग्ण मोठ्या प्रमाणात उपचारासाठी येत असतात.

औषधे, प्रयोग शाळेतील रसायने व अन्य इतर साहित्याचा खर्च ३५ लाख १६ हजार ८२८ रुपये झाला आहे. या रकमेपैकी ३ लाख ६ हजार ५६० रुपये प्रयोगशाळेच्या साहित्याचा खर्च आहे. मात्र गेल्या चार महिन्यापासून शासनाने अनुदान दिले नसल्याने औषधांचा पुरवठा बंद झाला आहे. रुग्णांना मोफत औषध देणे बंद करण्यात आल्याने रुग्णांना स्वतःच्या खर्चाने औषध घ्यावे लागते, यात गरीब, आदिवासी रुग्णांचे व त्यांच्या नातेवाईकांचे हाल होत आहेत . दुसरीकडे मेडिकल स्टोअर्सचे मालक आपले उखळ पांढरे करून घेत आहेत. तर मोफत औषध योजना केवळ मध्यवर्ती रुग्णालयातच नाही तर बदलापूर ग्रामीण, अंबरनाथच्या छाया हॉस्पिटल मध्येही आहे.

या बाबत उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ मनोहर बनसोडे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की २५ सप्टेंबर रोजी जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांना लेखी माहिती देण्यात आली आहे. पूर्वी केसपेपर आणि उपचारासाठी दहा रुपये घेतले जात होते. त्यामुळे काहीतरी उत्पन्न मिळत होते. मात्र त्या नंतर सरकारने ते देखील बंद केल्याने उत्पन्नाचे स्रोत संपुष्टात आले आहे .

उल्हासनगर शहराचे मध्यवर्ती रुग्णालयातील कल्याण लोकसभा क्षेत्रात येत असून या क्षेत्राचे खासदार डॉ श्रीकांत शिंदे हे स्वतः डॉक्टर आहेत, त्यांच्या पुढाकाराने अंबरनाथ शहरांमध्ये मेडिकल कॉलेजच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे . तसेच उल्हासनगर महानगरपालिकेने स्वतःचे रुग्णालय ही सुरू केले आहे. मात्र गेल्या चार महिन्यापासून मध्यवर्ती रुग्णालयात औषध उपलब्ध नसल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची परिस्थिती फार बिकट झालेली आहे. याबाबत ते अनभिज्ञ असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. शहरातील स्थानिक नेते देखील याप्रकरणी लक्ष देत नसल्याच्या तक्रारी सर्वसामान्य नागरिक करीत आहेत.

# अंबरनाथ येथील जिन्स कारखान्यावर कारवाई करण्याची आरपीआयची मागणी

**अंबरनाथ, दि. ३० : प्रतिनिधी**

अंबरनाथ पुर्वेला जिन्स वॉशिंग चे कारखाने बिनधास्तपणे सुरु आहेत. या कारखान्याचे दुषीत पाणी वालधुनी नदीत सोडण्यात येत असल्याने नदीचे पाणी दुषीत झाल्याने मुक्या जनावराना यांचा धोका असुन नदी काठावर राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यास सुध्दा धोका निर्माण झाला आहे. तेव्हा या अनधिकृत जिन्स कारखान्यावर कारवाई करा, अशी मागणी आर पी आय चे ( आठवले ) अंबरनाथ शहर अध्यक्ष दिपक धनावडे यांनी महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

अंबरनाथ पुर्वेला असलेल्या एम आय डी सी जवळील वैभव हॉटेल परिसरात अनधिकृतपणे जिन्स वॉशचे कारखाने सुरु आहेत. या कारखान्यामध्ये जिन्सच्या कापडावर रासायनिक प्रक्रिया करुन त्या कापडाला वॉश करण्यात येते. तेव्हा जिन्स वॉश केलेले पाणी हे कारखानदार वालधुनी नदीत सोडतात. त्यामुळे वालधुनी नदी प्रदुषीत होत आहे. दरम्यान याच नदीतील पाणी जनावरे पिले तर त्यांच्या जिवाला धोका असुन वालधुनी नदीकाठावर राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याला सुध्दा धोका निर्माण होणार आहे. सोबतच केमिकल कंपन्यावाले सुध्दा या नदीत दुषीत केमिकल सोडत असल्याने नागरिकाना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. तेव्हा या वॉश करणाऱ्या जिन्स कारखान्यावर महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने ताबडतोब कारवाई करावी अशी मागणी अशी आर पी आय चे अंबरनाथ शहर अध्यक्ष दिपक धनावडे यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे. जर का या कारखान्यावर कारवाई झाली नाही तर आर पी आय च्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा धनावडे यांनी निवेदनात दिला आहे.

# भिवंडीत सर्पमित्रांकडून 2 अजगरांना जीवदान

**भिवंडी, दि. ३० : प्रतिनिधी**




पावसाळा म्हंटल की विविध प्रजातीतील सर्पांची भक्षाच्या शोधात वनातून गावातील शेतात किंवा कोंबड्यांच्या खुराड्यात आणि बोकडांच्या फार्मात रेलचेल सुरू असते.तसेच रस्ते प्रकल्पांमुळे झालेल्या जंगलतोडीमुळेही जनावरे आश्रयासाठी गावाकडची वाट धरतात.या प्रमाणेच भिवंडी तालुक्यातील पडघा हद्दीतील दोन वेगवेगळया ठिकाणी भक्षासह निवाऱ्यासाठी आलेल्या दोन अजगरांना सर्पमित्रांनी जीवदान दिले आहे.यातील पहिल्या ठिकाणी पडघा परिसरातील तुळशी गावाजवळ ग्रामस्थ उमेर चिखलेकर यांच्या बोकडांच्या फार्म मध्ये शुक्रवारी २७ सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास भक्षाच्या शोधात तब्बल साडे सात फुटी नर अजगर शिरला होता. दरम्यान याची माहिती मिळताच पडघ्यातील समतानगर आणि वांद्रे येथील सर्पमित्र रवि नाना दांडगे व मयूर शांताराम बजागे यांना मिळताच त्यांनी तूर्तास त्या ठिकाणी जाऊन वनाअधिकारी शैलेश देऊरे यांच्या मार्गदर्शनाखाली अजगराला जंगलात सोडले. तर दुसऱ्या ठिकाणी पडघ्यातील कुकसे गावातील बच्चु सावळा राम पाटील यांच्या शेतात २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता भलामोठा नऊ फुटी अजगर असल्याची माहिती सर्पमित्र रवि,मयूर, मोरेश्वर बजागे यांना मिळाली असता त्यांनी देऊरे व विकास उमतोल यांच्या उपस्थितीत अजगराला रेस्क्यु करून सुखरूप पर्यावरणात सोडले आहे.

# डोंबिवलीजवळ सहा कोटीची व्हेल माशाची उलटी जप्त

**कल्याण, दि. ३० : प्रतिनिधी**

कल्याण गुन्हें शाखेंच्या पथकानें डोंबिवली जवळील काटई बदलापूर रस्त्यावरील मानपाडा येथील मौर्या ढाब्याच्या बाजुला तीन जणांकडून व्हेल माशाची उलटी (ओकारी) शुक्रवारी जप्त केली. हे आरोपी पनवेल जवळील रहिवासी आहेत. या उलटीची बाजारातील किंमत सहा कोटी २२ लाख रूपये आहे. अनिल राधाकृष्ण भोसले, अंकुश शंकर माळी, लक्ष्मण शंकर पाटील अशी अटक आरोपींची नावे आहेत. हे सर्व आरोपी पनवेल परिसरातील वावंजे-मोहोदर, कासव, न्यू पनवेल भागातील रहिवासी आहेत. आरोपींना कल्याण न्यायालयाने येत्या मंगळवार पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. कल्याण गुन्हे शाखेचे साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले यांना पनवेल भागातील तीन जण डोंबिवली परिसरात व्हेल माशाची उलटी विक्री करण्यासाठी येणार आहेत, अशी गुप्त माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे, साहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष उगलमुगले, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली काटई बदलापूर रस्ता भागात पोलिसांनी सापळा लावला. ठरल्या वेळेत तीन जण मानपाडा भागातील मौर्या ढाब्या जवळ एक मोटारीतून आले. पोलिसांनी या मोटीराला घेरले. मोटारीतील तीन जणांची चौकशी केली. ते उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. त्यांच्या जवळील सफेद बंदिस्त पिशवीची पोलिसांनी झडती घेतली. त्यामध्ये व्हेल माशाची उलटी आढळून आली.

# गीतकार,पत्रलेखक अरविंद जगताप आले विद्यार्थ्यांच्या भेटीला

**वाडा, दि. ३० : प्रतिनिधी**

तालुक्यातील नेहरोली येथील शारदा विद्यालयात इयत्ता दहावीच्या मराठी कुमारभारती पाठ्यपुस्तकातील 'आप्पांचे पत्र' या पत्राचे प्रसिद्ध पत्रलेखक,कवी,गीतकार व पटकथालेखक अरविंद जगताप यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांशी आभासी पद्धतीने मुक्तसंवाद साधला.

'चला हवा येऊ द्या' यासारख्या मराठी कार्यक्रमातून त्यांची सुदंर पत्रे महाराष्ट्राबाहेर वाचकांपर्यंत पोहचली.त्यांचे 'गोष्ट छोटी डोंगराएवढी','पत्रास कारण की' हे ग्रंथ प्रकाशित आहेत.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले की,तुमच्या वहीचं शेवटचे पान हे भरलेलं असावे त्यामधून आपले कलागुण दिसून येतात.त्यातूनच ध्येय निश्चित करावे.

तसेच मुख्याध्यापक व शिक्षक विद्यार्थ्यांना तर नेहमीच पत्र लिहितात पण;शाळेतील शिपाई काकांनाही विद्यार्थ्यांशी हृदयगत संवाद साधावासा वाटतो म्हणून पत्राद्वारे आप्पा हितगुज करतात. अनेक शाळांमध्ये शिपाई काकांचे सत्कार करण्यात येत आहेत.हे या पत्राचे यश आहे.

त्याचबरोबर आगामी दहावी बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छाही विद्यार्थ्यांना दिल्यात. या उपक्रमाचे आयोजन प्रशाळेतील उपक्रमशील शिक्षक,कवी व संशोधक ललित पाटील यांनी केले होते.

"चला हवा येऊ द्या या सारख्या गाजलेल्या कार्यक्रमामधून अभिनेता सागर कारंडे यांनी अरविंद जगताप यांची पत्रे वाचकांच्या हृदयापर्यंत पोहचलीत.त्या पाठ्यपुस्तकातील पत्रलेखकांना पाहण्याची व त्यांच्याशी संवाद साधण्याची विद्यार्थ्यांना उत्कंठा होती.या हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते."

**ललित पाटील,**
**उपक्रमशील शिक्षक,**
**शारदा विद्यालय,नेहरोली**

# मुंगीलालच्या गरबा महोत्सवात हायटेक रोबोट करणार आरती

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३० :

श्री गुजराती सेवा समितीद्वारे संचालितश्री गुजराती नवरात्री महोत्सव समितीच्या वतीने शहरातील मुंगीलालविद्यालयाच्या प्रांगणातगुरुवार, ३ ते ११ ऑक्टोबर पर्यंत गरबाम होत्सव आयोजित करण्यात आला आहे. यंदा महोत्सवात हायटेक रोबोट आरती, सेलिब्रिटींची उपस्थिती खास आकर्षण ठरणार आहे. गरबामहोत्सवात नागरिकांसाठी गुजराती संस्कृतीची अस्सल सांस्कृतिक व पारंपरिक लोककला बघावयास मिळणार असल्याची माहिती रविवारी मुंगीलालबाजोरियावि द्यालय प्रांगणात आयोजितगरबा महोत्सवाच्या पत्रकार परिषदेत समितीचे हरीश लाखानी यांनी दिली.



समितीचे अध्यक्ष वालजी पटेल, हेमेंद्र राजगुरू, मनोज भीमजियानी, दिनू सोनी, आशिष वखारीया, अरविंद पटेल, कपिल ठक्कर, महिला मंडळाच्या शीतल रुपारेल, अनिषा वखारिया आदी पदाधिकारी उपस्थित होते. महोत्सवात प्रथमच रोबोटद्वारे मातेची आरती करण्यात येणार आहे. उत्सवात प्रवेश मेन हॉस्पिटल समोरील मुंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारातून असून आत दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. अरुण मोदी, श्वेता मोदी व राकेश चौहानची एआर संगीत टीमबेंजो व ढोलकीच्या पारंपरिक वाद्यांवर संगीत उधळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मातेच्या पूजा अर्चना व जागरणाचे प्रतीक म्हटल्या जाणाऱ्या या नवरात्राच्या गरबा महोत्सवात घट स्थापना, दैनिक चंडीपाठ, दैनिक आरती, पूजन करण्यात येणार असून अष्टमीच्या दिवशी प्रांगणात होम हवन करण्यात येत येणार आहे.

यावेळी पुरुषगरबा प्रेमींसाठीविशेष व्यवस्था प्रांगणात करण्यात आली असून मातृशक्तीने अस्सल भारतीय पारंपरिक पेहरावातच प्रांगणात गरबाखेळून भारतीय संस्कृती व सभ्यता जपावी तसेच युवावगार्नेही मातृशक्तीच्या या जागरण महोत्सवात कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घेत समितीला सहकार्य करावे, असे आवाहन समितीचे हरीश लाखानी यांनी यावेळी केले.

**३ ऑक्टोबरला घटस्थापना**

गुरुवार ३ ऑक्टोबर रोजी घटस्थापना दिनी सायं ७ वाजता मुंगीलालबाजोरियावि द्यालय प्रांगणात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. आयोजित यागरबामहोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यास व नित्यगरबाखेळण्यास नागरिक महिला-पुरुषांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# थायलंडच्या देवीचे मंदीर वेधणार लक्ष

## जयहिंद दुर्गा उत्सव मंडळातर्फे देखावा उभारण्याची तयारी सुरू

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३० :

संपूर्ण देशात दुसऱ्या क्रमांकाचा नवरात्रोत्सव मानल्या जाणाऱ्या यवतमाळ शहरातील नवरात्री उत्सवाला येत्या पाच दिवसात प्रारंभ होत आहे. यंदाही भव्य-दिव्य प्रमाणात हा नवरात्री उत्सव साजरा करण्यासाठी सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळांनी तयारी चालवली आहे. त्यासाठी दुर्गोत्सव मंडळांचे सदस्य आणि पदाधिकारी यांची सुरू असलेली लगबग सर्वत्र पहावयास मिळत आहे. यंदा जयहिंद दुर्गा उत्सव मंडळाने थायलंड येथील एका देवीच्या मंदिराचा देखावा उभारण्यास सुरवात केली असून हा देखावा सर्वांचे लक्ष वेधणार आहे.



यवतमाळ जिल्ह्यात नवरात्री उत्सव भव्य-दिव्य प्रमाणात साजरा करण्यात येतो. त्यातही यवतमाळ शहरात तर सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळांकडून या काळात विविध प्रकारचे आकर्षक देखावे साकारण्यात येतात. हे देखावे पाहण्यासाठी जिल्ह्यातूनच नव्हे तर शेजारच्या जिल्ह्यातून आणि राज्यातून हजारो भाविक गर्दी करीत असतात. त्यामुळे यवतमाळच्या नवरात्री उत्सवाला वैभवी रुप प्राप्त होते. यंदाही नवरात्री उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्याची तयारी सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळांनी सुरू केली आहे. त्यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारणीचे नवरात्रोत्स वादरम्यान शहरात दहाही दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते.

अन्नदान, गरबा नृत्य, सांस्कृती कार्यक्रम, स्त्री भ्रूणहत्या, लैंगीक अत्याचाराविरोधात बॅनर्स, पोस्टरद्वारे जनजागृती, अनाथ आश्रमांमध्ये अन्नदान करण्यात येणार आहे, असे पारस अराठे, अध्यक्ष, जयहिंद दुर्गा उत्सव मंडळ, यवतमाळ यांनी सांगितले.

# आदिवासी जमातीमध्ये घुसखोरी थांबवावी

## जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३० :

आरक्षणा मधील घुसखोरी कदापीही सहन केली जाणार नाही. शासन विविध कायदे करुन आदिवासींना जंगलामधून हुसकावून लावत आहे. आम्हाला नक्षलवादी होण्यास भाग पाडू नका, असा निवार्णीचा इशारा आदिवासी बांधवांनी शासनाला दिला आहे. कोणत्याही जातीला आदिवासी जमातीमध्ये आरक्षण देऊ नये, या मागणीसाठी आदिवासी समाज संघटनेतर्फे शनिवारी दि. २८ सप्टेंबर रोजी एक दिवसाचे धरणे आंदोलन स्थानिक आझाद मैदानाजवळील महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्यासमोर करण्यात आले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर हेच धांगड (धनगड) असून आदिवासी समाजात धनगर जातीचा समावेश करण्यासाठी जीआर काढणार असे वक्तव्य केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने धनगर हे आदिवासी नाही असा निवाडा दिल्यानंतरही असे वक्तव्य करणे चुकीचे आहे. आपल्यावर होणा?्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शनिवारी एक दिवसीय धरणे आंदोलनातून रोष व्यक्त करण्यात आला. यावेळी सुरेश कन्नाके, एम. के. कोडापे, नरेश गेडाम, प्रमोद घोडाम, गुलाब कुडमथे, अरविंद मडावी, संतोष पारधी, बाबाराव उईके, बाळू वट्टी, बंडू मसराम, नरेश उईके, निशांत सिडाम, नरेश उईके, मनिषा तिरणकार, रेखा कन्नाके, निकिता उईके, मंदा मडावी आदी उपस्थित होते.

# कृऊबासचा भाजी, फळ बाजार चिखलमुक्त होणार



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३० :

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळे आणि भाजी बाजाराला चिखलमुक्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु झाले आहेत. शनिवारी पार पडलेल्या आमसभेत या विषयावर शिक्कामोर्तब झाले. येत्या काळात लवकरच आराखडा तयार करुन प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केली जाईल, असे सभापती हरिश मोरे यांनी सांगितले.

जुना कॉटन मार्केट या नावाने असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जुन्या इमारतीत फळे व भाजीबाजार भरवला जातो. अमरावती जिल्हाच नव्हे तर शेजारचे काही जिल्हे आणि दूरवरुन या ठिकाणी भाजीपाला व फळे विक्रीसाठी येतात. परंतु अपुऱ्या सोयी-सुविधा असल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांत याठिकाणी चिखल साचतो. त्यामुळे घाणेरडा वास सहन करीत ग्राहकांना चिखलातून वाट काढावी लागते. गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी, अडते, हमाल, मापारी, ग्राहक आणि व्यवसायिक हा त्रास सहन करित आहेत.

कृऊबास प्रशासनाला यासंदर्भात वेळोवेळी माहितीही देण्यात येऊन दुरुस्तीची मागणीही करण्यात आली. परंतु अद्यापही तसा मुहूर्त निघाला नाही. दरम्यान शनिवारी आमसभेत पुन्हा या विषयाने डोके वर काढले. उपस्थित सदस्यांनी याबाबत सविस्तर मांडणी केली. त्यामुळे संचालक मंडळाने हा विषय मान्य केला असून फळे व भाजीबाजाराला चिखलमुक्त करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. त्यामुळे येत्या काळात सदर कामाचा रितसर आराखडा तयार करुन पुढच्या पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे.

सदर बांधकाम करण्यासाठी भाजी व फळे विक्रेत्यांना काही काळापुरती पयार्यी जागा उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे. त्यासाठी बडनेरा येथील उपबाजार आणि आजू-बाजूच्या परिसरातील जीनांचे मालक यांच्याशी बोलणी सुरु करण्यात आली आह.

# खामगावात ३०२ घरांत आढळली डास अळी

■ महासागर प्रतिनिधी, खामगाव, दि. ३० :

आरोग्य पथकाच्या वतीने दि. २६ सप्टेंबर रोजी शहरातील विविध प्रभागांमध्ये कंटेनर सर्वेक्षण व डेंग्यू जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आला. जिल्हा हिवताप अधिकारी चव्हाण, सहाय्यक जिल्हा हिवताप अधिकारी पांडे व होगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. खंडारे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. नीलेश टापरे तसेच नगर पालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत शेळके, तालुका आरोग्य पर्यवेक्षक करंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबवण्यात आला. या दरम्यान शहरातील विविध प्रभागांमध्ये आरोग्य पथकांकडून तीन हजार ३९५ घरांची तपासणी करण्यात आली.

त्यापैकी ३०२ ठिकाणी डास अळ्या आढळून आल्या. त्या नष्ट करून पथकाकडून रिकाम्या भांड्यांमध्ये पाणी न साचू देण्याबाबत तसेच डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात आरोग्य निरीक्षक पागृत, बडे, खराटे, नितीन देशमुख, उन्हाळे, पायघन, मानवतकर, लाकडे, काटे, भोके, खामगाव नगर पालिकेचे आरोग्य निरीक्षक निळे, आरोग्य निरीक्षक राजपूत यांच्यासह खामगाव, शेगाव, नांदुरा तालुक्यातील आरोग्य सेवक, आरोग्य निरीक्षक, आशा सेविकांचा सहभाग होता.

# ...तर माणिकराव मुख्यमंत्री झाले असते : माजी मंत्री नितीन राऊत

■ महासागर प्रतिनिधी, दारव्हा, दि. ३० :

कुठलेही सरकार असो अथवा राजकीय नेता हा विशिष्ट जाती-धमार्चा किंवा पंथाचा नसतो. तो सर्व समाजाचे प्रतिनिधीत्व करीत असतो. आजही माणिकराव ठाकरे हे कोणताही भेद न पाळता लोकांची तळमळीने कामे करीत आहेत. एका सज्जन व कर्तृत्ववान माणसाला खरे तर जनतेने साथ देणे गरजेचे असते.



मात्र दुर्दैवाने त्यांना त्याकाळी साथ मिळाली नाही. तुम्ही माणिकरावांच्या पाठीशी राहिले असते तर, ते कधीचेच राज्याचे मुख्यमंत्री झाले असते, असे प्रतिपादन काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री आ. नितीन राऊत यांनी यावेळी केले. ते दारव्हा येथील काँग्रेस कार्यकर्ता बैठकीच्या निमित्ताने बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री नितीन राऊत तर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून माणिकरावजी ठाकरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते प्रवीण देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल ठाकरे, पी. बि. आडे, दारव्हा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश नवरंगे, नेर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनायक भेंडे, यासह दारव्हा दिग्रस नेर येथून आलेले पदाधिकारी दारव्हा तालुका काँग्रेस कमिटीचे सर्व कार्यकर्ते शहरासह ग्रामीण भागातून आलेले असंख्य कार्यकर्ते महिला कार्यकर्ते युवक काँग्रेसचे सर्व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी आयोजित काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना माणिकराव ठाकरे म्हणाले की, सरकार हे कोणत्याही एका धर्माच नसते.

एका जातीला, एका धमार्ला न्याय देणारे नसते असे सांगितले. यावेळी चर्मकार समाजाचे नेते प्रशांत सुरस्कार व त्यांच्या कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. राहुल ठाकरे यांनी आपल्या भाषणात नवे कार्यकर्ते पक्षामध्ये जोडा, असे आवाहन केले.

काँग्रेसचे पी. बी. आडे यांनीही आपल्या भाषणातून बंजारा समाजाला काँग्रेसने भरपूर काही दिले, असे सांगितले. वसंतराव नाईक व सुधाकरराव नाईक हे दोन्ही मुख्यमंत्री काँग्रेसनेच राज्याला दिले. तांड्या-तांड्यावर दारिद्यात जीवन जगणारा समाज या दोन्ही मुख्यमंत्र्यांमुळे विकासाच्या प्रवाहात आला.

# युवा महोत्सव; तिसऱ्या दिवशी विविध कला गुणांचे दर्शन

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३० :

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात गेल्या तीन दिवसांपासून विद्यापीठाचा "छात्र तरंग' युवा महोत्सव रंगला आहे. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी या महोत्सवात विविध कलांचे रंग भरले. सोमवारी, ३० सप्टेंबर रोजी या महोत्सवाचा समारोप होणार आहे.



शास्त्रीय नृत्यात प्रामुख्याने कथ्थक आणि ओडिसी नृत्य सादर करण्यात आली. नृत्य स्पर्धेमध्ये वाशीम आणि बुलडाणा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य आणि आदिवासी नृत्य सादर केली. लोकनृत्यात जागरण, आराधी, खंडोबा, गोंधळ व विविध आदिवासी नृत्यांचा समावेश होता. चिकट कला अंतर्गत विद्यार्थ्यांनी निसर्ग, फेस मास, ॲनिमल अशा पद्धतीचे वेगवेगळ्या प्रकारची कलाकृती सादर केली. फोटोग्राफी अंतर्गत ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तर ऑन द स्पॉट पेंटिंग, तसेच पोस्टर मेकिंग स्पर्धेमध्ये पाणी वाचवा जीवन वाचवा , आर्टिफिशियल इंटेलिजन्स, व्यसनांच्या विळख्यात तरुण या विषयावरची विविध वास्तववादी चित्रे विद्यार्थ्यांनी रेखाटली. माती कलेअंतर्गत मुला-मुलींनी आपल्या कलेची चुणूक दाखवली. वादविवाद स्पर्धेत अमरावती ग्रामीण व शहर यातील महाविद्यालयांनी सहभागी सहभाग नोंदवला. यामध्ये "परिवारो मे घटती नैतिक शिक्षाही समाज मे बढते दुष्कर्म का कारण है या विषयावर विरोधी व बाजूने विद्यार्थ्यांनी मते व्यक्त केली. एकांकिका स्पर्धेत अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, स्त्री सक्षमीकरण, व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी एकांकिका सादर केल्या.

# मारेगावच्या महाआरोग्य शिबिरात एक हजार ६०० रुग्णांची तपासणी

■ महासागर प्रतिनिधी, मारेगाव, दि. ३० :

काँग्रेसतर्फे मारेगाव येथील लोढा हॉस्पिटल येथे पार पडलेल्या महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील सुमारे एक हजार ६०० रुग्णांनी या शिबिरात तपासणी केली. शनिवारी दि. २१ सप्टेंबर रोजी शिबिर पार पडले. या महाआरोग्य शिबिरात रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी, रोग निदान, ईसीजी, रक्त तपासणी, बीएमडी तपासणी करण्यात आली. यावेळी रुग्णांना मोफत प्राथमिक औषधी वितरण केले गेले.

तसेच ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज आहे. अशा रुग्णांची अत्यल्प दरात शस्त्रक्रिया केली जाणार आहे. माजी आमदार वामनराव कासावार यांच्या नेतृत्वात व काँग्रेसचे प्रदेश कमिटी सदस्य डॉ. महेंद्र लोढा यांच्या संयोजनात हे शिबिर घेण्यात आले.

सकाळपासूनच तालुक्यातील रुग्णांनी नोंदणीसाठी गर्दी केली होती. दुपारी १२ वाजता वामनराव कासावार यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी नरेंद्र ठाकरे, अरुणा खंडाळकर, गौरीशंकर खुराणा, संध्या बोबडे, मारोती गौरकार, रविंद्र धानोरकर, राजू कासावार, आशिष खुलसंगे, घनश्याम पावडे, ओम ठाकूर, डॅनी सँड्रावार, माया गाडगे, आकाश बदकी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माया गाडगे यांच्या मार्गदर्शनात व वामनराव कासावार यांच्या नेतृत्वात अजाबराव गजबे, पुष्पा उलमाले, ताई भोयर यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. कामाच्या व्यापामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. अनेक रुग्ण आजारपण अंगावर काढतात.

त्यामुळे आजार वाढत जातो. मोफत आरोग्य शिबिरामुळे रुग्णांमध्ये आरोग्यविषयक जागरुकता वाढते. असे मनोगत उद्घाटन प्रसंगी वामनराव कासावार यांनी व्यक्त केले.

शिबिराचे प्रास्ताविक डॉ. महेंद्र लोढा यांनी केले. काँग्रेसतर्फे वेळोवेळी असे सामाजिक उपक्रम सुरु राहतात. याचाच एक भाग म्हणून संपूर्ण विधानसभा क्षेत्रात महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले, असे डॉ. महेंद्र लोढा म्हणाले. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. महेंद्र लोढा, मधूमेह व हृदयरोग तज्ज्ञ डॉ. रोहित चोरडिया, बालरोग तज्ज्ञ डॉ. पवन राणे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. सुबोध अग्रवाल. पोटविकार तज्ज्ञ डॉ. अक्षय खंडाळकर, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. स्वप्निल गोहोकार व डॉ. निखिल लांबट, दंतरोग तज्ज्ञ डॉ. अमोल पदलमवार, जनरल फिजिशियन डॉ. राजेंद्र लोढा, डॉ. प्रवीण मत्ते, डॉ. नईम शेख, डॉ. विवेक गोफणे यांनी रुग्णांची तपासणी केली.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी रक्त तपासणी विभागाचे खापर्डे, काँग्रेसचे तुळशीराम कुमरे, समीर कुळमेथे, शाहरुख शेख, नंदेश्वर आसुटकर, रवि पोटे, यादवराव पांडे, यादवराव काळे, सुरेश चांगले, अंकुश मापुर यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, लोढा हॉस्पिटल मारेगाव व लोढा हॉस्पिटल वणी यांच्या चमुंनी परिश्रम घेतले.

तालुक्यातील सुमारे एक हजार सहाशे पेक्षा अधिक रुग्णांनी तपासणी केली. रुग्णांवर मोफत औषधोपचार करण्यात आले. सुमारे २५० रुग्णांना गंभीर आजार असल्याचे निदान झाले. त्यांच्यावर लोढा हॉस्पिटल वणी व मारेगाव येथे अत्यल्प दरात पुढील उपचार केला जाणार आहे.

# आमदार नितीन देशमुख यांच्या मुलावर युवकांचा हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३० :

शिवसेनेचे आमदार नितीन देशमुख यांचा मुलगा पृथ्वीराजवर काही युवकांनी हल्ला केल्याची घटना रविवारी दुपारी नेकलेस रोडवर घडली. पृथ्वीराजवर दगडी पाटाही उगारण्यात आला. मात्र, काहींनी रोखल्याने पुढील अनर्थ टळला. दुचाकीस्वाराने साइड न दाखवण्यावरून हा वाद झाला. पोलिसांनी तीन युवकांना ताब्यात घेतले आहे. हल्लेखोरांवर कारवाईसाठी मोठ्या संख्येने शिवसैनिकांनी सिव्हील लाइन्स पोलिस ठाण्यात धाव घेतली. या घटनेमुळे पुन्हा एकदा महानगरातील वाढत्या गुंडगिरीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

पृथ्वीराज देशमुख हा मित्रासोबत दुचाकीने नेकलेस रोडवरून जात होता. त्याच्या मित्राने दुचाकी आयटीआयकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ थांबवली. काही क्षणातच पृथ्वीचे आणखी मित्र तेथे आले. तेव्हढ्यात एक दुचाकीस्वार तेथे आला व पृथ्वीच्या मित्रांशी साइड न दाखवल्यावरून त्याने जाब विचारला. नंतर हे प्रकरण मिटले. त्याच वेळी जवळच राहणाऱ्या चार-पाच युवकांचे टोळके आले व पृथ्वी व त्याच्या मित्राशी वाद घातला.

मध्यस्थीसाठी गेलेल्या पृथ्वीराजला या टोळक्याने जबर मारहाण केली. चेहऱ्याला मुका

**तिघांना घेतले ताब्यात**



मार लागला. यातील एकाने थेट दगडी पाटाच पृथ्वीवर उगारला. मात्र, काहींनी मध्यस्थीने केल्याने भांडण मिटले. मुलावर हल्ला झाल्याची माहिती आ. देशमुख यांना मिळताच त्यांनी सिव्हील लाइन्स पोलिस ठाण्यात धाव घेतली. शिवसैनिकही मोठ्या संख्येने पोहोचले.

आमदार पुत्राला झालेल्या मारहाणीत काही युवकांना पोलिसांना ताब्यात घेतल्याची माहिती एकाने वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांना शासकीय विश्रामगृहात दिली. काही वेळाने वंचितचे नेते अशोक सोनोने, राजेंद्र पातोडे, प्रमोद देंडवे व गजानन गवईसह अन्य कार्यकर्ते सिव्हील लाइन्स पोलिस ठाण्यात आले. तेथे आ. देशमुख, पश्चिमचे प्रमुख राजेश मिश्रा, विकास पाटील, ज्ञानेश्वर म्हैसने आदी होते. आ. देशमुख व वंचितच्या नेत्यांमध्ये चर्चा झाली. आ. देशमुख व अशोक सोनोने यांनी निवडणूक लढण्याबाबत विचारपूसही केली.

तेव्हढ्यात घटनास्थळी असलेला युवक आला व दोन्ही बाजूने वाद झाल्याचा दावा केला. मात्र आ. देशमुख यांच्या १६ वर्षाच्या मुलाला ३५-३६ वर्षांच्या व्यक्तींनी जबर मारहाण केली असून, काही वाईट घडले असते व हेच तुमच्या मुलासोबत झाले असते तुम्ही कोणती भूमिका घेतली असती, असा सवाल केला. आम्ही तक्रार केली, असेही ते म्हणाले. यावर ह्यतेही तक्रार करतीलह्ण असे वंचितचे कार्यकर्ते म्हणाले. त्यानंतर शिवसैनिकही आक्रमक झाले. दोन्ही बाजूने वाद झाला. मात्र नंतर दोन्ही बाजूच्या मोठ्या नेत्यांनी मध्यस्थी केली. वंचितचे नेतेही कार्यकर्त्यांना सोबत घेत तेथून निघून गेले व शिवसैनिकही शांत झाले. परिणामी प्रकरण तेथेच मिटले.

# गल्ली बोळ स्वच्छ ठेवा; जगाला वाटू द्या हेवा !

(स्वच्छ भारत मिशन विशेष.) अधिकृतपणे दि. १ एप्रिल १९९९ पासून भारत सरकारने व्यापक ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची पुनर्रचना केली आणि संपूर्ण स्वच्छता मोहीम-टीएससी सुरू केली ज्याचे नंतर दि. १ एप्रिल २०१२ रोजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी निर्मल भारत अभियान- एनबीए असे नामकरण केले होते. दि. २४ सप्टेंबर २०१४ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्मल भारत अभियानाची पुनर्रचना स्वच्छ भारत अभियान म्हणून करण्यात आली.

--------------



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
गडचिरोली,
७७७५०४१०८६.

निर्मल भारत अभियान- संपूर्ण स्वच्छता मोहीम हा भारत सरकारने सुरू केलेला समुदायांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण स्वच्छता- सीएलटीएसच्या तत्त्वांतर्गत एक कार्यक्रम होता. ज्या गावांनी हा दर्जा प्राप्त केला, त्यांना निर्मल ग्राम पुरस्कार नावाच्या कार्यक्रमांतर्गत आर्थिक पुरस्कार आणि उच्च प्रसिद्धी मिळाली.

टाइम्स ऑफ इंडियाने माहिती दिली की मार्च २०१४मध्ये युनिसेफ इंडिया आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांनी १९९९मध्ये भारत सरकारने सुरू केलेल्या संपूर्ण स्वच्छता मोहिमेचा एक भाग म्हणून स्वच्छता परिषद आयोजित केल्यानंतर ही कल्पना विकसित करण्यात आली.

नऊ वर्षांपूर्वी सन २०१४मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेच्या जागृकतेविषयी नारा दिला होता. त्याला प्रतिसाद देत समाजातल्या सर्व स्तरातील नागरिकांनी स्वच्छ भारतासाठी मालकी घेण्यास प्रचंड उत्साह दाखवला होता. परिणामी स्वच्छता हे राष्ट्रीय आचरण बनले आणि स्वच्छ भारत अभियान हे नाव घराघरात पोचले.

गांधी जयंतीनिमित्त पंतप्रधानांनी देशवासीयांना कृती करण्याचे अनोखे आवाहन केले आहे. मागील वर्षी २०२३ मध्ये मन की बातच्या १०५व्या भागात पंतप्रधानांनी १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता स्वच्छतेसाठी १ तास श्रमदान करण्याचे आवाहन केले. यावेळी गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला देशातील सर्व नागरिक एकत्रितपणे त्यांना स्वच्छांजली अर्पण करतील.

स्वच्छता ही सेवा अभियान या विषयावर बोलताना ते म्हणाले होते, १ ऑक्टोबर रोजी म्हणजेच रविवारी सकाळी १० वाजता स्वच्छतेबाबत एक




मोठा कार्यक्रम आयोजित केला होता. आपणही वेळ काढून स्वच्छतेच्या या मोहिमेत सहभागी होऊन मदत करावी. यंदाही आपण या स्वच्छता मोहिमेत आपल्या गल्लीत किंवा परिसरात किंवा उद्यान, नदी, तलाव किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी देखील सहभागी होऊ शकतो.

या महास्वच्छता मोहिमेद्वारे यंदा मंगळवार १ ऑक्टोबर २०२४ रोजी सर्व स्तरातील नागरिकांना सार्वजनिक ठिकाणे जसे की बाजारपेठ, रेल्वे मार्ग, पर्यटन स्थळे, धार्मिक स्थळे इत्यादी ठिकाणी स्वच्छतेच्या प्रत्यक्ष उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले जाते. प्रत्येक शहर, ग्रामपंचायत, नागरी विमान वाहतूक, रेल्वे, माहिती आणि तंत्रज्ञान यासारख्या शासनाच्या सर्व विभागांना, सार्वजनिक संस्था नागरिकांच्या नेतृत्वाखाली स्वच्छतेच्या कार्यक्रमांसाठी सुविधा उपलब्ध करून देतील.

सामाजिक संस्था, रहिवासी कल्याण संघटना, खाजगी उपक्रम, स्वच्छता कार्यक्रम आयोजित करण्यास इच्छुक असलेल्या संस्था पोर्टलच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा प्रशासनाकडे ऑनलाइन अर्ज करू शकतात.

स्वच्छता ही सेवा उपक्रमासंबंधी swachhatahise.com या खास निर्माण करण्यात आलेल्या संकेतस्थळावर सार्वजनिक माहितीसाठी स्वच्छता कार्यक्रम उपलब्ध असतील. स्वच्छतेच्या ठिकाणी नागरिक फोटो काढू शकतात आणि हे फोटो पोर्टलवर अपलोडही करू शकतात. या पोर्टलमध्ये नागरिकांना, मोहिमेला वाहून घेतलेल्या लोकांना या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आणि स्वच्छतादूत बनून लोकांच्या चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी आमंत्रित करणारा विभाग देखील आहे.

१५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत साजरा होणारा स्वच्छता पंधरवडा हा स्वच्छता ही सेवा २०२४ या उपक्रमाच्या स्वच्छता मोहिमेचा एक भाग आहे. जुन्या इमारतींचे जीर्णोद्धार, जलकुंभ, घाट, भिंती रंगविणे, नुक्कडनाटके स्पर्धा आयोजित करणे अशा विविध स्वच्छता उपक्रमात नागरिक सहभागी होत आहेत. हा पंधरवडा सुरू झाल्यापासून, या निमित्ताने आयोजित विविध कार्यक्रमात आतापर्यंत ५ कोटीहून अधिक नागरिक सहभागी झाले असल्याचे बोलले जात आहे.

स्वच्छ भारत अभियान हा भारताच्या ४ हजारहून अधिक शहरांच्या, रस्त्यांच्या व भारतातील विविध नद्यांच्या स्वच्छतेसाठी भारत सरकारने सुरू केलेला राष्ट्रीय पातळीवर अभियान आहे. हे अभियान दि.२ ऑक्टोबर २०१४ रोजी राजघाट, नवी दिल्ली येथे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सुरू झाले. त्यांनी स्वतः रस्त्याला स्वच्छ केले. मोदीजी म्हणाले होते, ₹महात्मा गांधींना सर्वात मोठे स्मारक म्हणजे २०१९मध्ये त्यांच्या १५०व्या जयंतीला त्यांची स्वच्छ भारताची इच्छा साध्य करणे होय. हे भारताच्या स्वच्छतेसाठी सर्वात मोठे अभियान आहे. यात ३० लक्षाहून अधिक सरकारी कर्मचारी व शाळेतल्या व कॉलेजमधल्या मुलांनी भाग घेतला आहे.

विशेष म्हणजे स्वच्छ भारत अभियान ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात राबविले जात आहे. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) हे पेयजल व स्वछता मंत्रालयांमार्फत व स्वच्छ भारत अभियान (शहरी) हे शहर विकास मंत्रालयमार्फत राबविले जात आहे.

२ ऑक्टोबर २०१४ ला ग्रामीण भागासाठी निर्मल भारत अभियानाची पुर्नरचना करून स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) सुरू करण्यात आले. तर शहरी भागात ते संपूर्णपणे नव्याने सुरू करण्यात आले आहे. सन २०११च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागातील ३३ टक्के ग्रामीण कुटूंबांनाच शौचालयाच्या सुविधा होत्या, तर २०१३मधील नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशनच्या पाहणीनुसार ग्रामीण भागातील ४१ टक्के ग्रामीण कुटूंबानाच शौचालयाच्या सुविधा होत्या, स्वच्छ भारत अभियानाने २०१९पर्यंत स्वच्छ भारत साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

यासाठी ग्रामीण भागातील स्वच्छतेच्या पातळीत सुधारणा करणे व गावे हागणदारीमुक्त करणे हे साधारण उद्दिष्ट ठेवले. यासाठी ग्रामीण भागात वैयक्तिक शौचालये, सार्वजनिक स्वच्छतागृहे, सामुदायिक स्वच्छतागृहे, शाळा व अंगणवाड्यामध्ये शौचालये, घन व द्रव कचरा व्यवस्थापन यंत्रणा उभारून कार्यक्रमाच्या प्रभावी अंलबजावणीवर भर देण्यात येत आहे.

निर्मल भारत अभियानात पुढील सुधारणा करून स्वच्छ भारत अभियान कार्यरत आहे.

१) वैयक्तिक शौचालयाची किंमत १०,००० रु. ऐवजी १२,०००रु. ठरविण्यात आली आहे.

२) वैयक्तिक शौचालय उभारण्यासाठी केंद्र- राज्य वाटा ७५:२५ व ईशान्यपूर्व राज्ये व जम्मू-काश्मीरसाठी ९०:१० असाच आहे.

३) भविष्यात इंदिरा आवास योजना लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालय उभारण्यासाठीची मदत इंदिरा आवास योजनेतून मिळेल. सध्या ती स्वच्छ भारत अभियानातून दिली जाते.

४) शाळांमधील शौचालयांच्या उभारण्याची जबाबदारी मानव संसाधन विकास मंत्रालयाकडे तर अंगणवाड्यामधील शौचालय उभारणीची जबाबदारी महिला व बालविकास मंत्रालयाकडे देण्यात आली आहे.

५) लोकसहभाग व मागणी वाढावी यासाठी स्वच्छतागृहांचा वापर करणे व लोकांच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल करणे यावर सर्वाधिक भर दिला जात आहे.

६) योजनेचे लक्ष्य निर्मल भारत ऐवजी स्वच्छ भारत, असे झाले आहे व योजनेचे साध्य वर्ष २०२२ ऐवजी २०१९ झाले होते. यंदा सन २०२३ साली भारताचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्य जनतेला हाक दिली आहे, बंधभगिनींनो, येत्या १ ऑक्टोबर रोजी सर्वजण घरातून बाहेर या आणि रस्ते, सार्वजनिक स्थळे स्वच्छ- लख्ख करण्यासाठी फक्त १ तास श्रमदान करा.

जलपर्णी मुक्त स्वच्छ सुंदर पवनामाई अभियान- स्वच्छ भारत अभियानाला साथ देत मागील वर्षी पिंपरी चिंचवड मध्ये पर्यावरण प्रेमिनी पवना नदी स्वछता अभियान जलपर्णी मुक्त स्वच्छ सुंदर पवनामाई अभियान सुरू केले.

पहिले पर्व २०१७-१८ तब्बल २१५ दिवस चालले. या अभियानामध्ये एकूण १४५५ ट्रक जलपर्णी पवना नदीतून बाहेर काढण्यात आली. जून महिन्यात पावसाळा सुरू होत असल्याने त्यावेळी अभियानाला थांबविण्यात आले होते. पावसाळा संपताच या अभियानाला पुन्हा सुरू करण्यात आले होते. बंधुभगीनींनो या, मोदींच्या हाकेला ओय देत केवळ एक तास श्रमदान करून स्वच्छ भारत मोहिम यशस्वी करूया आणि २ ऑक्टोबर रोजी शास्त्रीजी व गांधीजींना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करूया!

●●●●●●●●●

# लोग साथ आते गये और कारवां बनता गया..



हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक अजरामर गाणी देणारे विख्यात गायक असरार उल हसन खान उर्फ मजरूह सुलतानपुरी यांची आज जयंती. 1950 आणि 1960 च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात भारतीय चित्रपटसृष्टीतील ते प्रख्यात उर्दू कवी मानले जायचे.

सहा दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक संगीत दिग्दर्शकांसोबत काम केले . दोस्ती चित्रपटातील चाहुंगा में तुझे सांझ सबेरे या गितासाठी 1965 मध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट गीतकार म्हणून फिल्मफेअर पुरस्कार मिळाला . दादासाहेब फाळके पुरस्कारासह अनेक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

मजरूह सुलतानपुरी यांचा जन्म असरार उल हसन खान या मुस्लिम राजपूत कुटुंबात सुलतानपूर, उत्तर प्रदेश येथे झाला, जिथे त्यांचे वडील पोलीस विभागात तैनात होते. मजरूहला पारंपारिक मदरसा शिक्षणासाठी पाठवले गेले ज्यामुळे त्याने प्रथम दर्स-ए-निजामीची पात्रता प्राप्त केली. हा सात वर्षांचा अभ्यासक्रम जो धार्मिक विषयावर केंद्रित होता. अरबी आणि पर्शियन भाषेतील प्राविण्य आणि नंतर 'अलिम'चे प्रमाणपत्र . त्यानंतर त्यांनी लखनौच्या तकमील-उत-तिब कॉलेज ऑफ युनानी मेडिसिनमध्ये प्रवेश घेतला.

सुलतानपूर येथील मुशायरात त्यांची एक गझल प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली . मजरूहने आपली नवीन वैद्यकीय प्रॅक्टिस सोडण्याचा निर्णय घेतला आणि गंभीरपणे कविता लिहिण्यास सुरुवात केली. लवकरच तो मुशायऱ्यांमध्ये 'नियमित' झाला आणि शागिर्द म्हणजे उर्दू मुशायरामधील तत्कालीन सर्वोच्च नावाचा शिष्य म्हणजे जिगर मुरादाबादी .

1945 मध्ये मजरूह साबू सिद्दीक इन्स्टिट्यूटमध्ये मुशायराला उपस्थित राहण्यासाठी मुंबईला गेले होते. येथे त्यांच्या गझल आणि कवितांना श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. चित्रपट निर्माता ए.आर. कारदार यांनी जिगर मुरादाबादी यांच्या माध्यमातून मजरूहची भेट घेतली. कारदार त्यांना संगीतकार नौशाद यांच्याकडे घेऊन गेले ज्यांनी तरुण लेखकाची परीक्षा घेतली. त्याने मजरूहला एक ट्यून दिली आणि त्याच मीटरमध्ये काहीतरी लिहायला सांगितले आणि मजरूहने लिहिले जब उसने गेसु बिखराये, बादल आए झूम के .... येथून मजरूहला शाहजहाँ चित्रपटाचे गीतकार म्हणून साइन केले गेले.

मजरूहने त्यानंतर नाटक (1947), डोली (1947), अंजुमन (1948) सारखे चित्रपट केले परंतु त्यांना मोठे यश मेहबूब खानच्या अंदाज ( 1949) या चित्रपटाने मिळाले . 1949 मध्ये राजकीय आरोप असलेल्या कवितांमुळे त्यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्यांच्या चित्रपट कारकिर्दीची नव्याने सुरुवात करून, मजरूहने शेवटी गुरू दत्तचा चित्रपट बाज (1953) द्वारे पुन्हा काम केले. मजरूह सुलतानपुरी यांनी अनिल बिस्वास, नौशाद, गुलाम मोहम्मद, मदन मोहन, ओपी नय्यर, रोशन, सलील चौधरी, चित्रगुप्त, एन. दत्ता, कल्याणजी-आनंदजी, लक्ष्मीकांत-प्यारेलाल आणि आरडी बर्मन यांसारख्या अनेक संगीत दिग्दर्शकांसोबत काम केले .

शाहजहाँ (1946) या चित्रपटानंतर एस. फाजिलचा मेहंदी, डोली (1947), मेहबूबचा अंदाज (1949) आणि शहीद लतीफचा आरजू हा चित्रपट आला. मजरूह यांनी 1950 च्या दशकात लोकप्रिय चित्रपटांसाठी गीतलेखन केले. फैज अहमद फैज , खुमार बाराबंकवी यांच्यासोबत मजरूह हे सर्वात उल्लेखनीय गझल लेखक मानले गेले.

परदेशी, एक और सिकंदर, वतन के राखवाले, इनाम दस हजार, कयामत से कयामत तक, लाल दुपट्टा मलमल का, फिर लहराया लाल दुपट्टा, यारा दिलदरा, तुम मेरे हो, शिव, घर हो तो ऐसा, दौलत की जंग, कानून की जंजीर, आयी मिलन की रात, जो जीता वही सिकंदर, प्रेम, दस्तूर, मधुचंद, यार मेरी जिंदगी, हमशकल, रिश्ता हो तो ऐसा, बडी बहेन, दिल आशना है, नर्गिस, लुटेरे, अंदाज अपना अपना, कभी हां कभी ना, बाजी, अकेले आम्ही अकेले तुम, खामोशी, दरार, , दिल के झरोके में, युगपुरुष, जानम समझा करो, प्यार कोई खेल नाही, हम तो मोहब्बत करेंगे, वन २ का ४, मुझे मेरी बीवी से बचाओ अशा अनेक चित्रपटांसाठी गीतकार म्हणून काम केले.

चांद फिर निकला, मगर तुम ना आये..., है अपना दिल तो आवारा..., छोड दों आँचल, जमाना क्या कहेगा.., जाने कहाँ मेरा जिगर गया जी..., अशी एकापेक्षा एक सरस गाणी त्यांनी लिहिली. दादासाहेब फाळके पुरस्काराने सुद्धा त्यांना सन्मानित करण्यात आले होते. मजरूह सुलतानपुरी हे काही काळापासून फुफ्फुसाच्या आजाराने त्रस्त होते आणि त्यांना न्यूमोनियाचा तीव्र झटका आला आणि 24 मे 2000 रोजी मुंबईत त्यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय 80 होते.

●●●●●●●●●

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा



मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज १०५ वी जयंती.

१ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले.

वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले.

या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत.

गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत.

गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली.

दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच.

आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

●●●●●●●●●

# नवरात्रीचे व्रत म्हणजे आदिशक्तीचा जागर!

**वाचक लिहितात**

आदिशक्तीचे नऊ रूप आहेत त्यापैकी एक दुर्गा. जेव्हा परब्रम्हाने त्रीदेवांची उत्पत्ती केली तेव्हाच त्यांच्या कायार्ला शक्ती पुरवण्यासाठी आदिशक्तीची निर्मिती केली. देवीची उपासना म्हणजे या आदिशक्तीचीच उपासना करणे, शक्ती शिवाय जीवन अपूर्ण आहे, प्रकृती व पुरुष हे दोन जगाचे प्रमुख घटक आहेत. शक्तीशिवाय हे अपूर्ण राहतात. जो जो आदिशक्तीची उपासना करतो त्याला शक्ती प्राप्त होत असते मग ते देव असो वा असुर.

उदा. असुर शक्तीची उपासना करून उन्मत्त होतात व अधर्माचरण करतात तेंव्हा देव अवतार धारण करतात तो दुर्जनांच्या नाश्यासाठी तेव्हा त्याच्या कायार्ला आदिशक्तीच शक्ती पुरवत असते . तेव्हा ते कार्य पूर्णत्वाला जाते. शक्ती धर्म आहे, शक्तीच सत्य आहे. सध्याची परिस्थिती बघता असूरी वृत्ती प्रबळ होत आहे. या वृत्तीला नष्ट करायचे असेल, तिचा नायनाट करायचा असेल तर शक्तीची उपासना करणे गरजेचे आहे.

आदिशक्ती म्हणजे भगवंताची शक्ती आहे. तिच्यामुळे भगवंताने निर्माण केलेल्या या सृष्टीचे चक्र चालू राहते. जसे अग्नी आणि अग्नीची दाहकशक्ती एकच आहेत तसे भगवंत आणि त्याची शक्ती एकच आहेत. निर्गुण भगवंताचे सगुणत्व शक्तीमुळे आहे. त्रिगुणांच्या आधारे आदिशक्ती सर्व कार्य करते आणि सर्वांकडून कार्य करवून घेते. मग ते देव असोत, दानव असोत किंवा मनुष्य असोत. या सर्वांकडून होणारे कार्य आदिशक्तीच्या कृपेमुळेच होत असतात.

काही जणांना प्रश्न पडतो, सर्व काही आदिशक्तीच्या इच्छेने होते, तर आपण का धडपडावे? पण असे नाही. मनुष्य जन्म हा भगवंतप्राप्तीसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. जोपर्यंत आपण योग्य कर्म करत नाही , धर्मकार्य करत नाही तोपर्यंत आपल्याला भगवंताची प्राप्ती होत नाही म्हणून आपले जे ध्येय आहे ते गाठण्यासाठी आपल्याला या शक्ती आधारे कर्म करावे लागते असे प्रत्यक्ष भगवद्गीतेत सांगितले आहे. स्वतः धर्माचरण करून संपूर्ण विश्वाला धर्म बंधनात बांधण्यासाठी आपण जे कार्य करतो त्याला शक्तीची आवश्यकता आहे त्यासाठी आपण सर्वांनी मा भगवतीला, आदिशक्ती दुगार्देवीला प्रसन्न करण्यासाठी आपल्याला मिळालेले हे नऊ दिवस म्हणजे नवरात्री.

या नऊ दिवसात देवीच्या नऊ रूपांची पूजा करुया, प्रार्थना करुया. हे ' आदिशक्ती देवी, या जगात सुर आणि असुर ही दोन्ही तुझीच रूपे आहेत. तू देव व असुर दोघांची जननी आहेस.

जेव्हा असुरांचे वर्चस्व वाढते आणि धर्माचा ऱ्हास होतो, तेव्हा तू असुरांचा नाश करतेस.

आताही पृथ्वीवर वाईट प्रवृत्तींनी थैमान घातले आहे. या आसुरी दुष्पवृत्तीच्या नाशासाठी आम्हाला शक्ती दे व भगवंताच्या धर्मस्थापनेच्या कार्यात आम्हाला सहभागी होता येऊ दे अशी तुज्या चरणी आर्त प्रार्थना आहे.

■ सौ. रमा देशमुख, नागपूर.

# १ ऑक्टोबर दिनविशेष

**१ ऑक्टोबर महत्वाच्या घटना :**

१७९१: फ्रेन्च संसदेचे पहिले अधिवेशन सुरू झाले.
१८३७: भारतातील पहिले टपाल कार्यालय सुरू झाले.
१८८०: थॉमस एडिसनने विद्युत दिव्यांचा कारखाना सुरू केला.
१८९१: स्टॅनफोर्ड विद्यापीठाची स्थापना झाली.
१९४९: संगीत रंगभूमीवरील गायक,अभिनेते जयराम शिलेदार यांनी स्वतःची मराठी रंगभूमी नाट्यसंस्था स्थापन केली.
१९५८: भारतात मेट्रिक पद्धत वापरण्यास सुरूवात झाली.
१९५९: भुवनेशप्रसाद सिन्हा यांनी भारताचे ६ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९६०: नायजेरियाला युनायटेड किंगडमपासुन स्वातंत्र्य मिळाले.
१९६९: कॉनकॉर्ड विमान प्रथमच ध्वनीगती पेक्षा जोरात उडण्यात यशस्वी झाले.
१९७१: अमेरिकेतील वॉल्ट डिस्ने वर्ल्ड सुरु झाले.
१९८२: सोनी कंपनीने पहिले कॉम्पॅक्ट डिस्क प्लेयर प्रकाशित केले.
१९९२: कार्टून नेटवर्क सुरु झाले.

**१ ऑक्टोबर जन्म :**

१८४७: थिऑसॉफिस्ट, सामाजिक कार्यकर्त्या व भारतीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या ॲनी बेझंट यांचा जन्म.
१८८१: बोईंग कंपनीचे संस्थापक विल्यम बोईंग यांचा जन्म.
१८९५: पाकचे पहिले पंतप्रधान लियाकत खान यांचा जन्म.
१९०६: संगीतकार व गायक सचिन देव बर्मन यांचा जन्म.
१९१९: गीतकार, कवी, लेखक, पटकथाकार, अभिनेते गजानन दिगंबर तथा ग. दि. माडगूळकर यांचा जन्म.
१९१९: गीतकार आणि कवी मजरुह सुलतानपुरी यांचा जन्म.
१९२४: अमेरिकेचे ३९ वे राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांचा जन्म.
१९२८: दाक्षिणात्य अभिनेते विझुपुरम चिन्नया तथा शिवाजी गणेशन यांचा जन्म.

**१ ऑक्टोबर मृत्यू :**

१८६८: थायलंडचा राजा मोंगकुट ऊर्फ राम यांचे निधन.
१९३१: नाट्यछटाकार शंकर काशिनाथ गर्गे यांचे निधन.
१९५९: इटलीचे पहिले अध्यक्ष इरिको डी निकोला यांचे निधन.
१९९७: जगातील सर्वात बुटकी व्यक्ती गुल मोहम्मद यांचे निधन.




सकाळी अनेकांना चहासोबत ब्रेड हवा असतो. काही लोक व्हाईट ब्रेड खातात तर काही ब्राउन ब्रेड खातात. सामान्य ब्रेडपेक्षा ब्राऊन ब्रेड आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे, असे काहींचे मत आहे. ते खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात, असे म्हटले जाते. परंतु खरंच ब्राऊन ब्रेड आरोग्यदायी आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

पांढऱ्या ब्रेडपेक्षा बाऊन ब्रेड चांगला पर्याय म्हटला जातो कारण तो गव्हापासून बनविला जातो. आरोग्याबाबत जागरूक लोक ब्राऊन ब्रेडचे सेवन करू करतात. परंतु रंग पाहून ब्रेड खात असला तर ते चूक आहे.

बाऊन ब्रेड संपूर्ण गव्हाच्या पिठापासून बनवला जातो. हे बनवण्यासाठी पिठातील कोणतेच घटक पदार्थ काढले जात नाही. त्यामुळे त्यात फायबरचे प्रमाण अधिक असते.

अधिक फायबरमुळे ब्राऊन ब्रेड मऊ होत नाही. कारण त्यावर जास्त प्रक्रिया केली जात नाही. बाऊन ब्रेडमध्ये नैसर्गिकरित्या अधिक खनिजे असतात. त्यामुळे वेगळे जीवनसत्त्वे आणि खनिजे जोडण्याची गरज नाही.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, बाऊन ब्रेड किंवा गडद रंगाची ब्रेड असण्याचा अर्थ असा नाही की ती खरोखर पौष्टिक आहे. सर्व ब्राऊन ब्रेडचे एक सारखे बनवले जात नाहीत. जेव्हा तुम्ही ब्राऊन ब्रेड निवडता तेव्हा त्याच्या लेबलवर 100% संपूर्ण गहू किंवा संपूर्ण धान्य लिहिलेले असावे. तुम्ही व्हाईट ब्रेडही खाऊ शकता, पण त्यात ब्राऊन ब्रेडपेक्षा कमी पोषण आहे. ब्राऊन ब्रेडिमध्ये फायबर, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन ई आणि काही फॅटी ॲसिड आढळतात जे शरीरासाठी फायदेशीर असतात.

■ ■ ■

# अशोकायन

## हार -जित

सुख पचवणे सोपे
दुख पचवणे कठीण
खिलाडू वृत्तीने स्विकारणे
हेच असते यथोचित ..

हार जित एकाच
नाण्याच्या दोन बाजू
ऊन सावली सारखाच
हा खेळ समजू ..

हार जितचे चक्र
फीरत असते निरंतर
समतोल ढळु न देता
संयमाने व्हावे साादर



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# Creador च्या प्रोत्साहनाने iValue Infosolutions Limited ने IPO साठी SEBI कडे केला DRHP फाइल

**मुंबई, ३० सप्टेंबर:** भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान सेवा आणि सोल्युशन्स इंटिग्रेटरपैकी एक (Frost & Sullivan अहवालानुसार) ने प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (IPO) आणण्यासाठी भांडवली बाजार नियामक, कडे रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसचा मसुदा दाखल केला आहे. बेंगळुरूस्थित कंपनीचा हा १,८७,३९,००० (१.८७ कोटी) रु.च्या दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअर्सची संपूर्ण विक्री ऑफर (OFS) आहे. विक्री भागधारकांद्वारे दर्शनी मूल्य प्रत्येकी २ रु. प्रमोटर सेलिंग शेअरहोल्डर्स सुनील कुमार पिल्लई, कृष्ण राज शर्मा आणि श्रीनिवासन श्रीराम हे एकत्रितरीत्या २२,४२,१९७ (२२ लाख) इक्विटी शेअर्स ऑफलोड करत आहेत आणि गुंतवणूकदार सेलिंग शेअरहोल्डर सुंदरा (मॉरिशस) लिमिटेड, एक खासगी इक्विटी फर्म क्रेडॉरची संलग्न कंपनी १,११,३७,०५१ (१.११ कोटी) इक्विटी शेअर्स ऑफलोड करेल. नऊ वैयक्तिक विक्री भागधारक ५३,५९,७५२ (५३ लाख) इक्विटी शेअर्स ऑफलोड करतील. एक एंटरप्राइझ तंत्रज्ञान समाधान विशेषज्ञ आहे, जे डिजिटल ॲप्लिकेशन्स आणि डेटा सुरक्षित आणि व्यवस्थापित करण्यासाठी सर्वसमावेशक, उद्देश-निर्मितउपाय ऑफर करते. हे प्रामुख्याने डिजिटल ॲप्लिकेशन्स आणि डेटाची कार्यक्षमता, उपलब्धता, स्केलेबिलिटी आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने, त्यांच्या गरजा पूर्ण करणारे उपाय ओळखण्यासाठी, शिफारस करण्यासाठी आणि तैनात करण्यासाठी सीस्टम इंटिग्रेटर्स आणि सह कार्य करून, त्यांच्या डिजिटल परिवर्तनामध्ये मोठ्या उद्योगांना सेवा देते. २००८ मध्ये स्थापित ची भारतात आठ ठिकाणी कार्यालये आहेत. या व्यतिरिक्त सिंगापूर, बांगलादेश, श्रीलंका, -,कंबोडिया आणि केनिया या सहा आंतरराष्ट्रीय ठिकाणीही त्याची उपस्थिती दिसते. आर्थिक २०२४ पर्यंत सायबरसुरक्षा, माहिती जीवनचक्र व्यवस्थापन, डेटा सेंटर इन्फ्रास्ट्रक्चर, ॲप्लिकेशन लाइफसायकल मॅनेजमेंट, हायब्रिड क्लाउड आणि व्यावसायिक, व्यवस्थापित सेवा या विविध सोल्युशन व्हर्टिकलमधून ग्राहकांना एकूण विक्रीचे बिल रु. २,११० कोटी, तर ऑपरेशन्समधून महसूल रु. ७८० कोटी. नुसार, सारख्या व्यवसायात गुंतलेल्या कोणत्याही सूचिबद्ध कंपन्या किंवा समवयस्क कंपन्या नाहीत. ज्या भारत आणि इतर शेजारील मोठ्या अर्थव्यवस्था व वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान समाधानांमध्ये तसेच संबंधित सेवा बाजारात प्रमुख स्थानावर आहे. सिक्युरिटीज लिमिटेड आणि मोतीलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट डव्हायझर्स लिमिटेड या इश्यूचे बुक-रनिंगलीड मॅनेजर आहेत. इक्विटी शेअर्स बीएसई आणि एनएसईवर सूचिबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे.

# फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेज २०२४ ला सुरुवात

## ३३कोटीपेक्षा अधिक लोकांनी दिली वेबसाइटला भेट



**बंगळुरू- ३० सप्टेंबर , -** फ्लिपकार्टचा बहुप्रतिक्षित बिग बिलियन डेज ची ११ वी आवृत्ती २७ सप्टेंबरला लाँच झाली आहे. फ्लिपकार्ट व्हीआयपी आणि प्लस कस्टमर्ससाठी ही योजना एक दिवस आधीच सुरू झाली होती. अर्ली क्सेस डे आणि पहिल्या दिवशी ३३ कोटीपेक्षा अधिक लोकांनी वेबसाइटला भेट दिली. यावरून सणावाराच्या दिवसातला ग्राहकांचा उत्साह दिसून येतो. सुरुवातीच्या ट्रेंड्सवरून हा सणावाराचा मोसम आश्वासक होणार असल्याची खात्री पटली आहे. मोबाइल, पोषक खाद्यपदार्थ, आणि मेकअपच्या उत्पादनांना वाढती मागणी दिसून आली आहे.

# काऊंटरपॉइंट सर्वेक्षण: विक्री नंतरच्या सेवेत OPPO India अव्वल स्थानी

**नवी दिल्ली, दि. ३० सप्टेंबर :** सेवेचा बेजोड अनुभव देण्याच्या आपल्या वचनास अनुसरून ने विक्रीनंतरच्या सेवेत ग्राहकांना संतुष्ट करण्यात पहिले स्थान पटकावले आहे. त्यांच्या ६२% ग्राहकांनी विक्रीनंतर दुकानातील त्यांच्या सेवेला अत्यंत समाधानकारक रेटिंग दिले आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये, काऊंटरपॉइंट रीसर्चने विक्री नंतरचा ग्राहकांचा सेवा अनुभव जाणून घेण्यासाठी भारतातील सर्वोच्च पाच स्मार्टफोन ब्रँड्सच्या २०००+ ग्राहकांचे एक सर्वेक्षण केले. या परिणामांमधून चा ग्राहक-प्रथमदृष्टिकोन स्पष्ट दिसून येतो आणि तो त्यांच्या नवीन केंद्रांवरील सेवा अनुभव आणखी उन्नत करण्यासाठी त्यांना प्रेरणा देतो. हे सर्वेक्षण १३ टियर १ आणि टियर २ शहरांमध्ये OPPO India, realme, Samsung, vivo आणि Xiaomi यांच्या ग्राहकांमध्ये योजण्यात आले होते. दुरुस्तीची गुणवत्ता, खर्च, समस्येचे निराकरण करण्यास लागणारा वेळ, पारदर्शकता, कर्मचाऱ्यांचे नैपुण्य आणि विविध भाषांमध्ये संवाद यांसारख्या मुख्य निकषांमध्ये अत्यंत समाधानकारक रेटिंग मिळवून OPPO ने बाजी मारली. विक्री नंतरचा अनुभव OPPO india चे ६२% ग्राहक विक्री नंतरच्या सेवा केंद्रांच्या अनुभवाबाबत अत्यंत समाधानी होते. च्या पाठोपाठ अनुक्रमे ५८% आणि ५७% सह आणि चा क्रमांक येतो.

# मोटोरोलाच्या Motorola edge50 Pro, Motorola edge50 Fusion, Motorola edge50 Neo, moto g85 5G, moto g64 5G आणि moto g45 5G स्मार्टफोन फ्लिपकार्टवर द बिग बिलियन डेज सेल २०२४ मध्ये उपलब्ध

**३० सप्टेंबर २०२४:** मोबाइल तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर अग्रेसर असलेल्या मोटोरोलाने अलीकडेच फ्लिपकार्टच्या 'द बिग बिलियन डेज सेल' आधी सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणात सवलती जाहीर केल्या. त्यांच्या सर्वात लोकप्रिय स्मार्टफोनसाठी किंमतीच्या विभागांमध्ये नवीन रंगरूप सादर केले. मोटोरोलाने आपल्या हॅलो कलर्स, हॅलो एआय मोहिमेचा एक भाग म्हणून हे नवीन रंग सादर केले आहेत जे दर्जेदार, स्टायलिश आणि व्हायब्रंट स्मार्टफोनमध्ये त्याची अद्वितीय रचना आणि रंग भाषा दर्शवितात. motorola edge50 Pro, motorola edge50 Fusion, motorola edge50 Neo, moto g85 5G, आणि moto g64 5G मध्ये नवीन रंग उपलब्ध असतील. ही सगळी उपकरणे . वर विक्रीसाठी उपलब्ध असतील. ही उत्पादने आता २६ सप्टेंबरपासून ग्राहकांसाठी विक्रीसाठी उपलब्ध असून २७ सप्टेंबरपासून सर्व ग्राहकांसाठी खास करून फ्लिपकार्टवर बिग बिलियन डेज सेल दरम्यान खुली आहेत. प्रीमियम स्मार्टफोनसाठी ऑफर केलेल्या सर्वात मोठ्या बिग बिलियन डेज सेल डीलपासून सुरुवात करून, motorola edge50 Pro (बॉक्समध्ये समाविष्ट १२५ चार्जरसह १२+२५६ व्हेरिएंट) जे रु. ३५,९९९ मध्ये किरकोळ विक्री करते, आता केवळ रु. २७,९९९* (बँक ऑफरसह) या बिग बिलियन डेजमध्ये प्रीमियम स्मार्टफोनवर हा सर्वात अविश्वसनीय सौदा आहे. motorola edge50 Pro हा जगातील पहिला एआय संचालित प्रो-ग्रेड कॅमेरा आहे ज्याचे रंग उत्पादन द्वारे प्रमाणित केले गेले आहे.

# गंभीर व्हायरल न्यूमोनिया आणि हृदयविकार असलेल्या ८७ वर्षीय ज्येष्ठ महिला रुग्णाला नागपूरच्या वोक्हार्ट हॉस्पिटलमधून यशस्वीरित्या

**मुंबई, ३० सप्टेंबर:** वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरने नुकतेच व्हायरल न्यूमोनिया, हृदयविकार आणि श्वास घेण्यास त्रास होत असलेल्या ८७ वर्षीय ज्येष्ठ महिला रुग्णाला पूर्ण आराम देऊन डिस्चार्ज दिला. डॉ. समीर अरबट, इंटरव्हेंशनल पल्मोनोलॉजिस्ट यांच्यासह डॉ. पडोळे, कार्डिओलॉजिस्ट, डॉ. चेतन शर्मा, इंटेन्सिव्हिस्ट, डॉ. पांडे, नेफ्रोलॉजिस्ट आणि आयसीयू टीम यांच्या देखरेखीखाली रुग्णावर यशस्वी उपचार करण्यात आले. चिकनगुनिया, डेंग्यू आणि स्वाईन फ्लू यासारखे व्हायरल इन्फेक्शन्स वाढल्यामुळे संपूर्ण शहरात आयसीयू बेडची कमतरता असल्यामुळे रुग्णाला वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या आपत्कालीन विभागात दाखल करण्यात आले. तिला ताप होता, श्वास घेण्यास खूप त्रास होत होता तसेच तिच्या सीटी स्कॅनमध्ये द्विपक्षीय न्यूमोनिया असल्याचे आढळून आले आणि ऑक्सिजनची पातळी ८०% ने धोकादायकरित्या कमी झाली होती. अश्या गंभीर स्थितीत, तिची ...... २ ९०% पेक्षा जास्त ठेवण्यासाठी तिला ...... - सपोर्टसह तत्काळ ऑक्सिजन थेरपीची आवश्यकता होती. विशेष उपचारासाठी तिला तातडीने आयसीयूमध्ये हलवण्यात आले. तिच्या केसमध्ये केवळ २०% इजेक्शन फ्रॅक्शनसह हृदयविकार, मधुमेह आणि किडनी रोग यासारख्या गुंतागुंतीच्या गंभीर आजाराचा समावेश होता. या आव्हानांना न जुमानता, वोक्हार्टच्या मल्टीडिसिप्लिनरी टीमच्या सहयोगात्मक प्रयत्नांमुळे तिची प्रकृती बरी झाली. रुग्णाचे बारकाईने निरीक्षण केले गेले आणि तिची प्रकृती स्थिर ठेवण्यासाठी सर्वसमावेशक काळजी दिली गेली. ही उल्लेखनीय पुनर्प्राप्ती वृद्धांच्या प्रतिकारशक्तीवर प्रकाश टाकते आणि गंभीर व्हायरल इन्फेक्शन्स विशेषत: अनेक सह-आजारांनीग्रस्त असलेल्या रूग्णांसाठी आशेचा किरण म्हणून काम करते. डॉ. अरबट आणि त्यांच्या तज्ञ टीमच्या देखरेखीखाली, रुग्णाला तिच्या त्रासापासून पूर्ण आराम मिळाल्यानंतर डिस्चार्ज देण्यात आला, जे वोक्हार्ट हॉस्पिटलमधील एकात्मिक वैद्यकीय सेवेचे सामर्थ्य दाखवते. नागपुरात व्हायरल इन्फेक्शनच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे, ज्यामध्ये वृद्ध लोकांचा देखील समावेश आहे. या ८७ वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार केल्याने अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीतही विशेष काळजी देण्याच्या वोक्हार्ट हॉस्पिटलच्या वचनबद्धतेला बळकटी देते. ही केस सर्वात कमजोर रूग्णांसाठी देखील बरे होण्याच्या संभाव्यतेची एक प्रोत्साहन देणारी आठवण आहे. अधिक माहितीसाठी कृपया वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरशी संपर्क साधा.

# वोडाफोन आयडिया नोकिया नेटगार्ड एन्डपॉईंट डिटेक्शन अँड रिस्पॉन्ससोबत आपल्या भारतातील नेटवर्कची सुरक्षा मजबूत करत आहे

**मुंबई, ३० सप्टेंबर:** एस्पू, फिनलॅन्ड - वोडाफोन आयडिया या भारतातील एका सर्वात मोठ्या टेल्को ऑपरेटर कंपनीने सायबर धोके आणि असुरक्षितता वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर आपल्या ग्राहक व एंटरप्राइज ग्राहकांसाठी नेटवर्क सुरक्षा मजबूत करण्यासाठी नोकिया नेटगार्ड एन्डपॉईंट डिटेक्शन अँड रिस्पॉन्स चा वापर करण्याचे ठरवले आहे. नेटगार्ड ईडीआर हा टेल्को कंपन्यांसाठी तयार करण्यात आलेला डिटेक्शन सूट वोडाफोन आयडियाला वास्तविक वेळी, स्वयंचलित निगराणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देईल, त्यामुळे वोडाफोन आयडियाला एन्डपॉईंटशी संबंधित असुरक्षितता तातडीने ओळखता येतील आणि दूर करता येतील. यामुळे सुरक्षिततेतील कमतरता कमीत कमी होतील, विस्तारपूर्वक तपासणी करण्याची गरज कमी होईल आणि संचालनासाठी येणाऱ्या खर्चात बचत होईल, त्याचवेळी सेवा सातत्याने उपलब्ध होत राहतील, संपूर्ण ऑपरेशनल टेक्नॉलॉजी (ओटी) नेटवर्कमध्ये संरक्षित एन्डपॉईंट्सची कामगिरी सतत व्यवस्थित होत राहील. नेटगार्ड ईडीआरच्या व्हेंडर-एग्नोस्टिक क्षमता वोडाफोन आयडियाची सध्याची सुरक्षा उपकरणे आणि प्रक्रियांसोबत सहजपणे एकरूप होतात, ऑपरेटरची नेटवर्क सुरक्षा मजबूत करतात. यामुळे वोडाफोन आयडियाच्या अत्याधुनिक सिक्युरिटी ऑपरेशन्स सेंटर उभारण्याच्या कामाला चालना मिळेल. सुरुवातीला यामध्ये वोडाफोन आयडियाचे जी नेटवर्क आणि नंतर जी नेटवर्क समाविष्ट केले जाईल. वोडाफोन आयडियाचे चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर (सीटीओ) श्री जगबीर सिंग म्हणाले, आपल्या प्रगत उपाययोजनांमार्फत अतुलनीय कनेक्टिव्हिटी व सुरक्षा प्रदान केली जावी व नेटवर्क विकासाच्या पुढील टप्प्याला चालना दिली जावी यासाठी वोडाफोन आयडिया बांधील आहे. नोकियासोबत ही वाटचाल करत असताना आम्ही अशी नेटवर्क उभारण्यावर लक्ष केंद्रित केले आहे जी लवचिक आहेत आणि सुरक्षा जोखीम वाढल्यामुळे, डिजिटल परिवर्तनामुळे सातत्याने वाढत असलेल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सक्षम आहेत. वोडाफोन आयडियाचे चीफ इन्फॉर्मेशन सिक्युरिटी ऑफिसर (सीआयएसओ) आणि डेटा प्रायव्हसी ऑफिसर श्री माथन बाबू काशीलिंगम यांनी सांगितले.

# आजचे राशिभविष्य

**मेष :** गावाला जाण्याचा योग आहे. नको तो आर्थिक खर्च टाळा. योग्य ठिकाणीच पैसा खर्च करा. दिवसभराच्या व्यस्ततेन मनासारखं काम करण्यासाठी वेळ काढा. त्यामुळे मानसिक शांतता मिळेल.

**वृषभ :** आर्थिक योजना मार्गी लावण्यासाठी वेळ मिळेल. मार्केटमध्ये तुमच्या नावाची चर्चा होईल. ऑफिसमध्ये सहका-यांशी वाद होईल. कामचुकारपणा टाळा. कामानिमित्ताने दूरचा प्रवास होणार आहे.

**मिथुन :** नोकरी करणा-यांना त्यांच्या मेहनतीचे फळ लवकर मिळणार आहे. व्यवसायात नुकसान होण्याची शक्यता आहे. जवळचीच व्यक्ती घात करण्याची शक्यता आहे.

**कर्क :** एखाद्यावेळी वाद झाला तर शांत राहा. बॅकफूटवर राहणं अशावेळी चांगलं. अचानक काही खर्च वाढतील. त्यामुळे तुमचे बजेट कोलमडेल. अनोळखी व्यक्तीशी जास्त घसवट करू नका.

**सिंह :** आज तुम्हाला तुमच्या कामाच्या मेहनतीचे फळ मिळेल. सामाजिकदृष्ट्याही तुम्हाला मान सन्मान मिळेल. हे यश कायम ठेवण्यासाठी तुम्हाला तुमचा स्वभाव आदर्श ठेवला पाहिजे.

**कन्या :** आज खास मित्राची भेट होईल. समजूतदारपणे गोष्टी पार पाडा. एखादं अडकलेलं काम मार्गी लागेल. आयात निर्यातीशी संबंधित गोष्टीत सावधानता बाळगा. संवाद साधताना चुकीचे आणि कठोर शब्द वापरू नका.

**तुळ :** रिस्क गोष्टींपासून दूर राहा. नवरा-बायकोमध्य व्यक्तीगत कारणाने वाद होतील. गॅस आणि ॲसिडिटीचा प्रचंड त्रास जाणवेल. खाण्यापिण्याचे पथ्य राखा.

**वृश्चिक :** ऑफिसच्या बाहेर अधिकवेळ भटकणं योग्य नाही. आरोग्याची काळजी घ्या. वाद मिटवण्यासाठी आणि दिवस आनंदी घालवण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. जुन्या चुका टाळा.

**धनु :** वाचल्याशिवाय कोणत्याही कागदपत्रांवर सही करू नका. आळस झटकून कामाला लागा. एखाद्या मित्राची भेट झाल्याने आजचा दिवस चांगला जाईल. लॉटरी काढू नका, नाही तर नुकसान होईल.

**मकर :** घर आणि कामात समन्वय साधण्यात अडचणी येतील. एखादं महत्त्वाचं काम अडकून राहील. व्यवसायात असलेल्या अडचणी दूर होतील. कर्मचा-यांमध्य सामंजस्य कायम ठेवा.

**कुंभ :** एखाद्या राजकीय व्यक्तीची भेट होईल. समस्येचं समाधान मिळेल. व्यस्त असूनही तुम्ही मित्रांशी संपर्क साधाल. त्यामुळे मैत्री अधिक दृढ राहील. मामलत्तेशी संबंधित कोणत्याही प्रकरणात पडू नका.

**मीन :** एखादी व्यक्ती तुमच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे कुणावरही विश्वास ठेवू नका. विचार करूनच एखाद्याशी मैत्री करा. दुसरा जॉब स्वीकारताना सावध राहा.

**मंगळवार १ ऑक्टोबर २०२४**

**खुल जा सीम सीम**
**जबरदस्त पास होणारे चांसेस**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| २३७ | २३० | १७८ | १८० | १५७ | १६७ | ४५६ | ४६८ |
| ५७० | ३५७ | ३५८ | ३७९ | ४९० | ३५६ | ६९० | ५६७ |
| ४८० | १२२ | २७७ | २७० | २२९ | २२० | ७८० | २६० |
| २० | ५० | ६८ | ९८ | ३० | ४० | ५१ | ८१ |
| २१ | ५१ | ६७ | ९७ | ३२ | ४२ | ५७ | ८७ |
| २३ | ५३ | ६४ | ९४ | ३६ | ४६ | ५९ | ८९ |

**२८ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४६ | ७६ |
| ०३ | १३ | ४८ | ७८ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**


# व्हाइटओक कॅपिटल म्युच्युअल फंड द्वारे टॉपला सुरू केलेल्या एसआयपीसाठी वेल्थ क्रिएशन खूपच जास्त असते

**मुंबई, ३० सप्टेंबर:** व्हाइटओक कॅपिटल एएमसीच्या पूर्वीच्या 'मार्केट सायकलच्या टॉपला की बॉटमला एसआयपी सुरू करणे चांगले आहे?' हे शीर्षक असलेल्या एसआयपी रिपोर्टनंतर एसआयपी टॉपला की बॉटमला? या विषयावर कंपनी आणखी काही दृष्टिकोन सादर करत आहे. हा रिपोर्ट बीएसई सेन्सेक्स टीआरआयच्या (गेली २७+ वर्षे) दीर्घकाळाच्या डेटाचा सखोल विश्लेषणावर आधारित आहे आणि त्यात इक्विटी मार्केट त्याच्या टॉपपासून २०% पेक्षा जास्त घसरले होते असे सर्व कालावधी विचारात घेतले आहेत. खालील तालिका दोन गुंतवणूकदारांच्या गुंतवणूक सारांशाचा संदर्भ देते, ज्यापैकी एकाने विविध मार्केट सायकलच्या टॉपला १०,००० चा मासिक एसआयपी सुरू केला आणि दुसऱ्याने बॉटमला जर कोणीतरी जानेवारी २००८ मध्ये बीएसई सेन्सेक्स टीआरआयमध्ये १०,००० चा मासिक एसआयपी सुरू केला असता (वर दिलेल्या तालिकेप्रमाणे मार्केट सायकल ६ च्या शीर्षस्थानी ), तर ३१ जुलै २०२४ पर्यंत त्यांनी छ १९.९ लाख गुंतवले असते आणि या गुंतवणुकीचे सध्याचे मूल्य ७४.७ लाख असते, जे १४.४% चा एक्सआयआरआर देते. तसेच, जर कोणीतरी मार्च २००९ मध्ये हा एसआयपी सुरू केली असती (वर दिलेल्या तालिकेप्रमाणे मार्केट सायकल ६ च्या तळाशी), तर ३१ जुलै २०२४ पर्यंत त्यांनी १८.५ लाख गुंतवले असते (पूर्वीच्या गुंतवणूकदारापेक्षा १.४ लाख कमी) आणि या गुंतवणुकीचे सध्याचे मूल्य ६३.८ लाख असते (पूर्वीच्या गुंतवणूकदारापेक्षा १०.९ लाख कमी) जे १४.७% चा एक्सआयआरआरवर देते. रिपोर्टमधील काही प्रमुख निष्कर्ष:

हे लक्षात घेण्यासारखे आहे की मार्केट सायकलच्या तळाशी सुरू केलेल्या एसआयपीसाठी % रिटर्न थोडे अधिक आहे, परंतु रुपयांच्या बाबतीत विचार केल्यास वास्तविक लाभ (वेल्थ क्रिएशन) टॉपला सुरू केलेल्या एसआयपीसाठी खूपच जास्त आहे.

# आर्य बब्बर म्हणतो, कलिकान्त ठाकूरची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी विनोद खन्ना यांच्या मेरा गाँव मेरा देशमधील भूमिकेचा मी अभ्यास केला आहे!





**मुंबई, ३० सप्टेंबर:** जागृती-एक नयी सुबहमधील आर्य बब्बरचा लूक आणि व्यक्तिरेखेसाठी त्याची तुलना महान अभिनेता विनोद खन्नाशी झाल्यामुळे तो आनंदित झाला आहे! आपली व्यक्तिरेखा अचूकपणे साकारण्यासाठी अगदी सकाळी लवकर उठून तालीम करण्यापासून रात्री उशिरापर्यंत चित्रीकरण करण्यापर्यंत कलाकार भरपूर काळ मेहनत घेत असतात. ते पटकथा आणि व्यक्तिरेखेची पार्श्वभूमी यांचा बारकाईने अभ्यास करून स्वतःला आपल्या भूमिकेत बुडवून टाकतात आणि आपल्या अभिनयात विश्वासार्हता आणतात. आर्य बब्बर हा अशाच कलाकारांपैकी एक असून तो आपल्या जागृती-एक नयी सुबह या मालिकेत कलिकान्त ठाकूरची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी तो रात्रंदिन मेहनत घेत आहे. यातील त्याच्या व्यक्तिरेखेच्या लूकने त्याची तुलना मेरा गाँव मेरा देश या अभिजात चित्रपटातील दिवंगत अभिनेते विनोद खन्ना यांच्याशी केली जात आहे. त्यातील राकट, जरबदार आवाज आणि ओबडधोबड पोशाखाद्वारे विनोद खन्ना यांनी साकारलेल्या जब्बार सिंह याच्याशी आर्य बब्बरची तुलना केली जात आहे. ही तुलना ऐकल्यावर आपण घेतलेल्या मेहनतीचे सार्थक झाल्याची आणि प्रेक्षकांशी जोडून घेण्याच्या आपल्या प्रयत्नांची दखल घेतली गेल्याची भावना आर्य बब्बरने व्यक्त केली.

# सॅमसंगकडून भारतात गॅलॅक्सी एस एफई लाँच



**गुरूग्राम, ३० सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलॅक्सी एस एफईच्या लाँचची घोषणा केली. अधिकाधिक वापरकर्त्यांना प्रीमियम मोबाइल अनुभव देणाऱ्या गॅलॅक्सी एआय इकोसिस्टममध्ये या नवीन स्मार्टफोनची भर करण्यात आली आहे. एआय - आधारित प्रोव्हिज्युअल इंजिनची शक्ती आणि गॅलॅक्सी एआयचे फोटो असिस्ट वैशिष्ट्ये असलेल्या गॅलॅक्सी एस एफईमध्ये सुधारित कॅमेरा सेटअप आहे, जे वापरकर्त्यांना अधिक क्रिएटिव्ह बनण्यास सक्षम करते. हा चालता-फिरता गेमिंगचा आनंद घेण्यासाठी परिपूर्ण डिवाईस आहे. या स्मार्टफोनमध्ये .-इंच डायनॅमिक एएमओएलईडी डिस्प्ले, दीर्घकाळपर्यंत टिकणारी , एमएएच क्षमतेची बॅटरी आणि शक्तिशाली एक्झिनॉस सिरीज चिपसेट आहे. गॅलॅक्सी एस एफईमध्ये संवाद, उत्पादकता व सर्जनशीलता वाढवण्यासाठी प्रीमियम गॅलॅक्सी एआय टूल्स आणि इकोसिस्टम कनेक्टीव्हीटी आहे, जे आयकॉनिक डिझाइनमध्ये समाविष्ट आहे आणि शक्तिशाली सॅमसंग नॉक्स सिक्युरिटीद्वारे सुरक्षित आहेत.

एआय-एन्हान्स्ड कॅमेरा आणि एडिटिंग गॅलॅक्सी एस एफईच्या प्रीमियम कॅमेरा सेटअपमध्ये मेगापिक्सल वाइड लेन्स आणि मेगापिक्सल टेलिफोटो लेन्ससह ऑप्टिकल झूम आहे, ज्यांना ऑप्टिकल इमेज स्टेबिलायझेशन (ओआयएस)चे पाठबळ आहे. तसेच मेगापिक्सल अल्ट्रा-वाइड लेन्स आणि मेगापिक्सल सेल्फी कॅमेरा आहे.



## मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील कलाकार आग्रा, भव्य राम बरातमध्ये सामील

**आग्रा, ३० सप्टेंबर २०२४ :** आग्रा शहर भव्य राम बरातच्या आयोजनासह जल्लोष व भक्तीभावाने भरून गेले होते. हा भव्य इव्हेण्ट श्रीरामाच्या दिव्य विवाह मिरवणूकीला दर्शवतो. या भव्य मिरवणूकीमध्ये सामील झालेल्या हजारो रामभक्तांमध्ये एण्ड टीव्हीवरील घरेलू कॉमेडी 'हप्पू की उलटन पलटन'मधील दोन लाडके पात्रं दरोगा हप्पू सिंग (योगेश त्रिपाठी) आणि त्याची दबंग दुल्हनिया राजेश (गीतांजली मिश्रा) हे देखील सामील झाले. त्यांनी या साजरीकरणाचा भाग म्हणून त्यांचा आध्यात्मिक अनुभव व उत्साहाबाबत सांगितले, तसेच दसरा सणापूर्वी श्रीरामाचा आशीर्वाद देखील घेतला. योगेश त्रिपाठी आपला आनंद व्यक्त करत म्हणाले, ''आग्रामधील राम बरातमध्ये सहभाग घेण्याचा अनुभव संस्मरणीय होता. आमची मालिका उत्तर प्रदेशमध्ये स्थित आहे आणि अशा भव्य मिरवणूकीचा भाग बनल्याने माझ्या लोकांसोबत मोठा सण साजरा करत असल्यासारखे वाटले. मी यापूर्वी देखील राम बरातच्या भव्यतेचा अनुभव घेतला होता, पण यावेळचा अनुभव अत्यंत खास होता. आग्रामधील लोकांचे प्रेम व आदरातिथ्य उत्साहपूर्ण होते. प्रभू श्रीरामाच्या बरातीमध्ये सामील होणे दैवी अनुभव होता. आमच्या मालिकेवर प्रेमाचा वर्षाव केलेल्या चाहत्यांना भेटल्यानंतर आम्ही खूप भावूक झालो. त्यांना माझा संवाद 'अरे दादा!' किती आवडतो हे पाहून मी अचंबित झालो.

# एपीआय आणि ग्लेनमार्क तर्फे प्रत्येक महिन्याच्या १८ तारखेचा दिवस राष्ट्रीय बीपी स्क्रीनिंग दिवस म्हणून केला जाहीर




**नागपूर, ३० सप्टेंबर २०२४ :** हृदयविकार व्यवस्थापनातील कौशल्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडने (ग्लेनमार्क) आज गेटवे ऑफ इंडिया येथे टेक चार्ज एट १८ ही हायपरटेन्शन जागरूकता मोहीम सुरू केली. लवकर म्हणजे वयाच्या व्या वर्षांपासूनच रक्तदाबाचे निरीक्षण करण्याचे महत्त्व पटवून देणे यावर या उपक्रमाचा भर आहे. असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडियातर्फे (एपीआय) प्रत्येक महिन्याची १८ तारीख टेक चार्ज एट १८ बीपी स्क्रीनिंग दिवस म्हणून जाहीर करण्यात आली आहे. त्यायोगे हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी सर्व प्रौढांनी नियमित रक्तदाब तपासणी करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. ग्लेनमार्क आणि एपीआय यांच्या या सहयोगातून हायपरटेन्शन जनजागृती आणि निदान वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे. गेटवे ऑफ इंडियावर या मोहिमेचे उद्घाटन दोन तासांच्या लक्षणीय ३डी व्हिडीओ प्रक्षेपणाने झाले. त्यामध्ये प्रारंभिक रक्तदाब निरीक्षणाचे महत्त्व प्रभावीपणे दर्शविले गेले. हायपरटेन्शनसंदर्भात जनजागृती आणि जनप्रबोधन करण्याची या मोहिमेची बांधिलकी जपत हे नाविन्यपूर्ण सादरीकरण लोकांना कृती करायला प्रवृत्त करणारे शक्तिशाली साधन बनले. विविध प्लॅटफॉर्मवरुन एक लाखांहून अधिक वैद्यकीय व्यवसायिकांपर्यंत पोहोचत या प्रभावी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. ग्लेनमार्कने या उपक्रमाच्या माध्यमातून १० कोटी भारतीयांना हायपरटेन्शनबद्दल जागरूक करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ही मोहिम रक्तदाब निरीक्षणाला कोणत्या वयात सुरुवात करावी, योग्य वय कोणते असावे याबद्दलच्या जागरूकतेविषयी असलेली महत्त्वाची दूरी भरून काढते. सध्या अनेक तरुण प्रौढ हायपरटेन्शन १ आणि हृदयविकाराचा झटका यांसारख्या त्याच्या जीवघेण्या गुंतागुंतीच्या धोक्यांना सामोरे जात आहेत. भारतीय तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर हा धोका वाढला आहे. या मोहिमेबद्दल बोलताना ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडच्या इंडिया फॉर्म्युलेशनचे अध्यक्ष आणि व्यवसाय प्रमुख श्री. अलोक मलिक म्हणाले, ग्लेनमार्कमध्ये आम्ही भारतातील हायपरटेन्शन विरुद्धच्या लढाईत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि अर्थपूर्ण परिणाम साध्य करण्यासाठी दृढ बांधिल आहोत. विशेषतः तरुणांमध्ये हायपरटेन्शनच्या २ त्रासाच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने, सुरुवातीच्या वयापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. ही मोहिम लोकांचे प्रबोधन करण्यावर आणि त्यांच्या रक्तदाबाचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी त्यांना सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करते. लवकर निदान आणि उपचार झाले तर भविष्यातील आरोग्याच्या समस्या कमी होऊ शकतात आणि जीवनमान उंचावू शकते. व्यापक जनजागृती प्रयत्नांद्वारे, आम्ही भारतातील आरोग्य सेवा पद्धतींमध्ये हायपरटेन्शन विषयक जनजागृतीला अग्रस्थानी ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हा उपक्रम अलीकडील आयसीएमआर अभ्यासातून मिळालेल्या माहितीच्या आधारावर सुरू करण्यात आला आहे. त्यात वय वर्षे आणि त्यावरील भारतीयांमध्ये हायपरटेन्शनचे ३५.५ टक्के ३ प्रमाण दर्शविले आहे. विशेषतः शहरी लोकसंख्येमध्ये हेच प्रमाण ४०.७ टक्के इतके दिसून आले आहे. २०२५ पर्यंत उच्च रक्तदाबाचे प्रमाण २५ टक्के ४ ने कमी करणे हे भारताचे एक राष्ट्रीय आरोग्य लक्ष्य आहे. ग्लेनमार्कची मोहिम म्हणजे व्यापक जागरूकता आणि सक्रिय आरोग्य व्यवस्थापनाला प्रोत्साहन देऊन या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

# चंद्रपुरातील खासगी शाळेचे अदानींना हस्तांतरण

## विरोधकांची टीकेची झोड

■ महासागर प्रतिनिधी
**चंद्रपूर ,दि. ३० सप्टेंबर:**
चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस येथील कार्मेल एज्युकेशन सोसायटीची पहिली ते १२ वी सीबीएससी शाळा अदानी फाउंडेशनला हस्तांतरित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सरकारच्या या निर्णयावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे. आता महाराष्ट्राचा ७/१२ अदानींच्या नावे करणार का ? अशा शब्दांत विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शिंदे सरकारवर टीका केली आहे.




एसीसी सिमेंट कंपनीतील अधिकारी-कामगारांच्या मुलांसाठी ही शाळा उभारण्यात आली होती. दोन वर्षांपूर्वी अदानी उद्योग समूहाने एसीसी कंपनी विकत घेतल्यानंतर ही शाळा अहमदाबादच्या अदानी फाउंडेशनकडे हस्तांतरित होणार आहे. येत्या १५ दिवसांत शाळेचे व्यवस्थापन बदलण्यात यावे, अशा सूचना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने काढलेल्या शासन निर्णयातूनदेण्यात आल्या आहे.दोन वर्षांपूर्वी अदानी यांनी एसीसी सिमेंट कंपनी विकत घेतली होती. एसीसी कंपनीने त्यांच्या सीएसआर फंडातून १ ते १२ वी पर्यंतची इंग्रजी माध्यमाची शाळा उभारली होती. मात्र, कंपनी अदानी यांनी विकत घेतल्याने त्या शाळेचे व्यवस्थापन आता अदानी ग्रुप कडे गेले आहे.

### महाराष्ट्राला महायुती सरकार एवढाच अदानीचा धोका

महायुती सरकारएवढाच महाराष्ट्राला अदानीचादेखील धोका आहे. एअरपोर्ट, वीज, धारावी, मुंबईतील जमिनी झाल्या, आता शाळांवर पण अदानींचा डोळा आहे. महायुती सरकारने संपूर्ण महाराष्ट्राचा ७/१२ च अदानी अँड कंपनीला द्यायचा ठरवले आहे का ?

विजय वडेट्टीवार,विरोधी पक्षनेते

### अदानी समूहाच्या हातून बाराखडी लिहिण्याची वेळ

देशाला शिक्षणाचा मार्ग देणा?या महाराष्ट्रावर आज अदानी समूहाच्या हातून बाराखडी लिहिण्याची वेळ आली आहे. आता शाळादेखील हे सरकार अदानीच्या ताब्यात देत आहे. आता थेट चंद्रपूरच्या माउंट कार्मेल शाळेचा कारभार अदानी समूहाकडे दिला आहे.

अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते

परिणामी अहमदाबाद येथील अदानी फौऊंडेशनला या शाळेचे हस्तांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत सुमारे २ हजार विद्यार्थ्यांची या शाळेत पटसंख्या असून शाळेतील शिक्षकांनी मात्र या आदेशानंतर काहीही बोलण्यास नकार दिला आहे. सर्वाधिक शिक्षकांचे मोबाईल बंद आहेत.

# सीइओंनी घेतली महिला कर्मचाऱ्यांची संवाद कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती,दि. ३० सप्टेंबर:**
अधिकारी, कर्मचारी यांच्यातील दरी घटविण्याचा प्रयत्न म्हणून जिल्हा परिषदेच्या सीइओ संजीता महापात्र यांनी महिला कर्मचाऱ्यांची संवाद कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेतील मार्गदर्शनानंतर उपस्थित महिला कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणीही करण्यात आली.

अधिकारी आणि कर्मचारी यांच्यादरम्यानचे संबंध सहज, सुलभ आणि एक-दुसऱ्यालपुरक असावे, असे मत यावेळी महापात्र यांनी व्यक्त केले. त्यासाठी नावीण्यपूर्ण कल्पनेचा भाग म्हणून त्यांनी ही एक दिवसीय संवाद कार्यशाळा आयोजित केली होती. त्यांच्यामते महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच समस्या असतात. परंतु त्याकडे हवे तेवढे लक्ष देण्यास त्यांना व त्यांच्या विभागप्रमुखांना वेळ नसतो. हीच बाब हेरून हा नवा उपक्रम वेळोवेळी राबविला जाणार आहे.

यावेळी आरोग्य विभागातील पथक आणि स्त्री रोग तज्ज्ञांकडून महिलांची आरोग्य तपासणी, मुख रोग तपासणी, रक्त चाचणी करण्यात आली. याशिवाय मानसीक रोग सल्ला, घरकाम आणि कार्यालयीन कामाचे व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शनही करण्यात आले. दरम्यान महिलांविषयक कायदे , विशाखा समिती तसेच इतर बाबींची माहिती विधी अधिकारी ड. प्रणाली कठारे व ड. प्रणिता भाकरे यांनी दिली. कार्यशाळेच्या शेवटी जि. प. आवारात 'ऐक पेड माँ के नाम' कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यशाळेच्या यशस्वीतेकरीता डॉ. अभिजीत वानखडे, डॉ. साजीत पटेल, अशोक काठोरी , अर्पणा आत्राम, अर्चना मानकर, बबिता राणे, दीपाली पडोळे यांनी परिश्रम घेतले.



### टॉक टू सीइओ

कार्यशाळेदरम्यान टॉक टू सीइओ अशी चर्चाही करण्यात आली. या कार्यक्रमात संजीता महापात्र यांनी आपल्या वैयक्तिक आणि कौटूंबिक जीवनाचा प्रवास, पूर्वीच्या नोकरीतील आलेला अनुभव, युपीएससी परीक्षेसाठी कुंटूबातून मिळालेले पाठबळ इत्यादी बाबतचे अनुभव सांगितले. तसेच उपस्थित महिलांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, मुख्य लेखा वित्त अधिकारी अश्विनी मारणे यांनी महिलांनी सक्षम होण्यासाठी आपली भूमिका विषद केली.

# विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्यात प्रथमच 'स्वयं प्रभा' योजना

## केंद्र शासनाच्या शैक्षणिक दर्जा उंचावणाऱ्या उपक्रमांतर्गत टीव्हीचे वितरण

■ महासागर प्रतिनिधी
**बुलडाणा,दि. ३० सप्टेंबर:**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरिता स्वयं प्रभा ऑनलाइन एज्युकेशन कौन्सिलिंग हा कार्यक्रम सुरू केला आहे. हा कार्यक्रम जिल्ह्यात सर्वप्रथम विद्यार्थ्यांकरिता आपण आणला आहे. आणि या योजनेच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना ६५ हजारांचा टीव्ही हा फक्त ९०० रुपयांत उपलब्ध करून दिला जात आहे. या टीव्हीमध्ये मनोरंजनासह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमाचे धडे दिले जाणार आहेत. सोबतच याचा कम्प्युटर म्हणून सुद्धा उपयोग केला जाऊ शकतो ऑनलाइनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचा भरपूर लाभ या टीव्हीच्या माध्यमातून घेता येणार आहे, असे प्रतिपादन माजी आमदार विजयराज शिंदे यांनी केले.




केंद्राच्या या योजनेंतर्गत टीव्हीचे वितरण आज राजे गार्डन येथे विजयराज शिंदे यांच्यामार्फत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर चंद्रकांत बर्दे, अनंता शिंदे, सचिन शेळके, महादेव शिंदे, गणेश दत्तात्रय शिंदे, मुन्ना बगाडे, लक्ष्मीकांत बगाडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना विजयराज शिंदे म्हणाले की, शासनाची ही योजना आपण घरोघरी पोहोचवणार आहोत.

त्याकरिता आज या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. जवळपास १०० विद्यार्थ्यांना आज या टीव्ही संचाचे वाटप करण्यात आले आहे. लवकरच हजारो विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. त्याकरिता माझ्या शिवालय कार्यालयात विनामूल्य अर्ज विद्यार्थ्यांनी करावा. आणि त्या विद्यार्थ्यांनी कागदपत्र सादर केल्यानंतर या उपक्रमासाठी ते पात्र ठरणार आहेत. फक्त १४,९०० रूपये सुरुवातीला भरल्यानंतर त्या विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये १४ हजार रुपये पुन्हा परत मिळणार आहेत. त्यामुळे या शैक्षणिक टीव्हीचा लाभ विद्यार्थ्यांना फक्त ९०० रुपयांत मिळणार आहे. यावेळी शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हे पाऊल विद्यार्थ्यांच्या यशस्वी भवितव्यकरिता नवी शैक्षणिक क्रांती घडवणारा ठरणार आहे.

# नवीन फॅड! तोंडातून धूर सोडणारी बिस्किटे

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर ,दि. ३० सप्टेंबर:**
लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळ्यांमध्ये धूर सोडणाऱ्या बिस्किटांचे आकर्षण वाढले आहे.हे बिस्कीट नायट्रोजनमध्ये बुडवले जात असल्याने त्यातून धूर निघतो. हा धूर मानवाच्या फुफ्फुसापर्यंत जाऊन इजा करतो. त्यामुळे श्वसन विकार संभवतात, असे निरीक्षण क्रीम्स रुग्णालयाच्या अभ्यासात नोंदवण्यात आले आहे. हे संशोधन रेस्पिरेटरी केस रिपोर्ट या हेल्थ जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहे.

हल्ली नागपूरसह राज्यातील विविध भागात लग्न समारंभ, वाढदिवस, विविध मेळाव्यांसह इतरही कार्यक्रमात तोंडातून धूर सोडणाऱ्या बिस्किटांचे फॅड आले आहे. लहान मुलांपासून सगळ्याच वयोगटातील नागरिकांना त्याचे आकर्षण आहे. मात्र, ही बिस्किटी दुसरं तिसरं काही नसून लिक्विड नायट्रोजन मध्ये बुडवलेली बिस्किटे आहेत. तोंडात कोंबल्यावर ही बिस्किटे धूर सोडतात, ती नायट्रोजनची वाफ असते. ही नायट्रोजनची अतिथंड वाफ तोंडाद्वारे फुफ्फुसांपर्यंत जाते आणि इजा करते; मुख्य म्हणजे त्यामुळे अस्थमासारखे श्वसन विकार होतो.

क्रीम्स रुग्णालय हे बिस्किट सेवन केलेल्या मुलावर अभ्यास केला गेला. येथे काही महिन्यापूर्वी एक १० वर्षीय बालक महिनाभरापासून कोरडा खोकल्याची समस्या घेऊन आला होता.बुजलेले नाक, गळ्यात खवखव आणि डोकेदुखीही होती. सुरवातीला मुलाने इतर खासगी डॉक्टरकडे उपचार घेतला. येथे मुलावर प्रतिजैविकाची मात्राही पूर्ण केली गेली. परंतु आराम पडला नाही. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्याने रुग्णाला नागपुरातील क्रीम्स रुग्णालयात श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. अशोक अरबट यांना दाखवले गेले. येथे इतिहासात मुलाने काही दिवसांआधी धूर सोडणारे नायट्रोजन बिस्कीट खाल्ल्याचे पुढे आले. लिक्विड नायट्रोजनचे तापमान शुन्याहून कमी असते. हे बिस्कीट खाल्ल्याने श्वासनलिकेतील तापमान अचानक कमी होते. त्यामुळे रुग्णाला गळ्यात अस्वस्थ आणि श्वसननलिका बधिर वाटू लागते. हा गंभीर प्रकार असल्याने क्रीम्स रुग्णालयातर्फे डॉ. अशोक अरबट यांनी त्यावर संशोधनात्मक काम केले.

# लोणारचीही अर्थव्यवस्था पर्यटन उद्योगावर चालेल : शांतीलाल गुगलीया

■ महासागर प्रतिनिधी
**लोणार ,दि. ३० सप्टेंबर:**
लोणार हे जागतिक पर्यटन केंद्र आहे. अनेक देशांची व राज्याची अर्थव्यवस्था ही पर्यटनावर चालते. भविष्यात लोणारचीही अर्थव्यवस्था पर्यटनावर चालेल, असे प्रतिपादन शांतीलाल गुगलीया यांनी केले.

जागतिक पर्यटन दिन व खासदार मुकुल वासनिक यांच्या वाढदिव्सानिमित्त दि. २७ सप्टेंबर रोजी शहरात वासनिक यांच्या वन्यजीव फोटोग्राफीच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन काँग्रेसचे नेते विजय अंभोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गुगलीया अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी, निसार शेख, गटनेते भूषण मापारी, बादशहा खान, ज्ञानेश्वर चिभडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी, ज्योती राठोड, शे. करामत यांची उपस्थिती होती. विजय अंभोरे यांनी यावेळी खासदार वासनिक यांच्या वन्यजीव फोटोग्राफी बाबत माहिती दिली. प्रास्ताविक गजानन खरात यांनी केले. सूत्रसंचालन मनीष पाटोळे यांनी केले.

# लाडकी बहीण योजनेचा लाभ न मिळाल्याने महिलांचा संताप



■ महासागर प्रतिनिधी
**यवतमाळ,दि. ३० सप्टेंबर:**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे बँका आणि महिलांमध्ये वारंवार संघर्षाची परिस्थिती उद्भवत आहे. बहुतांश महिलांनी बँकेत खाते काढल्यानंतर केवायसी न केल्याने अर्ज करूनही असंख्य महिला लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. सोमवारी घाटंजी येथील महाराष्ट्र बँकेसमोर महिलांनी आंदोलन करून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्याची मागणी केली. बँकेने तत्काळ केवायसी पूर्ण नाही केली तर बँकेत शिरून आंदोलन करण्याचा इशारा दिला.

राज्य सरकारने महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत दरमहा दीड हजार रूपये मानधन सुरू केले. घाटंजी येथील महाराष्ट्र बँकेने महिला खातेदारांची केवायसी पूर्ण न केल्याने असंख्य महिलांना अद्याप या योजनेला लाभ मिळाला नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्या महिलांनी केला आहे. या संदर्भात वारंवार निवेदन देवूनही बँकेकडून पूर्तता न झाल्याने घाटंजी नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष शैलेश ठाकूर यांच्या नेतृत्वात महिलांनी आज महाराष्ट्र बँकेसमोर धरणे आंदोलन केले. केवायसीसह इतर नियम समोर करून महिलांना या योजनेपासून वंचित ठेवले जात असल्यावा आरोप यावेळी महिलांनी केला.

लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य बँक खात्यात त्वरीत जमा करण्याच्या शासनाच्या सूचना आहेत. या योजनेसाठी शासनाने अनेक अटी शिथिल केल्या. असे असतांनाही घाटंजी येथील महाराष्ट्र बँकेचे व्यवस्थापक महिलांना असभ्य आणि अपमानजनक वागणूक देत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्या महिलांनी केला. अनेक महिलांनी सूचना मिळताच केवायसीसाठी आवश्यक कागदपत्रे बँकेकडे जमा केल्यानंतरसुध्दा मागील एक महिन्यापासून बँकेने बऱ्याच महिलांच्या केवायसी प्रलंबित ठेवल्याचा आरोप शैलेश ठाकूर यांनी केला आहे. या महिलांची यादी आता बँकेकडे सुपूर्द करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. केवायसी किंवा अन्य कारणांमुळे तात्पूरते बंद पडलेले बँक खाते पुन्हा सुरू करण्यात यावे आणि या योजनेचा लाभ महिलांना द्यावा, अशा मागणीचे निवदेन महिलांना आज बँकेच्या व्यवस्थापकांना दिले. महाराष्ट्र बँकेच्या वरिष्ठांनी घाटंजी शाखा व्यवस्थापकास समज द्यावी तसेच प्रलंबित केवायसीची कामे प्राधान्याने पूर्ण करावी. अन्यथा १० ऑक्टोबर रोजी बँकेत शिरून आंदोलन करण्याचा इशारा शैलेश ठाकूर यांनी दिला आहे. या आंदोलनात सैयद फिरोज, विक्की ठाकूर, पवन गोडे, विनोद महाजन, सुरेश जाधव, वसंता मोरे, कज्जुम कुरेशी, योगी सरवय्या, ओम नैनपार, सुभाष गटलेवार, दादा गिनगुले यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

# गडचिरोली जिल्ह्यात जंगली हत्तींचा हैदोस

## शहराच्या सीमेत प्रवेश केल्याने वनविभागाची तारांबळ, यंदा हत्तीच्या संख्येत वाढ

■ महासागर प्रतिनिधी
**गडचिरोली,दि. ३० सप्टेंबर:**
गेल्या तीन वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्यात धुमाकूळ घालणा?या रानटी हत्तींनी २९ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास प्रथमच गडचिरोली शहराच्या सीमेत प्रवेश केल्याने वनविभागाची चांगली तारांबळ उडाली. दुपारी मसेली परिसरात तर सायंकाळी वाकडी व सेमाना देवस्थानच्या मध्यभागातील जंगलात कळपाचा वावर होता. यामुळे वन विभाग व हुल्ला टीमला चामोर्शी मार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी काही काळ रोखावी लागली. मागील आठ दिवसांपासून रानटी हत्तींचा कळप पोर्ला वनपरिक्षेत्रातील चुरचुरा उपक्षेत्रात वावरत होता.



या भागातील नवरगाव, कोडना, साखरा, गोगाव, महादवाडी, कुन्हाडी आदी भागातील शेतक?यांच्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस केली. त्यानंतर गोगावलगतच्या नागोबा देवस्थान परिसराच्या शेतशिवारात शनिवारी पीक पायदळी तुडविले. त्यानंतर रात्रीच्या सुमारास कळपाने खरपुंडी गावाजवळची कठाणी नदी ओलांडून सालईटोला गावाच्या बाजूने माडेतुकूम परिसरातून गडचिरोली-धानोरा मार्ग ओलांडला.

टेकडीवरील हनुमान मंदिर परिसरातून हा कळप पोटेगाव मार्गाच्या बाजूने मसली गावाच्या दिशेने गेला. रविवारी दुपारपर्यंत याच भागात हा कळपाचा वावर होता. त्यानंतर सायंकाळी सेमाना उद्यान ते वाकडी फाट्याच्या मधोमध असलेल्या जंगलातून हत्तींनी चामोर्शी मार्ग ओलांडला. त्यांचा रोख मुडझा गावाच्या दिशेने होता. हत्तींचा वावर पाहून वन विभागाच्या पथकाने वाहतूक बंद केली. यावेळी नागरिकांना ध्वनिक्षेपकावर माहिती दिली.

**कळपात नवीन पाहुणे**

काही वर्षांपूर्वी छत्तीसगडहून गडचिरोली दाखल झालेल्या या रानटी हत्तींच्या कळपामध्ये २३ हत्ती होते. मधल्या काळात यातील दोन हत्तींचा मृत्यू झाला. यादरम्यान कळपात जवळपास आठ नव्या पाहुण्यांचे आगमन झाले. त्यामुळे हत्तींची संख्या २८ ते २९ असल्याची शक्यता वनाधिका?यांनी वर्तवली आहे. या हत्तींना खायला मोह आणि कोवळे धान आवडत असल्याने या काळात ते अधिक प्रवास करतात. यामुळे मोठ्या प्रमाणात धान पिकाचे नुकसान होत आहे. वन विभागाने मुडझा आणि गडचिरोली शहरालगतच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-tender Notice**

The Executive Engineer, MSEDCL, Civil Lines Division invites e-tenders in two bid system from Experienced & Reputed Agencies having experience of similar work in MSEDCL & completing the formalities for **"Work Contract for cleaning of urinals, latrine & cannels Sweeping, grass cutting etc. at various Sub-Stations & Offices under Civil Lines Division"** having Tender No. **EE/CLDN/Tech/eTender/24-25/T-02 for amounting Rs.10/-Lakh.** The Tender fees & other details are available on website **etender.mahadiscom.in/eatApp//.** The Tender documents can be downloaded from aforesaid website from **Dt.01.10.2024.** Submit the tender duly filled in **on or before Dt.10.10.2024 before 14:00 hrs.**

**Executive Engineer**
**O&M, MSEDCL, Civil Lines Division, Nagpur**

**कृषि उत्पन्न बाजार समिती, रामटेक जि. नागपूर**

**जाहीर सुचना**

कृषि उत्पन्न बाजार समिती, रामटेक मुख्य बाजार आवारातील शॉ. कॉ.क्र. ०१ मधील गाळे क्र. ४ व १८ श्री. अभय मोरेश्वरनी वाघमारे, रा. शितलवाडी यांना लिजवर देण्यात आले होते. सदर लिजधारक यांचे निधन झाल्यामुळे, त्यांचा मुलगा श्री. शाश्वत अभय वाघमारे व श्री. अविजीत अभय वाघमारे यांचे नावे उपरोक्त गाळे हस्तांतरण करण्यासाठी त्यांचा अर्ज समितीकडे प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त बाबतीत कोणाचीही उजर, वाद अथवा अन्य काही असल्यास जाहीर सुचना प्रसिध्दी होण्याचा दिनांका पासुन सात दिवसाच्या आत लेखी म्हणने बाजार समिती रामटेककडे सादर करावे त्यानंतर आलेले कोणत्याही स्वरूपाचा उजर, आक्षेप ग्राहय धरले जाणार नाही.

सचिन किरपान
सभापती
कृ.उ.बा.स रामटेक

हनुमंता ओं. महाजन
सचिव
कृ.उ.बा.स रामटेक

# परतीच्या पावसाने हिरावला हाता तोंडाशी आलेला घास

■ महासागर प्रतिनिधी
**किनगावराजा ,दि. ३० सप्टेंबर:**
किनगावराजा सिंदखेडराजा तालुक्यात मागील तीन ते चार दिवसांपासून सतत सुरू असलेल्या परतीच्या दमदार पावसाने शेतकऱ्यांची दाणादाण उडाली आहे. अनेक शेतांमध्ये उभ्या पिकात पाणी साचले आहे. तसेच सोंगणीला आलेल्या सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या पावसामुळे हाता-तोंडाशीआलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक संकटात सापडले आहेत. काही दिवसांच्या विश्रांतीनंतर सिंदखेडराजा तालुक्यात तीन ते चार दिवसांपासून परतीच्या



पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. बुधवार, २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास तालुक्यात जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे तालुक्यातील बहुतांश भागात शेतांमध्ये पाणीच पाणी साचले आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **VISHWAS SUDHAKAR CHATI.** MY NEW NAME IS **VISHWAS SUDHAKAR CHATE.**
**ADD:** PLOT NO.17, VAISHNOV PARK BELTARODI ROAD NAGPUR

**नगर पंचायत कांद्री (कन्हान) जिल्हा नागपूर**
**दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान - DAY-NULM**

**निविदा सूचना**

दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान नगर पंचायत कांद्री अंतर्गत पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) कायदा २०१४ च्या तरतुदीनुसार कांद्री शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे आहे. मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी-मुंबई यांचे पत्र क्र. राणाउअ २०१४ /**SUSV** / सूचना / का- १६/४१०९ दि. १० सप्टेंबर २०१७ च्या पत्रानुसार मोबईल ॲप (**Mobile App**) सॉफटवेअर (**Software**) च्या माध्यमातून सर्वेक्षण करणे आहे. पथविक्रेत्याचे यथायोग्य व प्रभावी सर्वेक्षनाकरीता अनुभवी व सर्व साधने उपलब्ध असणारी मान्यताप्राप्त बाह्य यंत्रणा व्यक्ती अथवा संस्थेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

परिपूर्ण असलेल्या निविदा ०१/१०/२०२४ ते दि. ०७/१०/२०२४ सोमवार साय ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सुट्टीचे दिवस वगळता कार्यालय नगर पंचायत कांद्री येथे स्वीकारल्या जातील. प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्वीकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी तथा शहर प्रकल्प अधिकारी नगर पंचायत कांद्री यांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करून देण्यात येतील. तद्नतच कोऱ्या निविदा रु. ५०/रोखीने भरून कार्यालयात नगर पंचायत (**DAY-NULM** - विभाग) कांद्री येथे कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घेता येतील.

सदरची निविदा कोणत्याही किमान कामाचा हक्क प्रस्थापित करत नाही.

सचिन गाढवे
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर पंचायत कांद्री (कन्हान)

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# जोश

# ट्राय करा ट्रेंडी प्रिंट्स

दोस्तांनो, तुम्ही वॉर्डरोब अपडेट करायचा विचार करताय का, काहीतरी हटके, वेगळं घेण्याचं ठरवलं आहे का?सध्या प्रिंटेडची चांगलीच चलती आहे. तुम्ही निरनिराळ्या प्रिंट्स ट्राय करू शकता. सणासुदीच्या निमित्ताने किंवा सहज म्हणून शॉपिंग करण्याच्या विचारात असाल तर या प्रिंट्सचा नक्की विचार करा.

फॅशन पॅशन

* पोलका डॉट हा प्रकार चांगलाच इन आहे. मुलीच नाही तर मुलंही पोलका डॉट अगदी आरामात कॅरी करू शकतात. वेगवेगळ्या ऑकेजन्सला पोलका डॉटवाले शर्ट आणि टी शर्ट कॅरी करता येतील. अगदी कामाला जातानाही पोलका डॉटवाला शर्ट घालता येईल. पण यासाठी शर्टवरचे पोलका डॉट्स छोट्या आकाराचे असावेत.

* चेक्सची नेहमीच चलती असते. तुम्ही स्टायलिश चेक्स अगदी आरामात कॅरी करू शकता. चेक्स हा प्रकार नेहमीच छान दिसतो. त्यामुळे चेक्स ट्राय करायला हरकत नाही.



* ट्रॉपिकल प्रिंट हा प्रकार ट्राय करा. रंगीबेरंगी, वेगवेगळ्या आकाराचे प्रिंट्स असणारे शर्ट कॅज्युअल ऑकेजनची शान ठरतात. पिकनिकसाठी ही प्रिंट बेस्ट

* ॲनिमल प्रिंट्सही ट्राय करता येतील. झेब्रा आणि लेपर्ड प्रिंटवाले शर्ट मिळतात. पण तुम्ही त्यापेक्षा काहीतरी वेगळं ट्राय करू शकता. बदकं, बगळे यांच्या प्रिंट्सही छान दिसतात.

* इक्कटवाले शर्ट ट्राय करता येतील. इक्कट हे भारतातलं पारंपरिक डिझाइन आहे. या डिझाइनचे कुर्ते किंवा कुर्ता शर्ट छान दिसतील.

# ड्रोन बनवून साकारला करोडोंचा बिझनेस!

एखादे स्वप्न पाहिले की ते कोणत्याही परिस्थितीमध्ये पूर्ण झालेच पाहिजे, असा आपला आग्रह असतो. मग त्याच्या पूर्ततेसाठी कितीही कष्ट घ्यावे लागेल तरी ते सहन करण्याची शक्ती ते स्वप्नच आपल्याला देत असते. मध्य प्रदेशमधील भोपाळ मधल्या २३ वर्षांच्या आदित्य यादवने देखील असेच स्वप्न पाहिले आणि सत्यात देखील उतरवले.

मूळचा अमरावतीचा असणाऱ्या आदित्यने आपल्या गावची परिस्थिती लक्षात घेऊन भोपाळमध्ये शिक्षण घेण्याचे ठरवले. सध्या 'रेजेस इंडिया' या ड्रोन निर्मिती कंपनीचा सह-संस्थापक म्हणून तो कार्यरत आहे. त्याने भोपाळमधून कॉम्प्युटर सायन्समध्ये बीटेक केले. 'मी ज्या गावामधून आलो आहे, तिथे या सगळ्या गोष्टींचा विचार करणंही कठीण होतं, असेही तो सांगतो. त्याचे शिक्षण सरकारी शाळेत झाले. आदित्यने अभियांत्रिकीचे शिक्षण घ्यावे आणि कोणतीही स्थिर नोकरी करावी, अशी त्याच्या वडिलांची इच्छा होती. त्यामुळे व्यवसायाऐवजी नोकरी करण्यावर त्याच्या वडिलांचा भर होता.

अचिव्हर

परिणामी, २०१८ मध्ये आदित्यने भोपाळला इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्याला विषयाच्या थिअरीऐवजी प्रॅक्टिकलमध्ये जास्त रस होता. वरिष्ठांबरोबर काम करत असताना ड्रोन या उपकरणाशी त्यांचा संबंध आला. त्यानंतर एका ड्रोन स्पर्धेमध्ये भाग घेण्याच्या निमित्ताने त्याने जवळून ड्रोनचा अभ्यास केला. आणि प्रयत्नांति परमेश्वर म्हणतात, तसा तो पहिल्याच प्रयत्नामध्ये या स्पर्धेमध्ये पहिला आला. तिथून सुरू झालेला ड्रोनचा प्रवास पुढेही अव्याहतपणे सुरूच राहिला. त्याने जवळपास ६० हून अधिक ड्रोन स्पर्धांमध्ये भाग घेतला. यामुळे आत्मविश्वासही वाढल्याचे तो सांगतो.



२०२० नंतर केंद्र सरकारने ड्रोनच्या व्यावसायिक वापराला परवानगी दिली. त्यामुळे करिअरचा ऑप्शन म्हणून ड्रोनचा अभ्यास करणे आदित्यसाठी महत्त्वपूर्ण ठरले. फीसाठी आलेले पैसे तो ड्रोनच्या संशोधनात खर्च करायचा. त्यातूनच त्याने एका कंपनीसाठी ड्रोन बनवले. हे ड्रोन विकले जातील आणि त्यामधून फी भरता येईल असे वाटत असतानाच त्या कंपनीने ड्रोन घेण्यास नकार दिला. त्यामुळे ना ड्रोन विकला गेला ना सेमिस्टरची फी जमा झाली. शेवटी मित्रांकडून उधार घेऊन त्याने फी भरली. एक वेळ अशी आली की समोसे खाऊन दिवस काढावा लागायचा.

आदित्य म्हणतो, 'कोरोनानंतर कृषी आणि वैद्यकीय क्षेत्रात ड्रोनला खूप मागणी आहे. बाजारात कंपन्या त्यांच्या गरजेनुसार ड्रोन बनवतात आणि विकतात, पण आम्ही कस्टमाइज्ड ड्रोन विकतो. बक्षीस म्हणून मिळालेल्या पैशातून मी एक कंपनी सुरू केली. मी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सुमारे दीड लाख रुपये जिंकले होते. या पैशातून मी ड्रोन बनवायला सुरुवात केली.' सध्या आदित्यचे १०० हून अधिक ग्राहक आहेत. मध्य प्रदेश व्यतिरिक्त महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशमध्ये कृषी क्षेत्रात तो कार्यरत आहे. तो म्हणतो, 'एका कंपनीने मला रोबोट डिझाइन करण्यासाठी काम दिले. त्यातून झालेला नफा त्या कंपनीला मिळाला. मी विचार केला की मी दुसऱ्या कंपनीसाठी काम करू शकतो, तर माझ्या स्वतःच्या कंपनीसाठी का नाही. ड्रोन बनवल्यानंतर मी ड्रोन उद्योगात काम करणाऱ्या काही लोकांना भेटू लागलो. माझे वय पाहून त्यांना माझ्या कामावर शंका यायची. डील रद्द व्हायची. खूप मेहनतीनंतर पहिला सरकारी प्रकल्प मिळाला. आता हळूहळू लोकांचा कंपनीवर विश्वास निर्माण होत आहे. या व्यतिरिक्त, आम्ही शैक्षणिक संस्थांना ड्रोन लॅब देखील प्रदान करतो.'

मी काम करायला सुरुवात केली तेव्हा मी स्वतःचा व्यवसाय करत असल्याचे माझ्या घरच्यांनाही सांगितले नाही. तब्बल सहा महिन्यांनी त्यांना कळाले. फीसाठीचे पैसे मी ड्रोन विकसित करण्यासाठी गुंतवायचो हे त्यांना समजले. मात्र, नंतर त्यांना वाटले की मी जे काही केले ते योग्यच आहे. गेल्या वर्षी आम्ही सुमारे ६० लाख रुपयांचे ड्रोन विकले. यावर्षी आम्ही एक कोटींचा व्यवसाय करत आहोत. ज्या पद्धतीने ड्रोनची मागणी बाजारात वाढत आहे, लवकरच आम्ही आणखी काही नवीन उत्पादने बाजारात आणणार आहोत.

## फंडू एसएमएस

अच्छे तो सभी होते है,
बस पहचान बुरे वक्त में होती है।

दो पल की जिंदगी के दो नियम,
निखरो फुलों की तरह और
बिखरो खुशबू की तरह

लिखी हुई बात को प्रत्येक
पढनेवाला नहीं समझ सकता,
क्योंकी लिखनेवाला भावनाएं लिखता है,
और लोग केवल शब्द पढते हैं।

## व्हॉट्स न्यू?


### मेसेंजर वापरताना...

दोस्तांनो, फेसबुक मेसेंजर वापरताना आपण थोडी काळजी घ्यायला हवी. फेसबुकचीही याबाबत काही मार्गदर्शक तत्त्व आहेत. मेसेंजर वापरताना काय करायला हवं आणि काय नाही हे आपण जाणून घ्यायला हवं. मेसेजमध्ये अपशब्दांचा वापर करू नये तसंच परवानगीशिवाय कोणताही मेसेज फॉरवर्ड करू नये. कोणत्याही मेसेजकडे दुर्लक्ष करू नका. मेसेज संक्षिप्त शब्दात केला असला तरी वाक्य पूर्ण लिहा. सध्या शॉर्टफॉर्ममध्ये लिहायची पद्धत आहे. पण अशा शब्दांचा वापर करू नका. प्रचलित शब्दांचा वापर करा, असंही सांगण्यात येत आहे.

facebook Messenger

## ॲप वर्ल्ड

### मेंदू ठेवा तल्लख



सध्याच्या धकाधकीच्या काळात मानसिकदृष्ट्या सक्षम असणंही गरजेचं आहे. मेंदूचा फिटनेस राखणारी काही ॲप्स आहेत. फॅब्युलस हे ॲप तुमच्या प्रत्येक कृतीवर लक्ष ठेवतं. त्यानुसार तुमच्या मेंदूवर येणाऱ्या ताणाची माहिती देतं. हा ताण कमी करण्यासाठी काय करायला हवं हेही सांगतं. काल्म नावाचं एक ॲप आहे. या ॲपमध्ये शांततेसाठी ध्यानधारणेच्या पद्धती सांगण्यात आल्या आहेत. धीम्या संगीताची जादूही तुम्ही अनुभवू शकता.

## स्मार्ट गॅझेट

### स्मार्ट जॅकेट

तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे बरंच काही नवं येत असतं. मध्यंतरी एक बाजारात दाखल झालं. या जॅकेटचा वापर करून तुम्ही सेल्फीही काढू शकता. इतकंच नाही तर हे जॅकेट फोनही उचलेल. यात गूगलच्या जॅकार्ड तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हे जॅकेट तुमच्या फोनशी कनेक्ट होईल. तर असं हे अनोखं जॅकेट घालून फिरण्याची मजा काही औरच म्हटली पाहिजे.



## स्मार्ट टिप्स

### अनुभव संगीताचा

विविध प्रकारच्या सादरीकरणासाठी गुगल शीट्सचा वापर केला जातो. हे सादरीकरण अधिक आकर्षक करण्यासाठी तुम्ही त्यात संगीताची पेरणी करू शकता. ऑनलाईन म्युझिकशी संबंधित विविध ॲप्सच्या माध्यमातून तुम्ही गुगल शीट्समध्ये एखादी धून लावू शकता. यामुळे तुमचं प्रेझेंटेशन अधिक चांगल्याप्रकारे लोकांपर्यंत पोहोचेल.

Google Sheets

# कारकिर्दीची संगीतमय वाट



काही वर्षांपूर्वीपर्यंत संगीत छंदापुरतं मर्यादित होतं. गायन, नृत्य, वादनाकडे एक कौशल्य म्हणून बघितलं जायचं. मात्र आता या क्षेत्रात चांगली संधी मिळू शकते. रिॲलिटी शोजमुळे गायक, वादक आणि नृत्यकलेत निपुण असणाऱ्यांना व्यासपीठ मिळतं. या व्यासपीठाद्वारे तुम्ही पुढे येऊ शकता. संगीत क्षेत्रात करिअर करण्याचा विचार असेल तर काय करायला हवं याविषयी...

वेगळ्या वाटा

या क्षेत्रात येण्यासाठी तुमच्याकडे कौशल्य असायला हवा. कौशल्याशिवाय तुम्ही काहीच करू शकत नाही. संगीताचं ज्ञान तुम्हाला या क्षेत्रात पुढे नेऊ शकतं. या क्षेत्रात चमकण्यासाठी जनसंपर्कावर भर द्या. विविध कार्यक्रमांमधून स्वत:चं कौशल्य दाखवा. रिॲलिटी शोमध्ये सहभागी व्हा. या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी तुम्हाला बराच संघर्ष करावा लागतो. पण एकदा यश मिळाल्यावर पैसा आणि प्रसिद्धी दोन्ही गोष्टी अगदी सहज मिळतात.

चेन्नईतली कलाक्षेत्र ही संस्था, दिल्लीची संगीत नाटक अकादमी अशा संस्थांमधून संगीताशी संबंधित विविध अभ्यासक्रम पूर्ण करता येतील. या अभ्यासक्रमांमध्ये संगीताशी संबधित विविध विषय शिकवले जातात. संगीताच्या क्षेत्रात नवी कवाडं खुली झाली आहे. गायन, वादन, नृत्यापलीकडेही तुम्ही बरंच काही करू शकता. टीव्हीवरच्या सांगितिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकता. म्युझिक टेक्नॉलॉजिस्ट, साउंड रेकॉर्डिस्ट म्हणूनही काम करता येईल. म्युझिक मॅनेजमेंटचं क्षेत्रही आता भारतात लोकप्रिय होऊ लागलं आहे. अशा प्रकारे आपल्या संगीताचं ज्ञान अर्थार्जनासाठी वापरता येईल.

# होऊ शकता लवकर म्हातारे!

आजकाल प्रत्येकाला आपला चेहरा सुंदर दिसावा, असे वाटते. पण वाढत्या वयानुसार चेहऱ्यावर वृद्धत्वाची चिन्हे दिसू लागतात. काही लोकांमध्ये वयाच्या आधी वृद्ध दिसायला लागतात. आपण दिवसभरात अनेक गोष्टी करतो. या गोष्टीचा थेट परिणाम आपल्या त्वचेवर दिसतो. विशेषतः पुरुषांनी केलेल्या काही चुका त्यांना वयाच्या आधीच म्हातारे करतात.

* त्वचेचा प्रकार ओळखू न येणे : काही पुरुषांना वाटते की त्यांची त्वचा तेलकट आहे, त्यामुळे त्यांना चेहऱ्यावर जास्त क्रीम किंवा लोशन लावण्याची गरज नाही. पण त्वचेची आर्द्रता प्रत्येक व्यक्तीमध्ये कमी-अधिक असू शकते. अशा स्थितीत तुमच्या त्वचेचा प्रकार ओळखून क्रीम लावा. तर, क्रीम लावल्याने तुमची त्वचा मॉइश्चराइज होते.

* दाढी मऊ करा : दाढी केल्यावर दाढीवर रेझरचे डाग उमटतात. हे खराब रेझरच्या वापरामुळे झाले आहे, असे वाटते. याचे कारण दाढी मऊ नसणे हे असू शकते. अशा परिस्थितीत तुम्ही दाढी कराल तेव्हा दाढी आधी कोमट पाण्याने धुवा. यामुळे दाढी मऊ होईल.

ग्रुमिंग

* आफ्टरशेव्ह लावण्याची चूक : पुरुष अनेकदा शेव्हिंगनंतर आफ्टरशेव्ह लावतात, पण आफ्टरशेव लावल्याने त्वचेचे नुकसान होते. खरं तर आफ्टरशेव्हमध्ये अल्कोहोल असते, ज्यामुळे तुमची त्वचा कोरडी होऊ शकते. यासोबतच सुरकुत्याही दिसू लागतात. त्यामुळे आफ्टरशेव्ह करण्याऐवजी त्वचेला मॉइश्चरायझ करा.



* सनस्क्रीन : पुरुषांनी रोजच्या रोज सनस्क्रीन वापरणे गरजेचे आहे. त्वचेला युव्ही किरणांपासून वाचवण्यासाठी सनस्क्रीनचा वापर करू शकता. उन्हात जाण्याच्या १० मिनिटं आधी चेहरा आणि मानेला सनस्क्रीन लावावा.

* आहार : निरोगी त्वचेसाठी सकस आहार घेणंही महत्त्वाचे आहे. त्वचेचं खोलवर पोषण करण्यासाठी त्याची मदत होते. तुमच्या आहारात तुमच्या शरीरासाठी योग्य असणाऱ्या गोष्टींचा समावेश करा. या व्यतिरिक्त तजेलदार त्वचेसाठी तुम्ही अनेक प्रकारचे घरगुती फेस मास्क देखील वापरू शकता.

# आमचं लग्न होईल का?



मी ३० वर्षांचा मुलगा असून सध्या एका मुलीच्या प्रेमात आहे. ही मुलगी माझी दूरची बहिण आहे. तिचंही माझ्यावर खूप प्रेम आहे. आम्ही एकमेकांशिवाय अजिबात राहू शकत नाही. गेल्या साडेतीन वर्षांपासून आम्ही नात्यात आहोत. पण आमचे कुटुंबिय खूप जुनाट विचारांचे आहेत. आमचं नातं बहिणभावाचं असल्यामुळे आमच्या लग्नात अडचणी येऊ शकतील. कायद्यानुसार आम्ही लग्न करू शकतो का आणि आम्ही आमच्या घरच्यांची कशी समजूत काढू? कृपया मार्गदर्शन करा.


मॅच मेकिंग

उत्तर : प्रत्येक धर्माच्या काही प्रथा आणि परंपरा असतात. हिंदू धर्मात बहिण-भावांमध्ये लग्न होत नाहीत. अर्थात या सगळ्या गोष्टी प्रत्येकाच्या मानण्यावर असतात. काही कुटुंबांमध्ये लांबच्या नात्यातही लग्न करत नाहीत. आता तुमच्या नात्याबद्दल बोलायचं तर सर्वात आधी तू तुझ्या प्रेयसीशी बोल. तिच्या मनात काय आहे हे जाणून घे. तुम्ही एकमेकांशिवाय जगू शकत नसाल तर पुढे जायला हरकत नाही. तुम्ही तुमच्या कुटुंबातल्या लोकांशी बोला. तुम्हाला समजून घेणाऱ्या व्यक्तीशी बोला. तुम्ही खूप दूरचे नातेवाईक आहात. त्यामुळे या लग्नाला मान्यता मिळू शकते. त्यामुळे आधीच तर्क लढवत बसू नका. घरच्यांशी मोकळेपणाने बोला. तुम्हाला मार्ग मिळेल.

# स्कुबा डायव्हिंग करायचंय?



दोस्तांनो, स्कुबा डायव्हिंग हा धाडसी खेळ आहे. यात समुद्राच्या तळाशी जाऊन सागरी जीवन न्याहाळता येतं. हा एक भन्नाट अनुभव असतो. भारतातली काही ठिकाणी खास स्कुबा डायव्हिंगसाठी प्रसिद्ध आहेत. अशाच काही ठिकाणांवर नजर टाकू या.



* अंदमान निकोबार बेटांवर स्कुबा डायव्हिंगचा आनंद लुटता येतो. इथल्या निळ्याशार समुद्रातली सृष्टी बघणं हा अनोखा अनुभव ठरतो. समुद्राच्या तळाशी गेल्यानंतर मासे अगदी आपल्या जवळून जातात.

भटकंती

* लक्षद्विपलाही अनेक जण स्कुबा डायव्हिंगसाठी येतात. परदेशी पाहुण्यांनाही इथे स्कुबा डायव्हिंग करायचं असतं. ऑक्टोबर ते एप्रिल या काळात लक्षद्विपला जाता येईल. या दिवसात इथलं वातावरण आल्हाददायक असतं आणि स्कुबा डायव्हिंगचा आनंद लुटता येतो.

* कर्नाटकमधलं तरानी बेट स्कुबा डायव्हिंगसाठी खूप प्रसिद्ध आहे. तरानी बेटांना पिजन आयलंडही म्हटलं जातं. हे ठिकाण वॉटरस्पोर्टससाठी प्रसिद्ध आहे.

* गोव्यातल्या ग्रँड आयलंडवरही स्कुबा डायव्हिंगचा आनंद लुटता येतो. इथल्या स्वच्छ पाण्यात समुद्री जीवनाचं छान दर्शन होतं.

# गरमागरम ब्रेड पोहे

दोस्तांनो, सकाळी किंवा संध्याकाळच्या न्याहरीसाठी तुम्ही ब्रेड पोहे बनवू शकता.

झटपट रेसिपी

**साहित्य** : ८-१० ब्रेड स्लाईस, अर्धा कप शेंगदाणे, एक बारीक चिरलेला कांदा, एक टोमॅटो, दोन हिरव्या मिरच्या, चमचाभर लिंबाचा रस, थोडं जीरं, थोडी राई, चमचाभर बडीशेप, अर्धा चमचा हळद, अर्धा चमचा धनेपूड, अर्धा चमचा लाल तिखट, दोन चमचे तेल, मीठ

**कृती** : ब्रेड स्लाईसचे छोटे तुकडे करून घ्या. कढईत तेल गरम करून घ्या. त्यात राई आणि जीरं घालून फोडणी करा. आता त्यात कांदा, हिरव्या मिरचीचे तुकडे घालून शिजवून घ्या. यानंतर त्यात टोमॅटो आणि दाणे घालून शिजवा. टोमॅटो मऊ झाल्यावर त्यात सर्व मसाले घाला. मग ब्रेडचे तुकडे घालून दोन मिनिटं परतून घ्या. त्यात लिंबाचा रस घालून मिक्स करा. ब्रेड पोहे तयार आहेत.



## थोडक्यात

### नीतेश राणेंच्य वक्तव्यावरून मंत्री सामंत यांचा निशाणा

■ **कोल्हापूर :** भाजप आमदार नीतेश राणे यांच्या वादग्रस्त वक्तव्यावरून मंत्री उदय सामंत यांनी भाष्य केले आहे. अमरावतीतील अचलपूर पोलिस ठाण्यात नीतेश राणे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याप्रकरणी उदय सामंत यांनी प्रश्न विचारला असता, जाती जातींमध्ये तेढ निर्माण करणे योग्य नाही, असा सल्ला स्वामीजींना दिला आहे. हा सल्ला प्रत्येकाने तंतोतंत पाळला पाहिजे, अशी प्रतिक्रिया उदय सामंत यांनी दिली आहे.



मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी कोल्हापूर येथील कन्हेरी मठात महाराष्ट्रातील संत महंत, धर्माचार्य यांच्या 'संत समावेश' कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली. नंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नीतेश राणेंच्या वादग्रस्त वक्तव्यांवर भाष्य केले. तसेच लाडकी बहीण योजनेविषयी देखील स्पष्टीकरण देत उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

नितीश गडकरी यांनी उद्योजाकांनी सरकारच्या भरवशावर राहू नये. अनुदानाचे पैसे कधी येतील, याची शाश्वती नाही, कारण लाडकी बहीण योजनेला देखील पैसे द्यावे लागतात असे विधान केले होते. या विधानावर उदय सामंत यांनी स्पष्टीकरण दिले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी देण्यात येणाऱ्या निधीमुळे इतर योजनांवर तसेच उद्योजकांच्या अनुदानावरही परिणाम होणार नाही. याची पूर्ण दक्षता सरकारने घेतली आहे, असे उदय सामंत म्हणाले.

### एसटीचा अपघात, ४२ जखमी

**पुणे :** पुण्याच्या भोर तालुक्यात एक एसटी बस शेतात शिरल्यामुळे झालेल्या अपघातात ४२ प्रवासी जखमी झालेत. त्यापैकी ३ जणांची प्रकृती गंभीर आहे. तांत्रिक बिघाडामुळे चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात घडल्याची माहिती आहे.

अपघातग्रस्त बस भोर तालुक्यातील महुडे येथून भोरकडे येत होती. सकाळी एका वळणावर चालकाचे या बसवरील नियंत्रण सुटले आणि बस रस्ता सोडून थेट शेतात घुसली. त्यात ४२ प्रवासी किरकोळ जखमी झाले असून, ३ जण गंभीर जखमी झालेत. त्यांच्यावर लगतच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले.

# अनुदानासाठी सरकारच्या भरवशावर राहू नका

## नितीन गडकरींचा गुंतवणूकदारांना सल्ला



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३०:**
महायुती सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. विरोधी पक्षाकडून या योजनेवर टीका होत असताना आता केंद्रीय रस्ते बांधणी आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात बोलताना लाडकी बहीण योजनेबाबत केलेले विधान चर्चेत आले आहे.

गुंतवणुकदारांनी अनुदानासाठी सरकारच्या भरवशावर राहू नये, कारण लाडकी बहीण योजनेलाही पैसे द्यावे लागतात, असे वक्तव्य नितीन गडकरी यांनी केले आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये उद्योगांसंदर्भात आयोजित एका कार्यक्रमात गुंतवणुकदारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, सरकार हे विष कन्या असते. मग ते सरकार कोणाचेही असु द्या. ज्यांच्यासोबत जाते त्यांना ते बुडवते. त्यामुळे गुंतवणुकदारांनी सरकारला बाजूला ठेवावे.

तुम्ही सरकारच्या भरवशावर राहू नका. तुम्हाला सरकारकडून अनुदान घ्यायचे आहे तर घ्या. अनुदान घ्यायला काहीच हरकत नाही, मात्र अनुदान मिळेल की नाही, याची काही शाश्वती नसते.

नितीन गडकरी पुढे म्हणाले की, मला एकाने विचारले की, साडेचारशे कोटी रुपयांचे अनुदान आले आहे. पण ते पैसे कधी मिळतील? मी त्यांना म्हटले की, तुम्ही आता देवाकडे प्रार्थना करा. कारण काही भरोसा नाही.

ते म्हणाले, पैसे मिळणार की नाही? मी म्हटले, जेव्हा येतील तेव्हा मिळतील. ते म्हणाले, अनुदानाचे पैसे मिळतील का? मी म्हणालो, याची शाश्वती नाही. कारण लाडक्या बहीण योजनेलाही पैसा द्यावा लागतो, असे विधान नितीन गडकरी यांनी केले आहे. त्यांच्या या विधानाची आता चांगलीच चर्चा होत आहे. या योजनेवर यापूर्वी राज ठाकरेंसह विरोधकांनीही टीका केली आहे.

# सीएससी केंद्र चालकाने हडपले लाडक्या बहिणींचे पैसे

## ७१ जणांचे आधार कार्ड वापरुन मिळवले ३ लाख

■ **वृत्तसंस्था, नांदेड, दि. ३०:**
राज्य सरकारने महिलांसाठी आणलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत अनेकजण गैरव्यवहार करून पैसे हडपण्याचे प्रकार समोर येत आहेत. सातारा, अकोला जिल्ह्यातील प्रकरणे ताजी असतानाच आता नांदेड जिल्ह्यात देखील असा प्रकार समोर आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील एका सीएससी केंद्र चालकाने आधार कार्डवर खाडाखोड करून लाडक्या बहिणींचे सुमारे ३ लाख रुपये हडप केले आहेत. हा प्रकार समोर आल्यानंतर प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत. आपले बिंग फुटताच केंद्र चालक फरार झाला आहे.

हदगाव तालुक्यातील मनाठा येथील सीएससी केंद्र चालकाने लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरताना महिलांच्या आधारकार्डसोबत छेडछाड केली. पोर्टलवर महिलांचे आधारकार्ड नंबर टाकण्याऐवजी त्यांच्या पतीचे आधारकार्ड नंबर टाकले. त्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आणि इतर योजनांचे पैसे आले आहेत, असे सांगून त्याने अनेकांचे आधारकार्ड आणि बँकेचे पासबुक जमा करून घेतले. याच कागदपत्रांच्या आधाराने त्याने महिलांच्या खात्यात आलेले लाडकी बहीण योजनेचे पैसे स्वतःच्या खात्यात जमा करून घेतले.

लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यावर आल्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आले आहेत, असे सांगून त्या केंद्र चालकाने पुरुषांचे अंगठे घेतले. त्यानंतर बँकेत जमा झालेली रक्कम काढून घेतली.

दरम्यान, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी सांगितले की, या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. या गैरव्यवहारात कोण कोण सहभागी आहेत, ते चौकशी झाल्यानंतर समोर येतील. संबंधित सीएससी केंद्र चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या केंद्र चालकाने जवळपास ७१ जणांच्या आधार क्रमांकाचा वापर करून त्यांच्या परस्पर ३ लाख १९ हजार ५०० रुपयांची उचल केल्याचे समोर आले आहे.

## आरपीआयची भाजपकडे १२ जागांची मागणी



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३०:**
आगामी विधानसभा निवडणुकीत आरपीआयला १२ जागा देण्यात याव्यात, अशी मागणी आरपीयआयचे नेते आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी भाजपकडे केली आहे. यासंदर्भात आठवले यांनी भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना एक पत्र लिहिले आहे.

या पत्रात त्यांनी मुंबईतील काही जागांवर देखील दावा केला आहे. रामदास आठवले यांनी काही दिवसांपूर्वी आम्हाला किमान १०-१२ जागांवर निवडणूक लढवण्याची संधी दिली पाहिजे, असे वक्तव्य केले होते. तसेच विदभार्तील तीन ते चार जागा मागणार असल्याचे त्यांनी सांगितले होते.

आरपीआयचे नेते रामदार आठवले यांनी पत्रकार परिषद घेत जागावाटपावर आपले म्हणणे मांडले आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेनेप्रमाणेच आरपीआयला देखील दोन महामंडळे द्यावीत. तसेच विधान परिषदेच्या १२ आमदारांमध्ये एक जागा आम्हाला मिळावी. यासोबतच विधानसभा निवडणुकीसाठी नांदेड, कोल्हापूर, वाशिम आणि मुंबईतील मालाड, धारावी यांसारख्या जागा आम्ही मागितल्या आहेत, असे आठवले यांनी सांगितले.

रामदास आठवले म्हणाले की, आमच्या पक्षाला विधानसभा निवडणुकीत १२ जागा द्याव्यात, अशी मागणी आम्ही केली आहे. माझी २०२४ ची लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा होती. पण मी लढलो नाही. जागा न घेता सर्वत्र महायुतीचा प्रचार केला. मात्र विरोधकांनी संविधान बदलतील असा अप्रचार करून निवडणुकीत यश मिळवले. यावेळी मात्र तसे होणार नाही, असे रामदास आठवले म्हणाले.

३ ऑक्टोबर रोजी आरपीआयचा ६७ वा वर्धापन दिन आहे. सातारा येथे पक्षाचा वर्धापन सोहळा साजरा होणार आहे. या सोहळ्यात उदयनराजे आणि शिवेंद्रराजे यांचीही उपस्थिती असणार आहे.

दरम्यान, विधानसभेच्या २८८ जागांवर भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट) आणि आरपीआय एकत्र लढणार आहेत. मात्र अद्यापपर्यंत महायुतीमध्ये जागा वाटपांचा निर्णय झाला नसून तिकीट वाटपावर चर्चा सुरू आहे. अशात रामदास आठवले यांची मुंबईती जागांसह १२ जागांची मागणी भाजप मान्य करणार की नाही, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# आरक्षण संपवण्याचा प्रमुख पक्षांचा डाव

## भाजप, काँग्रेस, एनसीपी, ठाकरेंवर प्रकाश आंबेडकरांचा आरोप



आरक्षण कायमचे संपवण्याच्या मुद्यावर भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना उद्धव ठाकरे गट या चारही प्रमुख पक्षांचे मतैक्य असल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी केला. प्रमुख पक्ष आरक्षणाविरोधात असले तरी वंचित बहुजन आघाडी आरक्षण वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी येथे एका पत्रकार परिषदेला संबोधित केले. त्यात बोलताना त्यांनी देशातील आरक्षण व्यवस्था संकटात असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, देशात आघाड्यांचे राजकारण चालतच राहील. पण आरक्षण कायमचे संपले पाहिजे या मुद्यावर भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेनेचा ठाकरे गट या चारही पक्षांत मतैक्य आहे. वंचित बहुजन आघाडी या षडयंत्राविरोधात लढा देईल. प्रसंगी रस्त्यावरही उतरेल.

विधानसभा निवडणुकीत सामाजिक दृष्टिकोनातून मतांचे ध्रुवीकरण होईल. त्यात आरक्षणाचा लाभ घेणारे एकीकडे व ज्यांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे आरक्षण संपवण्याची भूमिका आहे ते दुसऱ्या बाजूला राहतील.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांची मागणी शासनाने पूर्ण केली नाही. त्यामुळे आरक्षणाचा मुद्दा आता कळीचा बनला आहे. जरांगेंनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. या मागणीवर राजकीय पक्षांनी अद्याप स्पष्ट भूमिका घेतली आहे. पण ओबीसी समाजाने मराठ्यांना आपल्या कोट्यातून आरक्षण देण्यास ठाम विरोध दर्शवला आहे. ओबीसींच्या या भूमिकेला वंचित बहुजन आघाडीचा पूर्ण पाठिंबा आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी मराठा आरक्षणावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले, शरद पवार यांनी आपल्या रत्नागिरीच्या सभेत मनोज जरांगे यांच्या मागणीला पाठिंबा दिला. याविषयी त्यांनी त्यांच्या पक्षाची म्हणजे राष्ट्रवादीची भूमिका मांडली. पण ओबीसींचे आरक्षण हे ओबीसींचेच रहावे, त्यात इतर कुणाचाही समावेश होता कामा नये ही आमची भूमिका आहे. सरकारला मराठा समाजाला आरक्षण द्यायचे असेल तर त्यांनी ते वेगळे द्यावे. त्यांचा ओबीसीत समावेश करू नये. आगामी निवडणूक आरक्षणाच्या मुद्यावरच लढली जाईल.

# टाईप 2 मधुमेह लक्षण, कारणं आणि उपचार




हॅलो डॉक्टर

लोकारोग्य

सध्याची आपली प्रचंड धावपळीची, ताण तनावपूर्वक आणि चुकीच्या आहाराने भरलेली जीवनशैली पाहता, अगदी ऐन तारुण्यात किंवा अगदी बालवयात देखील अनेक प्रकारचे आजार अकाली उद्भवत आहेत.

टाईप २ हा मधुमेहाचा प्रकार गंभीर आहे. मुळात,टाईप २ मधुमेह म्हणजे नक्की काय? या प्रकारच्या मदुमेहाची लक्षण काय असतात? कारण काय आणि यावर उपचार पद्धती कोणत्या आहेत? हेच जाणून घेण्यासाठी मधुमेह विकार तज्ञ डॉ. शैलेश भोपळे यांच्याशी साधलेला संवाद.

**टाईप २ मधुमेह म्हणजे नक्की काय?**

■ टाईप २ मधुमेह हा एक जुनाट आजार आहे. हा आजार आपल्या चया पचयशी संबंधित आहे. आपल्या शरीराचा ऊर्जा स्त्रोत ग्लुकोज, स्वादू पिंडाडवारे तयार केलेल्या इन्सुलिनद्वारे नियोजित केला जातो. मधुमेहामध्ये इन्सुलिनच्या प्रतिकरामुळे पेशीद्वारे गलुकोजचे शोषण कमी होते. जेंव्हा पेशी इन्सुलिनला प्रतिसाद देत नाहीत, तेंव्हा स्वादुपिंड अधिक प्रमाणात इन्सुलिन तयार करतो आणि रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात येत नाही. याला टाईप २ प्रकारचा मधुमेह अस आपण म्हणतो.

**टाईप २ मधुमेहाची लक्षण कोणती?**

■ टाईप २ मधुमेही रुग्णांना सतत मूत्र विसर्जनाची समस्या उद्भवते, प्रचंड शारीरिक थकवा आणि अशक्तपणा जाणवतो. अशा रुग्णांना वारंवार तहान लागते, दृष्टीची समस्या उद्भवते, शरीरावर जखमा झाल्या की त्या लवकर भरून येत नाहीत. अशा रुग्णांच्या हातापायांना मुंग्या येतात, शिवाय त्यांच्या वजनात सतत कमी जास्त घट होत असते.

**टाईप २ मधुमेहाची कारणे काय?**

■ अनेकदा अशा प्रकारचा मधुमेह हा आनुवंशिक पद्धतीने आई, वडील, काका किंवा आपल्या नातेवाईकांना असेल तर तो पुढल्या पिढीला देखील होऊ शकतो. परंतु, वजन वाढणे, लठ्पणा, तेलकट, तुपकट, खाणे, झटपट मिळणार फस्टफुड अशा खाण्यामुळे वजन वाढते आणि पर्यायाने रक्तातील साखरेचे प्रमाण देखील वाढते.याशिवाय सर्वात महत्वाचे कारण म्हणजे शारीरिक श्रमाची कमतरता किंवा अभाव हे देखील आहे. प्रचंड ताण तणाव, सतत मानसिक ताण यामुळे शरीरातील रक्तातील साखरेची पातळी वाढते आणि मधुमेह आजार उद्भवतो.

**या आजारावर उपचार काय?**

■ टाईप २ मधुमेहाचे अचूक निदान केल्यानंतर डॉक्टर जी औषध सुचवतात ती नियमित घ्यावीत.दररोज ग्लुकोज मीटर द्वारे सकाळी नाष्टयानतर, दुपारी जेवणानंतर आणि संध्याकाळी देखील गलुकोजचे प्रमाण मोजावे. नियमित शारीरिक व्यायाम करायलाच हवा.तळलेले, मसालेदार पदार्थांचे सेवन एकदम बंद करावं.

मद्यपान, धूम्रपान टाळावं, आहारात पालेभाज्या, मोसमातील ताज्या फळांचा समावेश असावा, आहार हा साधा आणि सात्विक असावा ज्यामध्ये भात, बटाटा, अशा पिष्टमय पदार्थांचा कमीत कमी समावेश असावा. योग्य डॉकटर असतील त्यांचेकडून नियमित रक्तातील साखर तपासून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य त्या सूचनांचे पालन करावे. ■ ■

## चर्चा हृदयाच्या सुदृढ आरोग्यावर

भारतात हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीचे आजार वाढत असताना, देशभरात हृदयाच्या आरोग्याला चालना देण्यासाठी जागरूकता आणि सुधारित वैद्यकीय उपचारांच्या महत्त्वावर जोर देणे अधिक महत्त्वाचे आहे. या वर्षीच्या जागतिक हृदय दिनाची थीम, कृतीसाठी हृदयाचा वापर करणे, असून त्यासाठी अग्रगण्य आरोग्यसेवा व्यावसायिकांना एकत्र आणणे आणि लोकसंख्येमध्ये जागरूकता वाढवणे आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्याच्या उद्देशाने प्रभावी धोरणे आणि उपचार पर्यायांवर चर्चा करणे आहे.



हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, हृदय आणि रक्तवाहिन्यांवर परिणाम करणाऱ्या विकारांचा समूह, जगभरातील मृत्यूचे प्रमुख कारण आहे. यापैकी, व्हॉल्व्युलर हृदयविकार जागतिक विकृती आणि मृत्युदरात लक्षणीय योगदान देते, ज्यामुळे शारीरिक अपंगत्व येते आणि जीवनाची गुणवत्ता खालावते.

एओर्टिक स्टेनोसिस (एएस), सर्वात सामान्य वाल्वुलर हृदयरोग, जेव्हा खालच्या डाव्या हृदयाच्या चेंबर आणि महाधमनीमधील झडप अरुंद होते आणि पूर्णपणे उघडत नाही तेव्हा उद्भवते. यामुळे हृदयापासून शरीराच्या इतर भागांमध्ये रक्त प्रवाह मर्यादित होतो. एएसचे प्रमाण वयानुसार वाढते, 65 वर्षांखालील अंदाजे 1% ते 2% आणि 65 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांपैकी सुमारे 29% प्रभावित होतात. भारतात, 2021 ते 2031 दरम्यान वृद्ध लोकसंख्येत अंदाजे 138 ते 194 दशलक्ष वाढ झाल्याने एएसबद्दल चिंता वाढली आहे. उपचार न केल्यास, एएसचा मृत्यू दर दोन वर्षांत 50% असतो, जो इतर अनेक परिस्थितींपेक्षा जास्त असतो.

चर्चेदरम्यान इंटरव्हेंशनल अँड स्ट्रक्चरल हार्ट, एस.एल रहेजा हॉस्पिटल, मुंबईचे डायरेक्टर डॉ. हरेश मेहता म्हणाले, लोकांना महाधमनी स्टेनोसिसचे निदान होत नाही कारण रोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यात वारंवार लक्षणीय चिन्हे नसतात. केवळ थकवा सारखी कार्यात्मक लक्षणे ज्यांचे श्रेय वृद्धत्वाला दिले जाते.

तथापि, अधिक लक्षात येण्याजोगी लक्षणे दिसू लागल्यावर, जीवनाच्या गुणवत्तेत गंभीरपणे अडथळा येऊ शकतो. हे संकेत लवकर ओळखणे रुग्ण आणि आरोग्य यंत्रणा दोघांसाठीही महत्त्वाचे आहे. विशेषतः ट्रान्स-फेमोरल ॲक्सेसद्वारे TAVR / TAVI सारख्या प्रगत उपायांसह त्वरित संबोधित केल्यास, रुग्णांना उत्कृष्ट फलित मिळू शकते. ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## आरोग्य वर्धक मनुका



मनुकाचे अनेक प्रकार आणि रंग उपलब्ध आहेत. काळ्या मनुका, ज्याला भारतात मनुक्का म्हणूनही ओळखल्या जातात.

काळे मनुका खाण्याचे अनेक आरोग्यवर्धक फायदे आहेत,ते आपण पाहूयात.

कोरडी आणि पुरळ प्रवण त्वचा रक्तातील अशुद्धतेमुळे होऊ शकते. दररोज काळ्या मनुका खाल्ल्याने रक्तातील विषारी पदार्थ, कचरा आणि इतर प्रदूषक काढून टाकण्यास मदत होते. याव्यतिरिक्त, ते यकृत आणि मूत्रपिंडांना अधिक कार्यक्षमतेने कार्य करण्यास समर्थन देतात कारण, ते नैसर्गिक अँटिऑक्सिडंट्सचे समृद्ध स्त्रोत आहेत. काळ्या कोरड्या द्राक्षांचा एक फायदा म्हणजे शरीर शुद्ध करण्याची आणि हानिकारक मुक्त रॅडिकल्स काढून टाकण्याची क्षमता. पोटॅशियम समृद्ध काळ्या मनुकामध्ये सोडियमची पातळी कमी करणारे आणि रक्तदाब नियंत्रित करणारे गुणधर्म असतात.उच्च ट्रायग्लिसराइड्स, उच्च कोलेस्टेरॉल किंवा हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग असलेल्या व्यक्तींसाठी ते विशेषतः उपयुक्त ठरू शकतात. जर एखाद्याला उच्च रक्तदाब असेल तर तो अचानक कमी होण्याची शक्यता असते. मनुका भिजवल्याने रक्तदाब कमी होण्यास मदत होते. काळ्या मनुका, त्यांच्या उच्च फायबर सामग्रीमुळे, सौम्य रेचक म्हणून कार्य करतात आणि नियमित मलविसर्जनास प्रोत्साहन देऊन बद्धकोष्ठता कमी करू शकतात. ■

## ...तरच मंत्री होतील ना!



■ **महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. ३०:**
रोहित पवार हे मंत्री असतील, असे सूचक वक्तव्य शरद पवारांनी अहमदनगर येथील जामखेड तालुक्यातील खर्डा येथे विविध विकास कामांच्या भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रमात केले.

त्यांच्या या विधानामुळे राजकीय चर्चा सुरू झाली असतानाच राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी मत व्यक्त केले आहे.

भंडारा जिल्ह्यात अजित पवारांची जनसन्मान यात्रा सुरू आहे. यावेळी सभेत बोलताना प्रफुल्ल पटेल म्हणाले, आम्ही जरी राष्ट्रवादी काँग्रेसमधून वेगळे झालो असलो तरी शरद पवार साहेबांबद्दल माज्या मनात आजही आदर कायम आहे. मी त्यांना आपला गुरु मानतो, आणि त्यानुसारच काम करतो. त्यामुळे, त्यांच्याविषयी माझ्या मनात कोणतीही कटुता नाही. जेव्हा महाविकास आघाडीची सत्ता येईल तेव्हाच रोहित पवार मंत्री बनतील, असा खोचक टोला देखील त्यांनी लगावला आहे.

प्रफुल्ल पटेल म्हणाले, प्रत्येक नेते हे त्या क्षेत्रात जाऊन आपला नेता निवडून यावा यासाठी अशा प्रकारचे वक्तव्य करत असतात. परंतु, त्यांची सत्ता येईल, तेव्हाच ते मंत्री होतील. राज्यात महायुतीचेच सरकार येणार असल्याचा दावा त्यांनी केला.

## शस्त्राच्या धाकावर ९ लाखाची लूट

■ **महासागर प्रतिनिधी**
**नांदुरा, दि. ३०:**
१५० टन ॲल्युमिनियम व ५० टन कॉपरचा माल विकायचा असल्याचे नागपूर येथील एका व्यापाऱ्याला सांगून त्याला व त्याच्या मित्राला बोलावून घेत अनोळखी १० ते १२ इसमांनी चाकूचा धाक दाखवीत मारहाण करून त्यांच्या जवळील सोन्याची चैन, अंगठी, मोबाईल व फोन पे व डेबिट कार्ड द्वारे रोख रक्कम असा एकूण ९ लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने काढून घेतला. ही घटना २९ सप्टेंबर च्या रात्री १२ ते २ वाजताच्या दरम्यान निमगाव नारखेड रोडवर घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे

राजेंद्र कुमार प्रकाशचंद्र अग्रवाल (वय ५५), रा. शाकुंतल जीवन छाया नगर, नागपूर यांनी नांदुरा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, अनोळखी आरोपींनी दीडशे टन ॲल्युमिनियम व ५० टन कॉपरचा माल विकणे आहे असे त्यांना सांगितले. त्यावरून प्रकाशचंद्र व हर्ष खेमुका नागपूर येथून निमगाव नारखेड रस्त्यावर २९सप्टेंबर च्या रात्री १२ वाजता पोहचले. त्यावेळी अज्ञात १० ते १२ इसमांनी चाकूचा धाक दाखवून मारहाण करीत आमच्याजवळील २ लाख रूपये किमतीची तीन तोळ्याची सोन्याची चैन, सोन्याची अंगठी (पन्ना) किंमत २ लाख रुपये, हिऱ्याची अंगठी किंमत १ लाख रुपये, २ लाखाची आणखी एक सोन्याची चेन, २० हजाराचे फॉशील कंपनीचे हातघड्याळ, १ लाखाचा ॲपल कंपनीचा मोबाईल, इतर दोन मोबाईल, फोन पे, बँकेच्या डेबिट व आधार कार्ड द्वारे ४५ हजार रुपये आणि खिशातील रोख रक्कम १५ हजार रुपये असा एकूण ९ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल लुटला.

याप्रकरणी नांदुरा पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात १० ते १२ आरोपीं विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१० (२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून या लुटमार प्रकरणाचा पुढील अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक सोळंके हे करीत आहेत. दरम्यान या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे.

# विदर्भातील ५०७७ ग्राहकांना महावितरणचे अभय



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३०:**
थकित बिलामुळे वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडित झालेल्या ग्राहकांसाठी महावितरणने जाहीर केलेल्या अभय योजनेचा विदर्भात पहिल्या 27 दिवसांत 6,490 ग्राहकांनी या योजनेत सहभागी होण्याची इच्छा दर्शविली असून त्यापैकी 5,077 ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला.

थकबाकीतून मुक्त होण्याची सुवर्णसंधी असल्याने अधिकाधिक ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणच्या नागपुर प्रादेशिक विभागाचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी केले आहे.

संपूर्ण विदर्भाचा विचार करता अभय योजनेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांनी 5 कोटी 76 लाख रुपये भरले आहेत. विदर्भात नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक 1,216 ग्राहकांनी योजनेचा आतापर्यंत लाभ घेतला आहे. त्या खालोखाल बुलढाणा जिल्हा (818 ग्राहक), गडचिरोली (549 ग्राहक), वाशिम (355 ग्राहक), चंद्रपूर (358 ग्राहक), यवतमाळ (340 ग्राहक), अकोला (347 ग्राहक), अमरावती (340 ग्राहक), वर्धा (247 ग्राहक), भंडारा (200 ग्राहक) आणि गोंदिया (307 ग्राहक) यांचा क्रम लागतो. अर्ज करणा-या 6,490 ग्राहकांपैकी 3,333 ग्राहकांनी पुनर्जोडणीसाठी तर 1,212 ग्राहकानी नवीन वीज जोडणी घेण्याची इच्छा जाहीर केली आहे.

नागपूर शहर व नागपूर ग्रामीण या महावितरणच्या दोन मंडळांमधील अभय योजनेचा लाभ घेणाऱ्या 1,216 ग्राहकांपैकी 1,115 ग्राहकांनी एक रकमी भरणा करणे पसंत केले. केवळ 101 ग्राहकांनी तीस टक्के रक्कम भरून बाकी सहा हफ्त्यात भरण्याचा पर्याय निवडला.

या ग्राहकांकडून महावितरणला 2 कोटी 43 लाख रुपये प्राप्त झाले आहेत. विदभार्तील जमा झालेल्या एकूण रकमेपैकी सुमारे 47 टक्के रक्कम एकट्या नागपूर परिमंडलात जमा झाली आहे.

त्यांनी सांगितले की, महावितरणने 1 सप्टेंबर ते 30 नोव्हेंबर या कालावधीसाठी वीज ग्राहकांसाठी अभय योजना जाहीर केली आहे. त्यानुसार बिलाच्या थकबाकीमुळे वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडित झालेल्या ग्राहकांना देयकाची मूळ रक्कम भरल्यास व्याज व विलंब आकार माफ करण्यात येत आहे.

ग्राहकांनी थकीत बिलाचा भरणा एक रकमी केल्यास लघुदाब ग्राहकांना 10 टक्के तर उच्चदाब ग्राहकांना 5 टक्के सवलत मिळते. मूळ देयकाच्या 30 टक्के रक्कम भरून उरलेली रक्कम सहा हप्त्यात भरायचीही सोय आहे. योजनेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांना त्वरित वीज जोडणी मिळते.

थेट कारवाई करण्याच्या ऐवजी वीज ग्राहकांना एक संधी देण्यासाठी महावितरणने अभय योजना लागू केली आहे. या पार्श्वभूमीवर थकीत वीजबिलामुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित झालेली घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर जागा थकबाकीमुक्त करण्याची संधी महावितरणच्या अभय योजना 2024 मध्ये उपलब्ध झाली आहे.

नागपूर
# महासागर वृत्तसागर
मंगळवार, दि. १, ऑक्टोबर २०२४

## चोरांच्या आंतरराज्यीय टोळीचा भंडाफोड
### उत्तरप्रदेशातून दोघांच्या आवळल्या मुसक्या



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

दिघोरीच्या स्मृतीनगरातील श्रीसंतकृपा प्रोव्हीजन नावाची मोबाईल शॉपी फोडून 24 लाख रुपयांचे मोबाईल लांबविणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या दोन सदस्यांना हुडकेश्वर पोलिसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे ही टोळी केवळ मोबाईलच्या दुकानांनाच लक्ष्य करते.

कारवाईबाबत परिमंडळ क्र. 4च्या डीसीपी रश्मिता राव यांनी सांगितले की, प्रकरण नोंद होताच हुडकेश्वर पोलिसांनी तपास सुरू केला होता. दिवसरात्र पोलिसांनी कठोर परिश्रम घेतले. ठिक-ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तांत्रिक तपासात आरोपी उत्तरप्रदेश येथील रहिवासी असल्याचे समजले. तत्काळ एक पथक उत्तरप्रदेशला रवाना करण्यात आले आणि या टोळीच्या 2 सदस्यांना गाझियाबाद येथून अटक करण्यात आली. मोहम्मद मुस्तकीम उर्फ सलमान मोहम्मद मुसल्लीन (26) रा. गाझियाबाद आणि मोहम्मद शहजाद मोहम्मद फारूख (42) रा. शाहजहा कॉलनी, मेरठ अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. त्यांचा गाझियाबाद येथेच राहणारा इकबाल नावाचा एक साथीदार फरार आहे.

राव यांनी सांगितले की, ही टोळी मोबाईल शॉपींमध्येच चोरी करते. यापूर्वीही मुस्तकीम याने हुडकेश्वर ठाण्यांतर्गत मोबाईल शॉपी फोडली होती. या प्रकरणात तो फरार होता. पोलिसांनी आरोपींकडून विविध कंपन्यांचे 72 मोबाईल फोन जप्त केले असून त्यांची किंमत जवळपास 17.18 लाख रुपये आहे. मुस्तकीमविरुद्ध अकोला आणि कर्नाटकच्या बेलगावमध्येही गुन्हे नोंद आहेत. त्याला यापूर्वीही अटक झाली आहे.

पोलिसांनी आरोपींचा शोध लावण्यासाठी 100 हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली. यावरून ते हुडकेश्वर परिसरातच कुठेतरी राहतात हे स्पष्ट झाले. चोरी केल्यानंतर आरोपींनी मोबाईलची पॅकिंग काढली होती. मोबाईलचे रिकामे खोके दोन दिवसानंतर गणेशपेठ परिसरात रेल्वे लाईनजवळ आढळले होते. यावरून आरोपी रेल्वेने पळाल्याचे स्पष्ट झाले. ज्या घरी आरोपींनी खोली भाड्याने घेतली होती त्याची झडती घेतली असता बनावट आधारकार्ड आणि नाव सांगून खोली भाड्याने घेतल्याचे समोर आले. त्यानंतर तांत्रिक तपासाच्या माध्यमातून आरोपींचा सुगावा लावण्यात आला. तेथे हुडकेश्वर पोलिसांनी अनेक दिवसांपर्यंत तळ ठोकला आणि सापळा रचून आरोपींना अटक केली.

डीसीपी राव यांनी सांगितले की, मुस्तकीम हा सराईत गुन्हेगार आहे. चोरीचे प्रकरण जामीनपात्र असल्याने त्याला लवकरच जामीनही मिळते. त्यानंतर तो पुन्हा चोरी करतो. मात्र तो पूर्वी नोंद एका प्रकरणात फरार होता. या प्रकरणातही त्याची कोठडी घेतली जाईल. त्याला जामीन मिळू नये म्हणून आम्ही प्रयत्न करू. पोलिस एक आठवड्याच्या आत मुस्तकीमविरुद्ध तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही कारवाई पोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, नागेशकुमार चातरकर, सपोनि पंकजकुमार चक्रे, सफौ शैलेष ठवरे, नंदकिशोर तायडे, पोहवा गणेश बोंदरे, राजेश मोते, मुकेश कन्हाके, राजेश धोपटे, ओमप्रकाश मते, गौरव गजभिये, हिमांशू पाटील आणि कुणाल उके यांनी केली.

## नागपुरातील जागा वाटपावरून काँग्रेस नेत्यांची उद्धव ठाकरेंशी चर्चा
### रामटेक विधानसभेच्या जागेवर सांगितला दावा, शिवसेनाही आग्रही

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

सध्या सर्वच पक्षांची विधानसभेच्या निवडणुकीची तयारी सुरू आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीने जागा वाटपावार चर्चा सुरू केली आहे. दोघांसाठीही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची ठरणारी आहे. नेत्यांचे विभागवार दौरे सुरू आहे.

नागपुरात भाजपच नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतीच बैठक झाली. ठाकरे-पवार यांना रोखा, असा संदेश त्यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिला. त्यापूर्वी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी नागपुरात पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली होती. रविवारी शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा नागपूर दौरा होता. या दौऱ्यादरम्यान काही काँग्रेस नेत्यांनी



त्यांची भेट घेतली. या भेटीतील चर्चेबाबत राजकीय वतुर्ळात जोरदार चर्चा आहे.

नागपूर जिल्ह्यात विधानसभेच्या एकूण १२ जागा आहेत. त्यात शहरात सहा आणि ग्रामीणमध्ये सहा जागांचा समावेश आहे. शिवसेनेने शहरात दोन व ग्रामीणमध्ये दोन अशा चार जागांची मागणी केली आहे. रामटेक लोकसभा व विधानसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जातो. लोकसभा निवडणुकीत रामटेकची जागा शिवसेनेने काँग्रेससाठी सोडली होती. रामटेक विधानसभेच्या जागेवरही काँग्रेसने दावा केला आहे. मात्र शिवसेना रामटेकसाठी आग्रही आहे.

शहरात शिवसेनेची ताकद नाही, त्यामुळे शहरातील जागाबाबत शिवसेना जोर लावणार नाही, मात्र रामटेक आणि अन्य काही जागांबाबत मात्र जागा वाटपाच्या वेळी पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर रविवारी काँग्रेस नेते व माजी मंत्री सुनील केदार, नागपूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष व माजी आमदार राजेंद्र मुळक, रामटेकचे काँग्रेसचे खासदार श्याम बर्वे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी आमदार भास्कर जाधव, शिवसेनेचे मिलिंद नार्वेकरही उपस्थित होते.

कळमेश्वरमधील छत्रपतींच्या पुतळ्याचे उद्घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते व्हावे, यासाठी काँग्रेस नेते सुनील केदार यांनी पुढाकार घेतला होता.

ठाकरे आणि केदार यांचे स्नेहाचे संबंध आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेता जिल्ह्यातील जागा वाटपाबाबत ठाकरे यांच्यासोबत काँग्रेस नेत्यांची चर्चा झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. लोकसभा निवडणुकीत रामटेक लोकसभा मतदारसंघातील सर्व सहाही विधानसभा मतदारसंघात काँग्रेस आघाडीवर असल्याने काँग्रेसचा उत्साह वाढला आहे. मात्र रामटेकच्या विजयात शिवसेनेचेही योगदान आहे, असा दावा ठाकरे गटाने केला आहे.

## बसपाची संविधान जागरण रॅली मुंबईकडे रवाना



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने आज नागपूरच्या दीक्षाभूमीहून "दीक्षाभूमी ते चैत्यभूमी" अशी संविधान जागरण रॅली महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांच्या नेतृत्वात काढण्यात आली. आज सकाळी 11 वाजता बसपाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी दीक्षाभूमी येथील तथागत बुद्धांना व बाबासाहेबांना वंदन करून या रॅलीची सुरुवात केली. ही रॅली महाराष्ट्रातील 22 जिल्ह्यात फिरत-फिरत 9 ऑक्टोंबर रोजी मान्यवर कांशीरामजींच्या परिनिर्वाण दिनी मुंबईच्या चैत्यभूमीवर पोहोचून तिथे बाबासाहेबांना अभिवादन केल्यावर बसपाचे केंद्रीय नेते व महाराष्ट्राचे प्रभारी डॉक्टर अशोक सिद्धार्थ यांच्या मार्गदर्शनात धारावी येथे रॅलीचा समारोप होईल.

आजच्या रॅलीत प्रदेश उपाध्यक्ष डॉ संतोष शिन्दे, प्रदेश महासचिव डा मोहन राईकवार, मंगेश ठाकरे, पृथ्वी शेंडे, नागोराव जयकर, मुकुंद सोनवने, हुलगेश चलवादी, प्रदेश मिडिया प्रभारी उत्तम शेवडे, प्रदेश कोषाध्यक्ष रहूफभाई, प्रदेश सचिव विजय काळे, कालुराम चौधरी, सुदीप गायकवाड, अनिरुद्ध रणवीर, प्रा सुनील कोचे, नागपुर जिलाध्यक्ष योगेश लांजेवार, जिल्हा प्रभारी रंजनाताई ढोरे, राजकुमार बोरकर, भाऊसाहेब गेडाम, उपाध्यक्ष इब्राहिम टेलर, महासचिव चंद्रशेखर कांबळे, अभिलेश वाहने, राजू चंदेकर, भन्ते संघरत्न, महिला नेत्या सुनंदाताई नितनवरे आदि प्रामुख्याने उपस्थित होते. रॅली दीक्षाभूमीवरून लोकमत चौक मार्गे संविधान चौकात पोहोचल्यावर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर इंदोरा चौकात बॅरिस्टर खोब्रागडे यांना माल्यार्पण केल्यानंतर उत्तर नागपूरचे जेष्ठ कार्यकर्ते बुद्धम राऊत यांच्या माध्यमातून क्रेन द्वारे फुलांचा वर्षाव करून नेत्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर बॅरिस्टर खोब्रागडे सभागृहात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केल्यानंतर रॅली कळमना मार्गे, पारडी चौकात आल्यावर भंडाऱ्याकडे रवाना झाली. रॅलीत पन्नासावर फोर व्हीलर व शेकडो टू व्हीलर गाड्या सहभागी झाल्या होत्या.

## २ ते ४ ऑक्टोबर दरम्यान विभागस्तरीय महोत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

2 ते 4 ऑक्टोबर 2024 या कालावधीत दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर येथे - विभागस्तरीय महोत्सव - ( लुप्त लोक आणि आदिवासी कला उत्थान महोत्सव) आयोजित करण्यात येणार आहे. व्ही चित्रकला प्रदर्शनही भरवण्यात येणार आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार , 2 ऑक्टोबर ते 4 ऑक्टोबर 2024 या कालावधीत सायंकाळी 6.30 वाजता "विभाग स्तरीय महोत्सव" ( विलुप्त लोक आणि आदिवासी कला उत्थान महोत्सव ) आयोजित केला जाईल . दक्षिण मध्य विभागीय सांस्कृतिक केंद्र, नागपूर कॅम्पसमध्ये पावसाची शक्यता लक्षात घेऊन कॅम्पसच्या बहुउद्देशीय सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे .

या महोत्सवात नागपूर विभागातील पारंपरिक, लोककला आणि आदिवासी कलांचे सादरीकरण होणार आहे . ज्यामध्ये विभागातील काही लुप्तप्राय लोक आणि आदिवासी कलांचाही समावेश आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या सूचनेनुसार देशातील विविध विभागांमध्येही असे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. महोत्सवाचे उद्घाटन 2 ऑक्टोबर 2024 रोजी सायंकाळी 6.30 वाजता होणार आहे. महोत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, विशेष अतिथी म्हणून नागपूर शहराचे जिल्हा दंडाधिकारी डॉ. विपीन इटनकर, आयएएस, महानगर पालिका आयुक्त अभिजीत चौधरी, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल आदिंची उपस्थिती राहणार आहे.

## कारागृह पोलीस भरतीत कॉपी करणारा मुन्नाभाई जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

राज्यभरात पोलीस भरती सुरु असून सध्या लेखी परीक्षा घेण्यात येत आहे. पोलीस भरतीत अनुचित प्रकार घडू नये म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकारी डोळ्यात तेल घालून काम करीत आहेत. मात्र, पोलीस भरतीसाठी मैदानी चाचणीत पात्र ठरल्यानंतर केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी राज्यभरातील परीक्षा केंद्रावर काही मुन्नाभाई सक्रिय झाले आहेत. स्पाय माईकच्या मदतीने कॉपी करुन पेपर सोडवत असल्याची कुणकुण पोलीस अधिकाऱ्यांना होती. असाच एक प्रकार नागपुरात उघडकीस आला असून परीक्षेत हायटेक कॉपी करणाऱ्या उमेदवाराला पोलिसांनी अटक केली. परीक्षा केंद्राबाहेरुन प्रश्नांची अचूक उत्तरे सांगणारा त्याचा साथीदार मात्र पळून जाण्यात यशस्वी झाला आहे. किसन सीताराम जोनवाल (२७) असे आरोपी उमेदवाराचे नाव आहे तर जीवन काकरवाल (२९, दोघे रा. तरट्याची वाडी पो. बाभुळगाव ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर) असे त्याच्या आरोपी साथीदाराचे नाव आहे.

मानकापूर येथील क्रीडा संकुलात कारागृह शिपाई पद भरती २०२२-२३ साठी लेखी चाचणी परीक्षा घेतली जात आहे. २९ सप्टेंबरला दुपारी चाचणी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेत दुपारी ३.२० वाजताच्या सुमारास चेस्ट क्रमांक २५०३७ असलेला आरोपी उमेदवार किसन जोनवाल याने परीक्षा उतीर्ण होण्याकरिता बाहेरील त्याचा साथीदार आरोपी जीवन काकरवाल याच्यासोबत कट रचला. ते परीक्षेतील प्रश्न माईक स्पाय अशा ईलेक्ट्रानिक डिव्हाईसच्या वापराने सोडवत असल्याचे दिसून आले. या प्रकरणी पोलीस हवालदार प्रकाश काटकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून मानकापूर ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक जावेद तडवी यांनी आरोपींविरूद्ध कलम ३१८ (२), (४), ६१(२), (ए), २२३ सहकलम ६६ (ड) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. यातील आरोपी किसन जोनवाल याला अटक केली आहे. तर त्याचा साथीदार जीवन काकरवाल याचा पोलीस शोध घेत आहे. पोलीस भरतीच्या मैदानी परीक्षेतही आरोपी उमेदवार किसन जोनवाल याने अशाच प्रकारे पात्रता मिळवल्याची दाट शक्यता आहे. तसेच लेखी परीक्षा देताना परीक्षा केंद्रावर तैनात असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी किसनची अंगझडती घेताना योग्य ती काळजी घेतली नाही. तसेच किसन हा स्पाय माईकवर बोलत होता आणि बाहेर बसलेल्या साथीदाराकडून प्रश्नाची उत्तरे लिहत होता. त्यामुळे असाच प्रकार राज्यभरातील लेखी परीक्षेत झाल्याची दाट शक्यता आहे.

## रितिका मालूला मध्यरात्री अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :



रामझुला अपघात प्रकरणातील मुख्य आरोपी रितिका मालू हिला राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) मागील आठवड्यात बुधवारी मध्यरात्री अटक केली होती. मध्यरात्री झालेल्या या अटकेची दखल नागपूर सत्र व जिल्हा न्यायालयाचे प्रमुख न्या.दिनेश सुराणा यांनी घेत स्वतःहून याचिका दाखल करण्याचे आदेश दिले. याप्रकरणाची सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर करण्याचे आदेश देत ३ ऑक्टोबर रोजी न्यायालयाने यावर सुनावणी ठेवली आहे.

बुधवारी सत्र न्यायालयाने रामझूला अपघातातील मुख्य आरोपी रितिका मालूचा जामीन फेटाळला आणि अपघातानंतर २१४ दिवसांनी सीआयडीला कारवाई करण्याची परवानगी दिली. यानंतर प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (जेएमएफसी) यांनी रात्री १०.३० वाजता कोर्टरूम उघडले. त्यानंतर काही तासांनी सीआयडीने रितिका मालूला अटक करण्याचा निर्णय

### सत्र न्यायालयाकडून दखल, स्वतःहुन याचिका

घेतला. न्यायालयाने सूर्यास्तानंतर रितिका मालू हिला अटक करण्यास परवानगी दिली. या आदेश कायद्याच्या दृष्टीने योग्य होता काय? याबाबत न्यायालयाने विचारणा केली.

दोन महिला अधिकाऱ्यांसह दहा सीआयडी कर्मचाऱ्यांच्या पथकाने मध्यरात्रीनंतर मालू कुटुंबातील एका निवासस्थानात प्रवेश करून शोधमोहीम सुरू केली. दोन पुरुष सहकाऱ्यांसोबत महिला अधिकारी घरातून सुमारे 40 मिनिटांनंतर रितिका मालूशिवाय घरातून बाहेर पडली आणि त्याच गल्लीतील मालू कुटुंबाच्या दुसऱ्या बंगल्याकडे गेली. पहाटे एकच्या सुमारास, महिला अधिकारी एका बंगल्यातून रितिका मालूला घेऊन बाहेर पडल्या. यावेळी शेजाऱ्यांनी मोठी गर्दी केली होती.

रितिका मालू हिला सीआयडीने अटक केल्यावर तिची पोलीस कोठडी मिळविण्यासाठी अर्ज करण्यात आला. मात्र न्यायालयाने हा अर्ज फेटाळत तिला न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचे आदेश दिले. सध्या रितिका मालू मध्यवर्ती कारागृहात आहे.

न्यायालयीन कोठडीत असल्याने ती साधारण जामीन मिळविण्यासाठी पात्र आहे. मात्र रितिका मालूच्यावतीने अद्याप जामीनासाठी अर्ज करण्यात आलेला नाही. जामीनाचा मार्ग उपलब्ध असताना अर्ज का केला जात नाही आहे, यावर आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## अखेर दीक्षाभूमीवर खोदलेले खड्डे बुजवले
## धम्मचक्र प्रवर्तन सोहळ्यासाठी दीक्षाभूमी सज्ज

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

एकात्मिक विकास प्रकल्पाअंतर्गत भूमिगत वाहनतळासाठी दीक्षाभूमीवर खोदण्यात आलेले खड्डे आंबेडकरी अनुयायांनी विरोध केल्यानंतर बुजवण्यात आले आहेत. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने दीक्षाभूमीवर येणाऱ्यांची गैरसोय टळणार आहे.

दीक्षाभूमी परिसरात भूमिगत वाहनताळ झाल्यास दीक्षामूमीच्या स्तुपाला धोका पोहचू शकतो. त्यामुळे हे वाहनतळ बांधण्याचे रद्द करण्याची मागणी आंबेडकरी समाजाने केली होती. त्यासाठी आंदोलन दीक्षाभूमीवर झाले. जाळपोळ देखील झाली होती. अखेर राज्य सरकारने तातडीने निर्णय घेत वाहनतळ बुजवण्याचे आदेश नागपूर सुधार प्रन्यासला दिले होते. नासुप्रने धम्मचक्र प्रवर्तन दिनापूर्वी संपूर्ण परिसर समतल



केला आहे. तसेच धम्मदीक्षा सोहळ्यासाठी स्टेजचे कामही पूर्णत्वास येत आहे. परिसरात गवत कापून जागा समतल करण्यात येत असून, लाकडी कठडे बांधण्याचे काम सुरू झाले आहे.

धम्मदीक्षा वर्धापन दिन सोहळ्यासाठी देश- विदेशातील अनुयायी दीक्षाभूमीवर येतात. धम्मचक्र प्रवर्तन दिन केवळ १२ दिवस शिल्लक आहेत. त्या अनुषंगाने युद्धपातळीवर कामाला गती देण्यात आली. वेळेच्या आत जागा समतल केला आहे. दीक्षाभूमी परिसरात भूमिगत वाहनतळासाठी सहा मीटर खड्डा करण्यात आला होता. २० जुलै रोजी मुसळधार पावसाने आणि त्यानंतर सतत पाऊस पडल्याने खड्ड्यात पाणी साचले होते.

पाण्याचा उपसा करून जागा समतल करण्यात यावी, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने केली होती. त्यानंतर सात दिवसांत पाण्याचा उपसा करून वेळेच्या आता खड्डा बुजवून परिसरातील जागा समतल केली. अलीकडेच सामाजिक न्याय विभागाने दीक्षाभूमी परिसराची पाहणी करून ३० सप्टेंबरपर्यंत काम करण्याचे निर्देश दिले होते.

दरम्यान, दीक्षाभूमीचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर शेजारील कापूस संशोधन संस्थेची ३.८४ एकर आणि आरोग्य विभागाची १६.४४ एकर जागा दीक्षाभूमीला द्या, अशी विनंती मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे करण्यात आली आहे. भूमिगत वाहनतळासह इतर सोयीसुविधा करण्यासाठी दीक्षाभूमीला शेजारची जागा दिली जावी यासाठी ॲड. शैलेश नारनवरे यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

दीक्षाभूमीला लागूनच आरोग्य विभागाची आणि कापूस संशोधन संस्थेची जमीन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने ३ नोव्हेंबर २०१५ रोजी राज्य शासनाला निवेदन सादर करून या दोन्ही जमिनी दीक्षाभूमीकरिता संपादित करण्याची मागणी केली होती. परंतु, त्यावर अद्याप काहीच निर्णय घेण्यात आला नाही. या जमिनी दीक्षाभूमीला मिळाल्यास भूमिगत वाहनतळाचा वाद निकाली निघेल व आंबेडकरी अनुयायांच्या भावना शांत होतील. याकरिता उच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करून राज्य शासनाला आवश्यक आदेश द्यावे, अशी विनंती ॲड. नारनवरे यांनी याचिकेच्या माध्यमातून केली आहे.

महासागर
विदर्भातील बहुप्रसारित मराठी दैनिक
महासागरकरिता नागपूर जिल्ह्यातील खालील ठिकाणी वार्ताहर / प्रतिनिधी नियुक्त करावयाचे आहेत.
बुटीबोरी ■ कोंढाळी ■ पारशिवनी ■ मोवाड ■ जलालखेडा ■ तारसा ■ मंसर
: शहर प्रतिनिधी :
नागपूर शहराकरिता २ शहर प्रतिनिधींची नियुक्ती करावयाची आहे .
मराठी भाषेचे उत्तम ज्ञान, बातमी तयार करण्याचे कौशल्य असावे. दांडगा जनसंपर्क आणि राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्राची माहिती असावी.
अर्ज ईमेल करा : nagpurpost@gmail.com
किंवा फोन करा : 9673177611

# संघ कार्यालयावर आपचा जवाब दो मोर्चा

## केजरीवालांचे भागवतांना पाच प्रश्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३०:
आम आदमी पार्टी नागपुर शहर शाखेच्यावतिने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर आज जवाब दो मोर्चा काढण्यात आला.

आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी संघप्रमुख मोहन भागवत यांना काही प्रश्न विचारले असून, आपच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या आदेशावरून पक्षाचे महाराष्ट्र संगठन सचिव भूषण ढाकुलकर, नागपूर शहराध्यक्ष अजिंक्य कळंबे यांच्या नेतृत्वात सोमवारी हा मोर्चा काढण्यात आला.

ईडी आणि सीबीआय सारख्या यंत्रणांचा वापर करीत मोदी देशातील विरोधकांचे सरकार पाडत आहेत, हे देशाच्या हिताचे आहे काय? मोदी यांनी भ्रष्ट नेत्यांना भाजपात सहभागी करून घेतले आहे, अशा राजकारणाशी आपण सहमत आहात का?




भाजपा पथभ्रष्ट होवू नये ही संघाची जबाबदारी असून, संघ भाजपाच्या अशा कृत्यांना समर्थन देते का? यासह अन्य काही प्रश्न संघाला विचारण्यात आले आहेत. या मोर्चात आम आदमी पक्षाचे नागपूर येथील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन पोलीस बंदोबस्तही राखण्यात आला होता.

# ४ ते ९ ऑक्टोबर दरम्यान राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या संवाद बैठका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
केंद्र व राज्य शासनाने गेल्या वर्षभरापासून घेतलेल्या निर्णयांची माहिती देणे. २४ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या निर्णयाबद्दल महाराष्ट्र सरकारचे आभार व्यक्त करण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने विदभार्तील ११ जिल्ह्यांमध्ये ४ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर या कालावधीत संवाद सभेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे म्हणाले की, सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती अजूनही समाजापर्यंत पोहोचलेली नाही. ही माहिती संवाद सभेच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचवली जाईल. २४ सप्टेंबर २०२४ रोजी च्या परिपत्रका मुले लाखो सरकारी कर्मचा?यांना फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले आणि त्याबद्दल त्यांचे आभारही मानले जातील.

संवाद सभा गडचिरोली जिल्ह्यातून ४ ऑक्टोबरपासून सुरू होणार असून या यात्रेचे नेतृत्व राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर करणार असून, गोदिया, भंडारा, वर्धा, खामगाव, वाशीम, यवतमाळ, वणी, चिमूर मार्गे ९ ऑक्टोबरला नागपुरात समारोप होणार आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून आता पर्यंत संघटनेने केलेल्या कामाचा आढावा मांडला ,ज्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात ओबीसी मुद्द्याचे समर्थन केले जाईल, त्या पक्षांचे ओबीसी महासंघ स्वागत करेल.

डॉ. तायवाडे म्हणाले की, महासंघ संविधानाच्या मर्यादेत राहून आपल्या न्याय्य मागण्यांसाठी सरकारशी लढा देत आहे. यापुढील काळातही संघर्ष सुरूच राहणार आहे. जात जनगणना हा आपला मुख्य मुद्दा आहे. आता देशातील विरोधी पक्षनेत्यांनी संसदेत हा मुद्दा उपस्थित केला आहेत. हे ओबीसींसाठी हे चांगले लक्षण आहे. ओबीसी कोट्यातील मराठ्यांना आरक्षण देण्याबाबत ते म्हणाले की, सरकारने त्यांना लेखी आश्वासन दिले आहे.त्यामुळे मराठ्यांना ओबीसी कोट्यातून कधीच आरक्षण मिळू शकत नाही. ते म्हणाले की, महासंघात सर्व राजकीय पक्षांचे सदस्य समाविष्ट आहेत.

सर्वांना या संवाद यात्रेत आमंत्रित केले आहे. ज्या राजकीय पक्षाच्या विधानसभा निवडणुकीतील प्रमुख जाहीरनाम्यात ओबीसींच्या हिताचे मुद्दे असतील त्या पक्षासोबत ओबीसी समाज राहील. सभेला शाम लेडे, प्रकाश साबळे, शरद वानखेडे, सुभाष घाटे, गुनेश्वर आरिकर, ओबीसी योद्धा रवींद्र टोंगे ,सुषमा भड, ज्योती ढोकणे, रत्नमाला पिसे, रेखाताई बाराहाते, उपस्थित होते, या सभेला गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, लातुर, हिंगोली, जालना, गोंदिया, भंडारा, या ठीकानाहुन प्रमुख, महिला, युवक, कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे आभार निलेश कोढे यांनी केले, बैठकीच्या यशस्वतेसाठी, प्रा, शिंदे,विजय डवांगे, राजू चौधरी, रामदास कामडी,विजय पिनाटे, प्रा. उमेश शिंजनगुडे, राहुल लक्षे, भाऊ आसुटकर, कवडू लोहकरे, विनोद हजारे आदिंनी प्रयत्न केले.

# स्वच्छता दुतांसाठी मन की सफाई कार्यक्रम आज

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :
नागपूर शहराला स्वच्छ, सुंदर, स्वस्थ आणि हरित साकारण्यासाठी अहोरात्र कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांसाठी "मन की सफाई: स्वच्छता संग मन का उत्सव 2024" या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार 1 ऑक्टोबर रोजी दुपारी 3.30 वाजता, मानकापूर स्थित विभागीय क्रीडा संकुल येथे करण्यात आले आहे.

कार्यक्रमात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, नागपूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा चांडक, मनपाचे अतिरिक्त आयुक्त श्री. अजय चारठाणकर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, सर्व सहायक आयुक्त, दहाही झोनचे झोनल अधिकारी, स्वच्छता ब्रँड अँबेसिडर व सफाई कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित राहतील.

स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता' या संकल्पनेस अनुसरून केंद्र सरकारच्या स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल व श्री. अजय चारठाणकर यांच्या नेतृत्वात विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.

यातील मन की सफाई: स्वच्छता संग मन का उत्सव 2024 हा उपक्रम असून, कार्यक्रमात सफाई कर्मचाऱ्यांसाठी संगीतमय संध्या, नृत्य व नाट्य सादरीकरणासह सफाई कर्मचाऱ्यांना तणावमुक्त कसे राहावे याचे मार्गदर्शन देखील केले जाणार आहे.

विशेष म्हणजे हा संपूर्ण कार्यक्रम झीरो वेस्ट संकल्पनेवर आयोजित केला जाणार आहे. तरी मोठ्या संख्येत सफाई कर्मचार्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

# मनपा शाळांच्या बोलक्या भिंतीकरिता सरसावल्या संघटना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
मिशन नवचेतना प्रकल्पांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या शाळांचा कायापालट केला जात आहे. या अंतर्गत सीएसआर व्दारे बोलक्या भिंती तयार करण्याकरिता नागपूर महानगरपालिका, डब्ल्यूसीएल आणि झिरो ग्रॅव्हिटी डॉ. श्रीकांत जिचकार फाउंडेशन यांच्यात सोमवारी (ता.३०) त्रिपक्षीय करार करण्यात आला.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या कक्षात हा करारनामा करण्यात आला. मनपाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती साधना सयाम, डब्ल्यूसीएलचे सीएसआर महाव्यवस्थापक श्री. ए.के. सिंग, झिरो ग्रॅव्हिटी डॉ. श्रीकांत जिचकार फाउंडेशनच्या संस्थापिका मैत्रेयी श्रीकांत जिचकार यांनी करारनाम्यावर स्वाक्षरी केली.




याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, डब्ल्यूसीएलचे उपव्यवस्थापक श्री. शेखर आर., व्यवस्थापक एस.धीरज उपस्थित होते.

मिशन नवचेतना प्रकल्पाच्या माध्यमातून मनपा शाळांचा दर्जा सुधारण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण घेता यावे याकरिता शाळेच्या भिंती बोलक्या करण्याची संकल्पना मांडण्यात आली. या कार्यात सीएसआर निधी प्रदान करून मनपाला सहकार्य करण्यासाठी डब्ल्यूसीएल आणि झिरो ग्रॅव्हिटी डॉ. श्रीकांत जिचकार फाउंडेशन या संघटना सरसावल्या आहेत. या संघटनांच्या सहकार्याने नागपूर महानगरपालिकेच्या पाच शाळांमधील अनेक वर्गखोल्यांच्या भिंतींना विविध विषयांच्या अनुरूप चित्ररूप देउन बोलक्या करण्यात येईल. मनपाच्या एकात्मता नगर मराठी उच्च प्राथमिक शाळा जयताळा येथील ६ वर्गखोल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मनपा हायस्कूल उंटखाना येथील १० वर्गखोल्या, प्रियदर्शनी उच्च प्राथमिक मनपा शाळा फुटाळा ८ वर्गखोल्या आणि एक सभागृह, आझाद नगर उर्दू मनपा प्राथमिक शाळा आझाद नगर ९ वर्गखोल्या आणि क्रीडा साहित्य, राम मनोहर लोहिया हायस्कूल टेलिफोन एक्सचेंज चौक येथील ८ वर्गखोल्या आणि क्रीडा साहित्य असे ५ शाळांमधील ४२ वर्गखोल्या, सभागृह आणि क्रीडा साहित्यांबाबत मनपाला डब्ल्यूसीएल आणि झिरो ग्रॅव्हिटी डॉ. श्रीकांत जिचकार फाउंडेशनद्वारे सहकार्य केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यामध्ये मनपाच्या पाच शाळांमधील भिंतींना बोलके स्वरूप देण्यात येणार आहे. यानंतर अन्य शाळांचे काम हाती घेण्यात येणार आहे. मनपाच्या पाचही शाळांमधील बोलक्या भिंती साकारण्याच्या कामाला लवकरच सुरूवात होणार आहे. डिसेंबर अखेरपर्यंत सर्व शाळांचे काम पूर्ण करण्याबाबत अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी सूचना केली.

# श्री राम संदर्भात आक्षेपार्ह स्टेट्स ठेवणे पोलीस हवालदार खुशाल रामटेके यांना भोवले

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. ३० :
नागपुर ग्रामीण पोलीस विभागात कार्यरत असलेले पोलीस हवालदार खुशाल रामटेके यांना "श्री राम" संदर्भात आक्षेपार्ह व्हाट्सएप स्टेट्स ठेवने चांगलेच महागात पडले . या प्रकरणी नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार यांचा आदेशाने कन्हान पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विक्रांतसिंह सोलंकी यांनी दिलेल्या तक्रारी नुसार पोलीस हवालदार खुशाल रामटेके हे या पुर्वी कन्हान पोलीस स्टेशन येथे कार्यरत होते. विक्रांतसिंह सोलंकी यांची खुशाल रामटेके यांचाशी ओळख असल्याने त्यांचा मोबाईल नंबर- ८४८५८-६१४४२ हा रामटेके पोलीस या नावाने विक्रांतसिंह सोलंकी यांनी मोबाईल मध्ये सेव करून ठेवला होता. रविवारला विक्रांतसिंह सोलंकी यांना खुशाल रामटेके यांचा व्हाट्सएप स्टेट्स वर प्रभु श्रीराम संदर्भात आणि इतर धार्मिक भावना दुखविणारे स्टेट्स दिसुन आले. विक्रांतसिंह सोलंकी यांनी शैकडो युवका सह कन्हान पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्याने नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार यांचा आदेशाने पोलीस हवालदार खुशाल रामटेके यांचा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# राज्यातील हजारो अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाचा दिलासा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :
अधिसंख्य कर्मचाऱ्यांचा 1 दिवसाचा खंड क्षमापित केल्याबद्दल आ. प्रवीण दटके यांनी मानले शासनाचे आभार. वर्ष 2019 च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आल्याने अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सेवा विषयक आणि सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळण्यास मिळण्यास अडचणी येत होत्या. नागपुरातील सुमारे 5 हजार आणि राज्यातील 30 हजार अधिसंख्य कर्मचारी यामुळे त्रस्त होते, त्यामुळे आ. प्रवीण दटके यांनी शासनाकडे हा प्रश्न सातत्याने लावून धरला. वर्ष 2022 मध्ये अधिसंख्य कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक लाभ देण्याबाबत निघालेल्या शासन निर्णयामध्ये 1 दिवसाचा तांत्रिक खंड देण्याचा समावेश करण्यात आला होता,

परंतु काल झालेल्या कॅबिनेट बैठकीमध्ये शासनाने राज्यातील हजारो अधिसंख्य कर्मचाऱ्यांचा विचार करत त्यांच्या सेवेतील 1 दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करणे बाबत निर्णय घेतला याबाबत आमदार प्रवीण दटके यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे मुंबई येथे प्रत्यक्ष भेटून आभार मानले. वर्ष 2022 पासून अफ्रोह संघटनेच्या माध्यमातून अधिसंख्य कर्मचाऱ्यांनी उपोषण, धरणे आंदोलन तसेच विविध मागार्तून हा विषय पूर्ण होण्याकरिता पाठपुरावा केला. याबाबत आमदार प्रवीण दटके यांच्या मागणीनुसार वर्ष 2023 च्या हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे बैठक घेऊन या विषयाला गती देण्यात आली.

# नवरात्रीच्या निमित्ताने डोंगरगड यात्रेत प्रवाशांच्या अतिरिक्त सुविधांसाठी आवश्यक व्यवस्था

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :
दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माँ बमलेश्वरी मंदिर डोंगरगड येथे नवरात्रोत्सवा दरम्यान गाड्यांमध्ये होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. त्याअंतर्गत, डोंगरगड आणि रायपूरसाठी खालील गाड्यांच्या तात्पुरत्या विस्तारासह, काही लांब पल्ल्याच्या एक्स्प्रेस गाड्यांना 03-10-2024 ते 12-10-2024 या कालावधीत डोंगरगड येथे तात्पुरता थांबा दिला जात आहे.

गाडी क्र. ०८७४२/०८७४१ गोंदिया-दुर्ग-गोंदिया मेमू पॅसेंजर स्पेशल रायपूरपर्यंत वाढवण्यात येत आहे. गाडी क्र. 08742 दुर्ग येथून 20.30/21.05 वाजता पोहोचेल/सुटेल आणि 22.30 वाजता रायपूरला पोहोचेल आणि ट्रेन क्र. 08741 रायपूरहून 05.15 वाजता सुटेल आणि 06.15 वाजता दुर्गला पोहोचेल आणि नियोजित वेळेनुसार सुटेल.

03-10-2024 ते 12-10-2024 पर्यंत डोंगरगड स्टेशनवर गाडी क्र. १२७७२ रायपूर-सिकंदराबाद एक्सप्रेस तात्पुरती १८.३४ वाजता येईल आणि १८.३६ वाजता निघेल. तसेच तात्पुरते विरुद्ध दिशेने गाडी क्र. १२७२१ सिकंदराबाद-रायपूर एक्स्प्रेस डोंगरगड स्थानकावर १०.४६ वाजता पोहोचेल आणि १०.४८ वाजता सुटेल. डोंगरगड स्थानकावर हा थांबा तात्पुरता दिला जात आहे.

03-10-2024 ते 12-10-2024 पर्यंत डोंगरगड स्टेशनवर गाडी क्र. 20843 बिलासपूर-भगत की कोठी एक्स्प्रेस तात्पुरते 21.56 वाजता पोहोचेल आणि 21.58 वाजता निघेल. तसेच तात्पुरते विरुद्ध दिशेने गाडी क्र. 20844 भगत की कोठी - बिलासपूर एक्सप्रेस डोंगरगड स्थानकावर 05.55 वाजता पोहोचेल आणि 05.57 वाजता सुटेल. डोंगरगड स्थानकावर हा थांबा तात्पुरता दिला जात आहे.

03-10-2024 ते 12-10-2024 पर्यंत डोंगरगड स्टेशनवर गाडी क्र. 20845 बिलासपूर-बिकानेर एक्सप्रेस तात्पुरती 21.56 वाजता पोहोचेल आणि 21.58 वाजता निघेल. तसेच तात्पुरते विरुद्ध दिशेने गाडी क्र. 20846 बिकानेर - बिलासपूर एक्स्प्रेस डोंगरगड स्थानकावर 05.55 वाजता पोहोचेल आणि 05.57 वाजता सुटेल. डोंगरगड स्थानकावर हा थांबा तात्पुरता दिला जात आहे.03-10-2024 ते 12-10-2024 पर्यंत डोंगरगड स्टेशनवर गाडी क्र. 12851 बिलासपूर-चेन्नई एक्स्प्रेस तात्पुरते 12.19 वाजता पोहोचेल आणि 12.21 वाजता सुटेल. तसेच तात्पुरते विरुद्ध दिशेने गाडी क्र. १२८५२ चेन्नई - बिलासपूर एक्सप्रेस डोंगरगड स्थानकावर १०.३३ वाजता पोहोचेल आणि १०.३५ वाजता निघेल. डोंगरगड स्थानकावर हा थांबा तात्पुरता दिला जात आहे.

03-10-2024 ते 12-10-2024 पर्यंत डोंगरगड स्टेशनवर गाडी क्र. 12849 बिलासपूर-पुणे एक्स्प्रेस तात्पुरते 14.41 वाजता पोहोचेल आणि 14.43 वाजता सुटेल. तसेच तात्पुरते विरुद्ध दिशेने गाडी क्र. 12850 पुणे - बिलासपूर एक्सप्रेस डोंगरगड स्थानकावर 12.15 वाजता पोहोचेल आणि 12.17 वाजता सुटेल. डोंगरगड स्थानकावर हा थांबा तात्पुरता दिला जात आहे.

याशिवाय, डोंगरगडमध्ये वरील कालावधीत जत्रेच्या निमित्ताने अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये प्रवासी मदत केंद्र, अतिरिक्त तिकीट खिडकी/चौकशी केंद्र, अतिरिक्त मूत्रालये आणि स्वच्छतागृहे, अनाऊंसमेंट सिस्टमद्वारे गाड्यांची सतत माहिती, काळजी घेणे यांचा समावेश आहे.

स्वच्छता कायार्साठी तात्पुरती नियुक्तीः नागरी संरक्षण संस्था, स्काउट मार्गदर्शक, अतिरिक्त तिकीट तपासणी कर्मचारी, अतिरिक्त रेल्वे कर्मचारी/व्यावसायिक निरीक्षक यांची तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, जत्रेदरम्यान प्रवाशांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी प्रकाश आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसह प्रवाशांच्या आवश्यक सुविधांची सर्वकाळ काळजी घेतली जाईल.

# ऐन नवरात्रीच्या तोंडावर सोन्याच्या दरात वाढ

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :
गणेशोत्सवानंतर नागपूरसह राज्यभरात सोन्याचे दर घटले होते. परंतु त्यानंतर हळूहळू दराने नवीन उच्चांक नोंदवला. आताही सोन्याचे दर कमी होण्याचे नाव घेत नाही. नवरात्रचा शुभारंभ ३ ऑक्टोबरला आहे. या दिवशी घटस्थापना आहे. परंतु त्यापूर्वी सोन्याचे दर जास्त असल्याने ग्राहक चिंतेत आहेत. परंतु आता पुन्हा सोन्याचे दर वाढत आहेत. १८ सप्टेंबरला नागपुरात सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७३ हजार ३०० रुपये, २२ कॅरेटसाठी ६८ हजार २०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५७ हजार २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४७ हजार ६०० रुपये नोंदवले गेले. त्यानंतर हळूहळू दर वाढत आहेत. नागपुरातील सराफा बाजारात सोमवारी (३० सप्टेंबर) सोन्याचे दर सकाळी ११ वाजता २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७५ हजार ९०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७० हजार ६०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५९ हजार २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४९ हजार ३०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे १८ सप्टेंबरच्या तुलनेत नागपुरात ३० सप्टेंबरल सोन्याचे दर जास्तच वाढलेले दिसत आहेत.

# नवरात्रात देवीची मूर्ती साकारणे हा आनंदोत्सव

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :
गणेश मूर्तीच्या तुलनेत नवरात्रीसाठी बनविण्यात येणाऱ्या देवीच्या मूर्तींसाठी जास्त मेहनत लागत असली तरी मूर्ती साकारणे म्हणजे आम्हा कलाकारांसाठी व्यवसायापेक्षा छंदपूतीर्चा आनंदोत्सव आहे, असे प्रांजळ मत इतवारी येथील चितारोळीतील पारंपारिक शिल्पकार प्रीतम प्रमोद सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

गणेशोत्सवानंतर आता नवरात्रीचा उत्सव 3 ऑक्टोंबर ते 12 ऑक्टोंबर पर्यंत चालणार आहे. त्यासाठी काही कलाकार सहा महिन्यांपासून तर काही गणपती नंतर देवीच्या मूतीर्साठी मेहनत करीत आहेत. गणेशोत्सवाच्या तुलनेत नागपुरात देवींच्या मूर्तीची मागणी ही अल्प प्रमाणातच असते.



मूर्तीवर अंतिम हात फिरवताना कलाकार

त्यामुळे मूर्तिकारांकडे नागपूरपेक्षा विदर्भ व इतर राज्यातून मूतीर्ची मागणी येत असते. यंदा मूर्ती साकारण्यासाठी लागणारे विविध साहित्य जसे लाकूड, माती, तनिस, सुतळी व रंगरंगोटीचे साहित्य महागल्याने मूर्तीच्या किमतीत पाच ते दहा हजारांची वाढ झाली आहे. पिढ्यान पिढ्या मूर्ती बनवण्याचा व्यवसाय करणारे प्रीतम सूर्यवंशी सांगतात की ते, वडील व भाऊ असे तिघेच कोणतेही कामगार न ठेवता मूर्ती बनविण्याचे काम करीत असल्यामुळे गणपती च्या काळात अंग मेहनत फार होत असल्याने देवीच्या कामासाठी शरीर तेवढी साथ देत नाही त्यामुळे मूतीर्ची ऑर्डर कमी घेऊन यावर्षी सहाच मूतीर्ची ऑर्डर आहे. धामणगाव, सावनेर, पवनी, बैतूल, नागपूर येथून सहा ते आठ फुटापर्यंतची मूतीर्ची मागणी असून 40 ते 60000 पर्यंत त्यांची किंमत आहे. मुर्त्या बनविण्याच्या कामामध्ये तेवढा नफा नसल्याने प्रीतम सूर्यवंशी हे या व्यतिरिक्त चौका चौकात पुतळे बनविण्याचे, मंदिरातील मुर्त्या तसेच घराच्या इंटरियर आर्ट चे ही काम करतात.

चितारोळीत वीस ते पंचवीस कलाकार मूर्ती बनवण्याचे परंपरागत कार्य करीत आहेत. येथील रोहन गायकवाड हे उन्हाळ्यापासूनच देवीच्या मूतीर्चे काम करीत आहे. त्यांच्याकडे दुरुग, छपरा, आम्ला, आरमोरी, कोल्हापूर येथून ऑर्डर घेतल्या जातात. त्यांच्याकडे मागणीनुसार 40000 पासून तर एक लाखापर्यंतच्या मूर्ती विकल्या जातात. यामध्ये डेकोरेशनचा खर्च हा ग्राहक देत असतो. ते सांगतात की उत्तर प्रदेशातील कामगार या कमी फार कुशल असतात त्यामुळे काही कलाकार त्यांना बोलावून घेत असतात व रोजीशिवाय त्यांचा जेवणाचा व राहण्याचा खर्च उचलण्यात येतो.